पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -८
सभावृत्तांत

दिनांक :- २०.९.२०१२ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.९.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०.मा.सायकर अजय शंकरराव
११.मा.जाधव साधना रामदास
१२.मा.जाधव राहुल गुलाब
१३.मा.आल्हाट मंदा उत्तम
१४.मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५.मा.काळजे नितीन प्रताप
१६.मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७.मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४. मा.नंदा विकास ताकवणे
३५. मा.नेटके सुमन राजेंद्र
३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३७. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४१. मा.लोंढे गणेश नारायण
४२. मा.शमीम पठाण
४३.मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४४.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४५.मा.अपर्णा निलेश डोके
४६.मा.अनंत सुभाष को-हाळे
४७.मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४८. मा.पवार मनीषा काळूराम
४९. मा.प्रसाद शेट्टी
५०. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५१. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५२. सौ.साळुंके सविता सुरेश
५३. मा.शेख अस्लम शैकत
५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५६. मा.वाबळे संजय मल्हारराव
५७. मा.मडिगेरी वर्षा विलास
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६२. मा.अजित दामोदर गव्हाणे
६३. मा.गोफणे अनुराधा देविदास
६४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६६. मा.महेशदादा किसन लांडगे
६७. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६८. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६९. मा.लोंढे शुभांगी संतोष
७०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
७१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७२. मा.सावळे सिमा रविंद्र
७३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७४. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७५. मा.पालांडे सुजाता सुनिल
७६. मा.बहल योगेश मंगलसेन
७७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७८. मा.कदम सदगुरु महादेव
७९. मा.गिता सुशील मंचरकर
८०. मा.कैलास महादेव कदम
८१. मा.छाया जगन्नाथ साबळे
८२. मा.वाघेरे सुनिता राजेश
८३. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८५. मा.काळे विमल रमेश
८६. मा.पाडाळे निता विलास
८७. मा.विनोद जयवंत नढे
८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९०. मा.विमलताई सुरेश जगताप
९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९२. मा.बारणे निलेश हिरामण
९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९५. मा.बारणे माया संतोष
९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९९. मा.कलाटे स्वाती मयुर
१००. मा.नांदगुडे विलास एकनाथ
१०१. मा.चौंधे आरती सुरेश
१०२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०४. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०५. मा.जवळकर वैशाली राहुल
१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१११. मा.प्रशांत शितोळे
११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११३. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
११४. मा.गायकवाड संध्या सुरदास
११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११६. मा.शेंडगे आशा सुखदेव
११७. मा.मोटे किरण बाळासाहेब
११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११९. मा.संजय केशवराव काटे
१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२२. मा.पाटील सुजित वसंत
१२३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

*यशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-महापालिका आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति. आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.पवार,मा.मुंढे,मा.कुलकर्णी,मा.गावडे,मा.दुरगूडे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर -प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.काची,मा.तांबे-उपशहर अभियंता, मा.डॉ.साळवे-वैद्यकीय अधिक्षक,मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव,मा.कुदळे,मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.दांगट-कार्य.अभियंता,मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.*

-----------

*(चि.तिन्मय संतोष भालेकर (स्केटींग), कु.कश्मीरा फुलावळे (मल्लखांब) व श्रीमती. गीता धनंजय वाळींबे यांचा विशेष कार्याबद्यल मा.महापौर,मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते व मा.नगरसेवक यांचे हस्ते सत्कार करणेत आला.)*

*मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.*

*पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -*

*अनुकूल -११२ प्रतिकूल - ०*

*अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

---------

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, माजी सरसंघचालक के.सुदर्शन, माजी नगरसदस्य अप्पा बागल व महापालिकेचे प्रशासन अधिकारी बाबा बागल यांच्या मातोश्री व सामाजिक कार्यकर्त्या सोनूबाई गेनुभाऊ बागल, महापालिकेचे माजी नगरसदस्य रवींद्र खिलारे यांचे वडिल काशिनाथ खिलारे, ज्येष्ठ प्रतिष्ठित व्यक्तिमत्व व सामाजिक कार्यकर्ते भिवाप्पा शिवराम चिंचवडे, सतिश चिंधाजी गोलांडे, चंद्रकांत भगवंता वाघेरे, श्रीम.भिमाबाई बबनराव पारखी, केरबा कुंभार, विशाल पांढरकर यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून गुरुवार दिनांक २०/०९/२०१२ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.*

*मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.*

*मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.*

*(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)*

*मा.महापौर:- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे गुरुवार दि. २०.०९.२०१२ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.*

*(मोहिनीताई विलास लांडे)*
*महापौर*
*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - ४११ ०१८*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८*
*मा.महापालिका सभा*
*कार्यपत्रिका क्रमांक -८*
*सभावृत्तांत*
*(दि.२०.९.२०१२ [दु.२.००] ची तहकूब सभा)*

*दिनांक :- २०.९.२०१२* *वेळ:-दुपारी २.३० वाजता*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. २०.९.२०१२ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.९.२०१२ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.*

*१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर*
*२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर*
*३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे*
*४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू*
*५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ*
*६. मा.भालेकर अरुणा दिलीप*
*७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने*
*८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)*
*९. मा.थोरात वनिता एकनाथ*
*१०.मा.सायकर अजय शंकरराव*
*११.मा.जाधव साधना रामदास*
*१२.मा.जाधव राहुल गुलाब*
*१३.मा.आल्हाट मंदा उत्तम*

१४.मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५.मा.काळजे नितीन प्रताप
१६.मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९.मा.उल्हास शेट्टी
२०.मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१.मा.पवार संगीता शाम
२२.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२४.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२५.मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२६.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७.मा.भारती फरांदे
२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.जावेद रमजान शेख
३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३२.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३३.मा.नंदा विकास ताकवणे
३४.मा.नेटके सुमन राजेंद्र
३५.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३८.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३९.मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४०.मा.लोंढे गणेश नारायण
४१.मा.शमीम पठाण
४२.मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४३.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४४.मा.अपर्णा निलेश डोके
४५.मा.अनंत सुभाष को-हाळे
४६.मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४७. मा.पवार मनीषा काळूराम
४८. मा.प्रसाद शेट्टी
४९. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५१. सौ.साळुंके सविता सुरेश

५२. मा.शेख अस्लम शैकत
५३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५५. मा.वाबळे संजय मल्हारराव
५६. मा.मडिगेरी वर्षा विलास
५७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५८. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५९. मा.सुपे आशा रविंद्र
६०. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६१. मा.अजित दामोदर गव्हाणे
६२. मा.गोफणे अनुराधा देविदास
६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६५. मा.महेशदादा किसन लांडगे
६६. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६७. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६८. मा.लोंढे शुभांगी संतोष
६९. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
७०. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७१. मा.सावळे सिमा रविंद्र
७२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७४. मा.पालांडे सुजाता सुनिल
७५. मा.बहल योगेश मंगलसेन
७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७७. मा.कदम सदगुरु महादेव
७८. मा.गिता सुशील मंचरकर
७९. मा.कैलास महादेव कदम
८०. मा.छाया जगन्नाथ साबळे
८१. मा.वाघेरे सुनिता राजेश
८२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८४. मा.काळे विमल रमेश
८५. मा.पाडाळे निता विलास
८६. मा.विनोद जयवंत नढे
८७. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८८. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८९. मा.विमलताई सुरेश जगताप

९०. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९१. मा.बारणे निलेश हिरामण
९२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९४. मा.बारणे माया संतोष
९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९८. मा.कलाटे स्वाती मयुर
९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ
१००. मा.चौंधे आरती सुरेश
१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०४. मा.जवळकर वैशाली राहुल
१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
११०. मा.प्रशांत शितोळे
१११. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११३. मा.गायकवाड संध्या सुरदास
११४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११५. मा.शेंडगे आशा सुखदेव
११६. मा.मोटे किरण बाळासाहेब
११७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११८. मा.संजय केशवराव काटे
११९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२१. मा.पाटील सुजित वसंत
१२२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-महापालिका आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति. आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.पवार,मा.मुंढे,मा.कुलकर्णी,मा.गावडे,मा.दुरगूडे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.कांबळे-

*प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.काची,मा.तांबे-उपशहर अभियंता, मा.डॉ.साळवे-वैद्यकीय अधिक्षक,मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव,मा.कुदळे,मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.दांगट-कार्य.अभियंता,मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.*

-----------

*मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- १*

*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. जकात/१०/कावि/९९/१२ दि. १९/३/२०१२*
*२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५*
*३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८५२ दि.३१/७/२०१२*
*४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८१ दि.१/९/२०१२ अन्वये*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देतो.*

*मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, विषय क्र.१ तहकूब करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.*

*मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.*

*यानंतर सुचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :-११३* *विषय क्रमांक :- १*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. जकात/१०/कावि/९९/१२ दि. १९/३/२०१२*
*२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५*
*३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८५२ दि.३१/७/२०१२*
*४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८१ दि.१/९/२०१२ अन्वये*

*विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत येत आहे.*

*अनुकूल-९७* *प्रतिकूल- ०*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- २*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वैद्य/७/कावि/२१६५/१२ दि.७/८/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९०६ दि.१४/८/२०१२*

*मनपा कर्मचारी महासंघ, पिंपरी यांनी त्यांचेकडील दि.१२/४/२०१२ चे पत्रान्वये सद्यस्थितीत पेन्शन रकमेमध्ये वाढ झालेली असलेमुळे वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणा मधील र.रू.३,०००/- ची अट शिथिल करणेस विनंती केलेली असून सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शनमध्ये तुलनात्मक दृष्ट्या जेवढी वाढ झाली आहे. तेवढी वाढ र.रू.३,०००/- च्या मर्यादेत (In proportion of ration) नुसार प्रस्तावित करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी मुख्य लेखापाल यांचेकडील प्राप्त अभिप्रायानुसार वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणामधील "निवृत्ती वेतन घेत असलेले मनपा कर्मचाऱ्याचे आई वडील हे त्याचे कमाल उत्पन्न दरमहा (मुळ वेतन) र.रू. ६,७८२/-*

*असेल तर या अटीस अधीन राहून मनपा कर्मचाऱ्यांवर अवलंबुन नसल्याचे समजण्यात येईल" अशी मा.आयुक्त यांची शिफारस असली तरी सदरची अट वगळणेत येवून वैद्यकीय प्रतिपूर्ती व अग्रीम धोरण ठरविणेस मान्यता देणेत येत आहे*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, सदर विषयांच्या अनुषंगाने या महापालिकेत यापूर्वी मा.नागुकमार कुणचगी असताना सुद्धा, शर्मा आयुक्त असताना सुद्धा मी हा मुद्दा मांडला होता की, नगरसेवकांच्या कुटूंबातील व्यक्ती, आई-वडील व माजी नगरसेवक यांना सुद्धा अशा प्रकारची सवलत देण्याबाबत नाशिक, ठाणे व पुणे महानगरपालिकांमध्ये सुद्धा ठराव झालेला आहे. आपल्या कर्मचाऱ्यांना व आजी-माजी नगरसेवकांना वाय.सी.एम. मध्ये उपचार करावे लागतात. विशिष्ट मर्यादा ठरविल्यानंतर त्यांना सुद्धा ही सेवा उपलब्ध व्हावी. प्राधान्याने अशी सूचना या विषयाच्या अनुषंगाने करु इच्छितो. माझी प्रशासनाला विनंती आहे, या विषयाचा अभ्यास करुन आम्हाला किंवा नगरसेवकांना, पदाधिकाऱ्यांना, त्यांच्या आई-वडीलांना किंवा कुटूंबियांना सेवा कशी उपलब्ध करुन देता येईल. हा विषय समजून घेऊन तुम्ही आमच्या समोर ठेवला तर निश्चित याचा सहानूभूतिपूर्वक विचार व्हावा. सगळेच नगरसेवक श्रीमंत घरातले नसतात. काही नगरसेवक गोरगरीब कुटूंबातून, झोपडपट्टी भागातूनही निवडून येतात. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असते. काही पत्रकारबंधूंचाही यात समावेश असावा अशी सूचना या विषयाच्या अनुषंगाने करु इच्छितो. या सूचनेच्या अनुषंगाने हा विषय तुम्ही एकदा आपल्या समोर आणला. नगरसेवक आणि पत्रकार किंवा माजी नगरसेवक यांना सुद्धा या सवलतीचा फायदा घेता यावा या अनुषंगाने मी सूचना करीत आहे.*
*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, सदर विषय तहकूब करणेत यावा.*

*मा.शत्रुघ्न काटे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.*

*यानंतर सुचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :-११४* *विषय क्रमांक :- २*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वैद्य/७/कावि/२१६५/१२ दि.७/८/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९०६ दि.१४/८/२०१२*

*विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.*

*अनुकूल-९७* *प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.भारती फरांदे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*विषय क्रमांक :- ३*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/वि/२७०/१२ दि.७/८/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९३७ दि. २८/८/२०१२*

*सन २०१२-१३ साठी अंदाजपत्रकात शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र से.२३ या लेखाशिर्षावर मागील वर्षाइतकी र.रू.३=२५ कोटी तरतूद मिळाल्यामुळे पाणीपुरवठा विभागाकडून होत असलेल्या कामास अनुसरून विद्युत विभागाकडून कामे करणे विशेष योजना पाणीपुरवठा टप्पा-१ या लेखाशिर्षावरील र.रू.५ कोटी शुध्दअशुध्द जलउपसाकेंद्र से.२३ या लेखाशिर्षावर प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.नंदा ताकवणे :- मा.महापौर साहेब,सदर ठरावास अनुमोदन देते.*

*मा.विनायक गायकवाड :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -*

*पाणीपुरवठा अंतर्गत समावेश असलेल्या म.न.पा.च्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील पृ.क्र.१००९ अ.क्र.२३ या लेखाशिर्षावर (पाणीपुरवठा टप्पा-१ JNNURM अंतर्गत करावयाची कामे पाणीपुरवठा मुख्यालय) या कामावर तरतूद उपलब्ध नसल्याने विशेष योजना पाणीपुरवठा टप्पा १ या लेखाशिर्षावरुन र.रु.२० लाख इतकी तरतूद काळाखडक येथील नव्याने बांधणेत येत असलेल्या टाकी भरणेकामी अतिरिक्त नवीन पंप बसविणेकामी वर्ग करणेस मान्यता मिळावी.*

*मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या विषयात प्रपत्र अ प्रमाणे वर्ग करण्याबाबत म्हटले आहे. ते कुठे आहे ते वाचून दाखवा. ५ कोटींचा विषय करतोय. हे बरोबर नाही. आयुक्त साहेब, तुम्हाला त्यांना कानमंत्र द्यावा लागेल.*

*मा.चव्हाण (कार्य.अभियंता) :- मा.महापौर साहेब, प्रपत्र अ मध्ये जी कामे समाविष्ट आहेत ती सर्व मूळ अंदाजपत्रकात आहेत. आर्थिक वर्षात तरतूद कमी असल्यामुळे ही कामे अद्याप सुरु करता आलेली नाहीत. निविदा मागवून सुरु करता यावीत म्हणून हा प्रस्ताव सभागृहासमोर सादर केलेला आहे. नगरसचिव विभागाकडे प्रपत्र अ सादर केलेले आहे. त्याची प्रत पाहीजे असल्यास नगरसचिव विभागाकडून घ्यावी.*

*मा.श्रीरंग बारणे:- मा.महापौर साहेब, सभागृहाचे नियम समजून घ्या. प्रपत्र वाचा म्हटले तर वाचायला पाहीजे. तुम्ही त्यांच्यावर कशाला ढकलता.*

*( मा.चव्हाण (कार्य.अभियंता) यांनी प्रपत्र अ वाचून दाखवले. )*

*मा.चव्हाण (कार्य.अभियंता) :- यात एकूण ३६ कामे आहेत. यातील विषय क्र.१ पाणीपुरवठा टप्पा-१ चे ७३ कोटी शिल्लक आहेत. त्यातून ५ कोटी वर्ग करावयाचे आहेत.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, या प्रपत्र अ मध्ये दापोडीचा विषय घेतला का नाही माहित नाही. कोणी यासंदर्भात तक्रार केलेली आहे. संबंधित शाळा सॅन्क्शन झ ाली आहे. कामाची सुरुवात झालेली आहे. काही कामे झालेली नाहीत. आत्ता तरतूद वर्ग करतोय. या कामासाठी पैसे नाहीत का कामे का थांबलेली आहेत, याची सविस्तर माहिती पाहीजे.*

*मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, प्रत्येक नगरसेवकाला प्रपत्र अ ची प्रत कार्यपत्रिकेबरोबर मिळाली पाहीजे. यांनी त्यांच्याकडे दिले हे कारण पटत नाही. २ कोटी, २ लाख, २२ लाख ही जी गल्लत झाली, गोंधळ चालला आहे, त्यांनी सांगितल्याप्रमाणे विषय झाला. तो असा ठराव नाही. हा विषय तहकूब ठेवण्यात यावा अशी सूचना करते.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, दापोडी इथला पाणीपुरवठा विस्कळीत आहे, दखल घेतली जात नाही. मला माहिती हवी आहे.*
*मा.महापौर :- आत्ता विषय तहकूब करत आहोत. पुढील वेळी सविस्तर माहिती देण्यात येईल.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, रोज काही ना काहीतरी कारण सांगावयाचे. आयुक्तांकडे मिटींग आहे असे म्हणणे चुकीचे आहे. पाणीपुरवठा सुरळीत झाला पाहीजे.*
*मा.महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.*

*मा.शरद जाधव :- मा.महापौर साहेब, मा.राजेंद्र काटे यांनी विषय काढला. यासंदर्भात टेंडर काढले आहे. संबंधित ठेकेदाराने काम केलेले नाही. इतर टेंडर नोटीसमध्ये रिकॉलसाठी टाकतोय. टेंडर रद्द केलेले होते. क्लॉज ३ प्रमाणे केलेले आहे.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, काय उपाययोजना केल्या ते सांगीतले तर बरे होईल. फ्लो रेट मिळत नाही त्यामुळे टाक्या भरल्या जात नाहीत. महिना झाला जास्तीत*

*जास्त ४५० फ्लो रेटने काम होत नाही. रात्रभर टाकीवर बसून त्याची शहानिशा केलेली आहे.*

*मा.शरद जाधव :- मा.महापौर साहेब, पिंपरी वाघेरे, पिंपळे गुरव इथे ग्रॅवीटी टाकतोय. नदी पात्रातून क्रॉस करायचे काम पूर्ण केलेले आहे. पुढील कामे भविष्यात खोदाई करायची परवानगी आहे. कमीत कमी २ महिन्यांत प्रश्न मिटवला जाईल.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, हे काम गेली ५ वर्षांपासून चालू आहे. अजून ५ वर्षे वाट पहायची का. लोकांची काय सोय करणार आहात. तो पंप बंद असेल तर चालू करायची जबाबदारी कोणाची आहे. टाक्या भरल्या नाहीतरी लोकांची ओरड तशीच थांबवायची का.*

*मा.शरद जाधव :- मा.महापौर साहेब,सद्यस्थितीत टाक्या भरत आहे.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, आम्ही टँकर मागितला तर एकच देऊ, नंतर बघू, टँकर उपलब्ध नाही अशी उत्तरे अधिकारी देतात.*

*मा.शरद जाधव :- मा.महापौर साहेब, लोकांना कनेक्शन वाढवून घ्या असे सांगितले तरी ते वाढवून घेत नाहीत. ते वाढवून घेत नाहीत तोपर्यंत टँकरनेच पाणीपुरवठा करतोय.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, एका सोसायटीचा प्रॉब्लेम आहे. माझ्या वॉर्डात नाहीतर गणेशनगर भागातील लोकांना जवळजवळ दीड वर्ष झाले, पाणी मिळत नाही काय करणार. रेटींग घेतले आहे.*

*मा.शरद जाधव :- मा.महापौर साहेब, रेटींग घेतोय. वाढीव मागणी आहे म्हणून वाढवून घेतोय.*
*मा.महापौर :- सणांचे दिवस आहेत. हे काम तुम्ही वाढवले पाहीजे. गंभीर प्रश्न आहे. लवकरात लवकर हा प्रश्न मिटवावा.*

*मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, या पद्धतीने आपण आयुक्त साहेबांना सुचना द्याव्यात. एक पद्धत पडून गेलेली आहे. ऑन लाईन टेंडर सिस्टीममुळे कोणत्याही ठेकेदारावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण राहीलेले नाही. पूर्वीच्या माध्यमातून ३०% बिलो, ४०% बिलो टेंडर जात होते. निदर्शनास आले आहे की, १ लाखाचे काम ७० हजारात कसे काय करु शकतो. क्वालिटी एकदम सुमार दर्जाची आहे. त्यांनी तपासले. केवळ डाटामध्ये दाखवायचे. ठेकेदारांमध्ये निकोप, चांगल्या प्रकारची स्पर्धा व्हावी. नगरसदस्याचा कोणत्याही प्रकारचा अंकुश नसावा. ठेकेदार ३०%, ४०% बिलो ऑन लाईन टेंडर वर्क ऑर्डर घेतो. परवडत नाही म्हणून कॅन्सल करतो. टेंडर रिकॉल करणे प्रक्रियेला ६ महिन्यांचा कालावधी लागतो. ठेकेदार १ महिन्यात सांगतो. या सर्वांवर*

*नियंत्रण ठेवणे अतिशय महत्वाचे आहे. आम्हाला ५ वर्षे नावाला असतात. दोन-अडीच वर्षांचा कालखंड विकास करण्यासाठी, टेंडर करण्यासाठी मिळतो. खऱ्या कामाचे दिवस अडीच वर्षेच असतात. सभेत अशा पद्धतीबद्दर तक्रार करतो, चर्चा करतो. त्याची अंमलबजावणी किंवा पाठपुरावा या संदर्भात आयुक्तांनी टेंडर ओपन झाले का नाही, ठेकेदाराने वर्क ऑर्डर घेतल्यानंतर कामाची अंमलबजावणी केली का नाही, याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. अत्यंत गंभीर बाब आहे. प्रभागवाईज याद्या घ्याव्यात, कितीतरी लोकांना वर्क ऑर्डर दिलेल्या होत्या. आज किती लोकांनी कामे चालू केलेली नाहीत. दिवाळी, पावसाची कारणे पुढे केली जातात. आपल्याला हीच नम्र विनंती आहे की, या पार्श्वभूमीवर ठेकेदाराला कसलीही अडचण असेल, कोणाचीही परवानगी न घेता त्याच्यावर कठोर कारवाई केली तर चाललेली कामे तरी व्यवस्थित होतील. या विषयाच्या अनुषंगाने जाधव यांच्या विषयाच्या अनुषंगाने उत्तर देतोय. याची गंभीर दखल घ्यावी.*

*मा.वसंत लोंढे :- मा.महापौर साहेब, भाऊसाहेब भोईर यांनी खऱ्या अर्थाने विषय मांडला आहे. ठेकेदार मनमानी कारभार करीत आहेत. सर्वे नं. १ मध्ये २ वर्षांत फक्त कॉलम उभे राहीले आहेत. ठेकेदार काम करणार नाही अशी उत्तरे देतात. अशा परिस्थीतीत त्यांना काळ्या लिस्टमध्ये टाका. त्यांच्यावर कारवाई करा. तुमच्यावर जबाबदारी टाकतोय. ठेकेदाराने ५ वर्षांत थोडे थोडे काम केले, कामे रेंगाळलेली आहेत. आम्ही काम करतो आणि दुसरे नगरसेवक त्याचे उद्‌घाटन करतात.*

*यानंतर सदर विषय मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- ११५ विषय क्रमांक :- ३*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/वि/२७०/१२*
*दि.७/८/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९३७ दि. २८/८/२०१२*
*विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक :-११६ विषय क्रमांक :- ४*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/२/कावि/१५६/१२*
*दि.१७/८/१२*

*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९६७ दि. २८/८/२०१२*

*नुकतेच पुणे शहरामध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी शहरातील प्रमुख चौक, गर्दीची ठिकाणे अशा ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी र.रू.२.५ कोटीची मागणी केली असून सार्वजनिक सुरक्षीततेच्या दृष्टीने सदरची रक्कम पुणे पोलिस यास देणे आवश्यक असल्याने सदरची रक्कम "पाणीपुरवठा टप्पा क्र.१" या लेखाशिर्षावरून दुरसंचार विभागाचे "सीटी सर्व्हेलन्स करिता सी.सी.टी.व्ही.यंत्रणा उभारणे" या लेखाशिर्षावर वर्ग करून,पुणे पोलिस यास मनपा मार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.स्वाती साने :- मा.महापौर साहेब,सदर ठरावास अनुमोदन देते.*

*मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आपण पुणे पोलिस यांस जवळपास अडीच कोटी देतोय. सभागृहात अनेक सदस्यांना माहिती आहे का कोणत्या चौकातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणार. त्याचा अपेक्षित खर्चाचा उद्देश साधला गेला पाहीजे. केवळ भविष्यात आपण बसविलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद स्थितीत आढळायचे, चालू स्थितीत नाहीत अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून याचा खुलासा करावा. या विषयाच्या अनुषंगाने पाणीपुरवठा टप्पा क्र. १ या लेखाशिर्षावरुन अडीच कोटी वर्ग करुन त्यांना देतोय. याच्यासारखाच ३ नंबरच्या विषयात ५ कोटी तरतूद वर्ग करण्याचे ठरले आहे. सध्या ३ कोटी तरतूद वर्गीकरण करण्यास सांगितले आहे. याचे ताळतंत्र समजले नाही. एकीकडे याच लेखाशिर्षातून ५ मधील अडीच कोटी का देतोय. ३ कोटींचा वेगळा विषय आहे तो सभागृहात सांगावा. दोन विषयांत काहीतरी सांगावे. लेखाशिर्ष एकच आहे. ५ कोटींतून ३ कोटी वर्गीकरणाचा दुसरा विषय आहे. ५ कोटींतून अडीच कोटी वर्ग करतोय. हा विषय तहकूब ठेवला आहे मग कुठून वर्गीकरण करणार हे सांगावे.*

*मा.बाबासाहेब धुमाळ :- मा.महापौर साहेब, याठिकाणी या अडीच कोटींच्या प्रश्नाचा विषय मांडला आहे. जर्मन बेकरीचा प्रसंग होऊन २ वर्षे झाली तरी अशी घटना पुन्हा घडली तर पोलिस यंत्रणांनी आत्तापर्यंत राज्य शासन, पुणे मनपा किंवा महाराष्ट्र शासनाशी याबद्दल विचारविमर्श केला आहे का. कॅमेरे कोणत्या प्रतीचे असतील. हा कॅमेरा बसवत असताना किती वेळ चालू शकेल. नियंत्रक बसवणार, त्याचे मुख्य केंद्र कुठून असेल, त्याचे नियोजन केले आहे का. केवळ पैसे मागवायचे. आपल्याला इतिहास माहित असेल तर या श्रीमंत महापालिकेत आत्ता पर्यंत पैसे मागितल्यावर आपण सढळ हाताने मदत करत आलो आहोत. त्याचा विनियोग काय केला. या कॅमेरांची दुरुस्ती कोण करणार आहेत का, ते कुठून कुठे-कुठे लावले जाणार आहेत, त्याचे स्टोअरेजमध्ये किती किती चित्रे समाविष्ट केली जातील याची सविस्तर माहिती सभागृहाला दिली का. केवळ पैसे मागताएत, आपण देतोय असे न करता त्याचे परिपत्रक, पोलिस खात्याचा ठराव घ्यावा. नंतरच पैसे दिले जावेत अशी माझी मागणी आहे.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, याठिकाणी हा विषय आला आहे. याच्या अनुषंगाने आप्पा बारणे यांनी योग्य प्रश्न विचारलेला आहे. खरेतर पोलिस यंत्रणांकडे जे आहे ते नागरिकांना संरक्षण देण्यासाठी तुटपूंजी सेवा आहे असे ते निश्चित म्हणत असतात. राज्य शासन, पुणे मनपा व आपली महापालिका असे तीन यंत्रणांनी ५ कोटी देण्याचा निर्णय मा.उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत झालेला असेल तर पोलिसांचे नियंत्रण कसे असणार आहे,जबाबदार कसे असणार आहे, सेंट्रलाईज ऑब्जर्वेशन कसे करणार याची सिस्टीम काय. ५ कोटी लागले तरी प्रश्न नाही. आपल्याकडे वेगळे टेंडर काढले होते. त्यात आपण जकात नाके घेतलेले होते. मान्यता सुद्धा घेतलेली होती. मा.दिलीप बंड आयुक्त असताना शहर वाय-फाय होण्यासाठी आपल्याकडे सर्वे झाला होता. हद्दीतील सर्व जकात नाके, मुख्य इमारत, शहरातील प्रमुख गर्दीची ठिकाणे इथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे असावेत. आत्ता ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी निघाली आहे. नागरिकांची परिस्थिती पाहिली तर कॅश फ्लो भरताना रिस्क आहे. दिवसाढवळ्या दरोडे पडताहेत. सोनारांची दुकाने, बँका लुटल्या जातात. जकात नाक्यावरील कर्मचारी दररोज विभागात येऊन कॅश नील करतात. आपण पाहतो. मात्र कर्मचाऱ्यांनी किती गाड्या सोडल्या, किती चोरी केली याकडे जास्त लक्ष असते. नाक्यावरच्या तिजोऱ्यांना कुलुप व्यवस्थित नाहीत, सुरक्षा व्यवस्था व्यवस्थित नाही. तिथे गनमॅन पाहिजे. कर्मचाऱ्यांना नेमकी काय सुरक्षितता देणार, नागरीकांना काय देणार याच्या पुढील स्टेपस् काय आहेत. अडीच कोटींचा विषय असेल तर सभागृहाला विनंती आहे, जकात नाक्यावरील येणारी वाहने केबीनमध्ये कॅश नील करणारे कर्मचाऱ्यांना लॉकर व्यवस्थित असले पाहीजे. ऑफीसमध्ये बसून परिस्थिती दिसली पाहीजे. वाय.सी.एम.मध्ये काही प्रमुख ठिकाणे अशी आहेत, प्रमुख बिल्डींग आहेत. चांगली टेक्नॉलॉजी अपडेट करुन वायफाय करणार होतो त्याचे काय झाले? सीसीटीव्ही कॅमेरे कॉर्डलेस करणार का, विथ कनेक्शन करणार, कनेक्टीव्हीटी कशी असणार, ऑपरेट कसे करणार. कंट्रोल कसे करणार. टेंडर काढले आहे. एकंदरीत शहराची सुरक्षितता, मनपाचा असलेला उद्देश्य, हाती घेतलेली कामे या अनुषंगाने BRTS सुद्धा करतोय. वाय.सी.एम.साठी तुम्ही पदाधिकार घेतलेला आहे. शहरातील नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता २ कोटी जाण्याचा विषय नाही तर ८ कोटींचा भूर्दंड वाय.सी.एम.बाबतीत पडणार आहे. नागरिकांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी ८ काय १० काय सर्व पक्षांनी एकमुखाने मान्यता दिली. अशी ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी ऑपरेट करण्यासाठी निश्चित करावे. त्यासाठी अधिक पैसा निश्चित ठेवू. शहरातील सिटी मॉल, मल्टीफ्लेक्स खरोखर सुरक्षित व्हावेत. पिंपरी चिंचवड शहराच्या सुरक्षिततेबाबत अशी कळकळीची विनंती आहे. पोलिस यंत्रणा कशी व्यवस्था करणार, त्याचा डिसप्ले कसा करणार, याचा खुलासा आपण द्यावा. सूचनांच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेता आला तर आपण घ्यावा.*

*मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) :- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, पुणे शहरात ऑगस्ट महिन्यात पहिल्या आठवड्यात पुण्यात बॉम्बब्लास्ट झाला त्याची बैठक झाली होती. त्यात पुणे मनपा, पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व*

*त्याचबरोबर येणाऱ्या, वाढत असलेल्या सुविधा, शहराचा वाढता वेग लक्षात घेता कंटीन्यूअस मॉनिटरींग सी.सी.टी.व्ही. असावा असा प्रस्ताव पालक मंत्र्यांच्या बैठकीत आला आहे. सदरची बैठकीचा वृत्तांत सभागृहाला अवगत करतोय. पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्रात जाहीर करण्यात येत आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी समिति नेमली आहे. यात पुणे क्षेत्राचे पोलिस आयुक्त, पुणे महापालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी पुणे यांची समिती नेमली आहे. साधारणत: पहिल्या टप्प्यात १,००० कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात येते आहे. आपल्या क्षेत्रात २५० कॅमेरे असतील असा अंदाज आहे. आपल्यासमोर प्राथमिक चर्चा मांडत आहे. याबाबतीत मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. सर्व कॅमेरे उभारण्याचे नियोजन मॅनेजरींग पोलीस आयुक्त यांनी करावे असे निदेश आहेत. एक्सटर्नल लोकेशनसाठी मुख्यत: उभे करण्यात येणार आहेत. दहशत पसरवण्याचे कार्य समाजकंटक करतात. ते कार्य करण्याचे त्यांचे प्रयोजन आहे. वास्तूच्या आतले कॅमेरे, आपली कार्यालये, जलशुद्धीकरण प्रकल्प, वाय.सी.एम. असेल त्या-त्या एस्टॅब्लिशमेंटने हे कॅमेरे त्या-त्या ठिकाणी बसवायचे आहेत. खाजगी वास्तू, मॉल्स्, मल्टीप्लेक्स् यांनी अंतर्गत कॅमेरे त्यांचे त्यांनी बसवायचे आहेत. आपल्याकडून सार्वजनिक ठिकाणी कॅमेरे बसविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील गरज लक्षात घेता या १ हजार, १ लाख अशा टप्प्यात दोन्ही शहरांसाठी अशी सिस्टीम करता येऊ शकेल असा निर्णय झाला. अंमलबजावणी चालू आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी गाईडलाईन्स तयार केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने ज्या गाईडलाईन्स तयार केल्या त्याची अंमलबजावणी होणार आहे. महत्वाचे म्हणजे योजनेच्या पद्धतीचा प्रयोग मुंबई इथे चालू आहे. मुंबईमध्ये दोन दशकांत अनेक घटना घडल्या आहेत. इथे ६,००० कॅमेरे बसविण्याचे नियोजन चालू आहे. त्याच्याच आधारावर पुणे महानगर क्षेत्रात हे नियोजन करण्यात येणार आहे. पहिला टप्प्यात १,००० कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, त्यापैकी २५० कॅमेरे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बसविण्यात येणार आहेत. चौकशीतून संख्या निश्चित झालेली आहे. पोलिस विभागाकडून सर्वेक्षण चालू आहे. पोलिस आयुक्तांकडून लवकरच सादर केले जाईल. अंतर्गत कॅमेरे बसवावे लागतील. पोलिस आयुक्त पुणे यांच्याकडून संपूर्ण १००० कॅमेऱ्यांवर नियंत्रण ठेवले जाईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत एक कंट्रोल रुम असणार आहे. इथून त्यांना कोप-अप करता येईल. पुणे महानगरपालिकेत सुद्धा अशी कंट्रोल रुम असणार आहे. याचे रेकॉर्डींग होणार आहे. तीस दिवसांपर्यंतचे रेकॉर्डींग ठेवता येऊ शकते. जेवढे रेकॉर्डींग ठेवू तेवढा डाटा जास्त खर्च होतो. दक्षता समिती काम करीत आहे. प्रत्येक गोष्टींचे रेकॉर्डींग, बॅक-अप, डाटा ठेवला जाईल. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा अनुभव आहे, त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणार आहे. मुंबई मनपाप्रमाणे टेंडर काढतोय. त्याच धर्तीवर टेंडर काढले जाईल. मुंबई इथे पूर्वी कॅमेरे बसविलेले आहेत. आत्ता ६,००० कॅमेरे बसविण्याचे नियोजन करत आलो आहोत. टप्पा निर्माण झाला आहे. प्राथमिक माहिती सांगितलेली आहे. सुरक्षा हा प्रमुख मुद्दा प्राधान्याने घेऊ ही माहिती सांगितलेली आहे.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आपले जकात नाके, मनपा इमारत, यशवंतराव चव्हाण रुग्णालय, एस.टी.पी. प्लॉण्ट यासाठी काय उपाययोजना करतोय. We does Vifi, we does planning. बाकी सर्व गोष्टींत चांगल्या प्रकारे चांगले लक्ष दिलेले आहे. आपल्या प्रकल्पांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने नेमके काय करतोय हा माझा प्रश्न आहे.*

*मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) :- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आपल्या कार्यक्षेत्रात जकात नाके तसेच इतर ठिकाणी स्वतंत्र यंत्रणा उभी करीत आहोत. गेल्या ३/४ वर्षांपासून वाय-फाय करण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे. बॅण्डविड्थ किती उपलब्ध होईल. सिक्युरीटी सिस्टीम पुढील ४ वर्षांत येऊ शकते म्हणून तांत्रिक दृष्ट्या केबल नेटवर्क विझिबिलिटी राहील असे निर्देश टेक्नीकल विभागांना दिलेले आहेत. त्याची त्या-त्या विभागाकडून अंमलबजावणी सुरु आहे. याच काही महिन्यांत, जकात नाके, इतर महत्वाचे विभाग यांच्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची योजना येणार आहे. पुणे वायरलेस नेटवर्कवर जास्त भर देण्यात येणार आहे. हे सर्व करण्यासाठी वेळ लागेल. दोन्ही शहरांत नेटवर्कींग वाढवण्यात येणार आहे. विषय क्रमांक ४ करिता तरतूद वर्ग केलेली आहे. पाणीपुरवठा टप्पा १ पवना जलवाहिनी प्रकल्प जैसे थे परिस्थीतीत आहे. याकरिता असलेल्या तरतूदीतून दोन्ही विषयांकडे वर्ग करतोय. जेव्हा या जलवाहीनीचे काम सुरु होईल, त्यावेळी उर्वरीत पैसै वापरता येतील. एकूण ७३ कोटी रक्कम आहे. एका विषयाला ५ कोटी व दुसऱ्या विषयाला अडीच कोटी असे एकूण ७ १/२ कोटी वर्ग केले जाणार आहेत.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

*मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, दोनही विषय एकच आहेत. विषय क्र. ४ मंजूर करताय मग विषय क्र. ३ का मंजूर करीत नाही. व्हिपमध्ये मंजूर असे लिहीलेले आहे. काहीतरी बेसिक पाहीजे.*

*मा.महापौर :- विषय क्र.४ची सविस्तर माहिती दिली तशी विषय क्र.३ची दिलेली नाही. म्हणून तो विषय तहकूब केलेला आहे.*

*मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, काहीतरी बेसिक पाहीजे. एकाच प्रकारचे विषय आहेत.*

----

*मा.विनया तापकीर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- ५*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच*
*/ॲकॅड/कावि/३०८/१२ दि.१/०९/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०७१ दि.४/९/२०१२*

*कायदा विभागाने दिलेल्या MOU (Memorandum Of Understanding) च्या प्रारुपानुसार व अभिप्रायानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व MUHS नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने वाय.सी.एम. रुग्णालयात व महापालिकेच्या इतर रुग्णालयात एम.बी.बी.एस नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम चालु करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.अमिना पानसरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करायला हरकत नाही. महापालिकेकडून मोठे-मोठे प्रकल्प राबवित असतो. सिटी सेंटर, मेट्रो प्रकल्प, फ्लायओव्हर असे बरेचसे प्रकल्प राबवितो. अशा वेळी ठराविक नगरसेवकांना, पदाधिकाऱ्यांना त्याठिकाणी बोलवले जाते. त्याची चर्चा होते. आयुक्तांच्या कार्यालयात चर्चा घडवून आणली जाते, त्यांना माहिती मिळते. महापालिकेत जे नगरसेवक निवडून आले आहेत, बरेचसे अभ्यासू नगरसेवक आहेत. काही ठराविक मूठभर लोकांना याची माहिती मिळते. आमच्या पक्षाचे याठिकाणी बहुमत असल्यामुळे पक्षनेत्यांच्या कार्यालयात विषय मंजूर करतो. जनता, नागरिक सुद्धा अत्यंत चौकस, जागरूक झालेले आहेत. विषय झाल्यानंतर नवीन नगरसेवकांना कार्यकर्ते विचारतात. त्यांना चर्चा करायची असते. आम्हाला वर्तमानपत्रांत जेवढे छापून येते, तेवढे सुद्धा माहित नसते. तुम्ही एवढे मोठमोठे प्रकल्प ठराविक लोकांसमोर मंजूर करता. त्यांच्याबरोबर चर्चा करता. इथे विषय वाचून झाला, चर्चा झाली, तो प्रकल्प मंजूर झाला असे नको आहे. पदाधिकारी येतात त्यांनी आमच्याबरोबर बोलावे. आमच्याबरोबर चर्चा करावी, इतर नगरसेवकांना सांगावे. मग हे विषय मंजूर करावेत. अधिकाऱ्यांनी अभय योजनेत संपूर्ण माहिती तयार ठेवली आहे. ते सांगायला तयार होते. असे कायम होते. सिटी सेंटरची एवढी मोठी योजना, प्रकल्पाला मंजूरी देताना काही नगरसेवक त्यावेळी होते. आम्हाला काहीच माहिती नव्हते. भाऊसाहेब भोईर यांनी शंका-कुशंका काढल्या, आम्हाला विषय माहीत नव्हता. मी आयुक्त साहेबांकडे हट्ट केला की, आम्हाला सुद्धा माहिती पाहिजे. यापुढे असे होता कामा नये. आम्ही सत्ताधारी पक्षात असलो तरी, बहुमत असले तरी उलटसुलट चर्चेला कारणीभूत ठरलो तर त्याला आम्ही जबाबदार नाही. मोठ्या प्रकल्पांविषयी सर्व नगरसेवकांना त्याची माहिती मिळाली पाहीजे. नाहीतर तो विषय सभागृहापुढे आणून चर्चा झाली पाहीजे. आम्हाला माहिती मिळाली पाहीजे. नागरिक वर्तमानपत्रांत वाचतात आणि आम्हाला विचारतात. या विषयाशी संबंध नसेल, आयुक्तांच्या कक्षात याच्यावर सुद्धा मिटींग घेतली आहे. ही योजना पदव्युत्तर अभ्यासक्रम याबद्दल सुद्धा चर्चा झाली आहे. विषय मंजूर विषय मंजूर नंतर आम्ही घरी निघतो. डॉकेट वाचून वर्तमानपत्रात बातमी येते. मी काल तिथे होते मला कळाले नाही काय झ*

*ाले. नवीन नगरसेवकांना खरोखरच काही कळत नाही. आला विषय झाला मंजूर झ ालेल्या खर्चाची त्यांना सुद्धा माहिती कळू द्या. आपण काही भागाचे प्रतिनिधित्व करतोय, शहराचे महत्वाचे घटक आहोत. सर्वांचा सहभाग निर्णय प्रक्रियेत करुन घ्या हेच मला सांगावयाचे आहे.*

*मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आत्ता पठाण बाईंनी जो ठराव मांडला त्याला माझ ा खरोखर पाठींबा आहे. त्या सुद्धा ज्येष्ठ नगरसेवक आहेत. स्थायी समितीच्या अध्यक्ष होत्या. मी, मा.भाऊसाहेब भोईर आमच्या त्या शिक्षिका आहेत. आम्हाला वाईट वाटले. अन्य ज्येष्ठ सदस्यांना सुद्धा सहभागी करुन घ्यावे. महापालिकेकडून प्रकल्प राबवित असताना सर्वांना सभागृहात बोलावून माहिती द्यावी. फक्त सभेत होणार नाही अशा प्रकारे काळजी घ्या. या विषयाची माहिती संपूर्णपणे दिलेली आहे. तरीदेखील एखादी गोष्ट करत असताना त्रुटी राहू नयेत. मनपात प्रकल्प राबवित असताना त्रुटी राहू नयेत, खर्च वाया जाऊ नये. या सभागृहात अनेक वेळा विषय करत असताना नाव देऊन विषय मंजूर करतात. मला वाटते अतिशय चांगला विषय आहे. त्याला विरोध करायला नको. आपण वैद्यकीय क्षेत्राची पदवी ग्रहण केलेली आहे. आमच्यापेक्षा तुम्हाला हा विषय जास्त माहिती असेल. आम्हाला कदाचित कमी माहिती असेल. एम.बी.बी.एस. नंतरचा कोर्स चालू करतोय, त्याला महापालिकेच्या वतीने विषयपत्रिकेच्या अनुषंगाने जवळपास सुरुवातीला ५० कोटी खर्च करतोय. २८ कोटी सुरुवातीच्या कालावधीत खर्च करत असताना आस्थापना खर्च जवळपास १० कोटी होणार आहे. महापालिकेच्या तिजोरीवर १० कोटींचा बोजा दरवर्षी पडणार आहे. या अनुषंगाने वाय.सी.एम.मध्ये हे कोर्सेस चालू होत असताना याची कमिटी तयार केलेली आहे. या कमिटीच्या माध्यमातून कोर्स संपूर्णपणे नियंत्रित होणार आहे. ही कमिटी करत असताना प्रामुख्याने संस्थेचा कारभार कोऑर्डीनेशन कमिटीच्या माध्यमातून चालविला जाणार आहे. यात महापालिका आयुक्त,वैद्यकीय अधिनिष्ठाता,आरोग्य विज्ञान कौन्सिल सिनेट मेंबर्स व मनपाने सुचविलेले २ सदस्य असणार आहेत. संपूर्ण कारभार पाहत असताना मनपाचे दोन सदस्य प्रामुख्याने राहणार आहेत. त्यावर मनपाचा १२ कोटींच्यावर खर्च जाणार आहे. पूर्ण खर्च करत असताना होत असताना मनपाचा संपूर्णपणे कंट्रोल यावर असावा. ऑटोक्लस्टरची सभागृहाला मंजूरी देत असताना आज ऑटोक्लस्टरबाबतीत ठिक होते. शहरातील सर्वसामान्य लघुउद्योजकांना फायदा होत असेल. महापालिकेतील मा.मंगला कदम व मा.योगेश बहल या दोनच सदस्यांची ऑटोक्लस्टरच्या कमिटीवर निवड केलेली आहे. आज मनपाच्या सगळ्या बैठका तिथे घेत असू, मात्र मनपाचे किती कोटी गेले याचा सुद्धा विचार केला गेला पाहीजे. वैद्यकीय सेवा चांगली सुधारली गेली पाहीजे. या मताशी मीदेखील सहमत आहे. त्यात त्रुटी राहता कामा नयेत. आपण सखोल विचार करुन भविष्यात ५० कोटी खर्च करतोय. सभागृहाला यासंदर्भात पठाणबाईंनी प्रश्न उपस्थित केला. या विषयाच्या अनुषंगाने माहिती दिली त्यावेळी गटनेते म्हणून मला सुद्धा बोलवले होते. मी लोकांना माहिती सांगितली. सदस्यांना शंभर टक्के यासंदर्भात माहिती मिळाली पाहीजे. केवळ विषय अजेंडावर आला त्याला मंजूरी देतोय. सदस्यांच्या मनात शंका राहता कामा नये. जवळजवळ ५० कोटी खर्च करत असताना दरवर्षी १० कोटी खर्च*

*होणार आहे. वैद्यकीय सेवांसाठी ड्रॉ उपलब्ध होणार आहे. तो खर्च वाचणार आहे. भविष्यात महापालिकेची आर्थिक स्थिती अशीच राहणार आहे का? याचा सुद्धा विचार केला पाहीजे. आज महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली आहे. भविष्यात अशीच परिस्थीती राहील का नाही हे सांगता येणार नाही. शर्मा साहेब महापालिकेत आले त्यावेळी महापालिकेची आर्थिक परिस्थीती नाजूक झालेली होती. हा विभाग बंद करावा लागणार नाही ना या अनुषंगाने विचार करुन प्रकल्प उभे करताना भविष्यात तसाच प्रकार चालू राहील का नाही या दृष्टीने आपण सदस्यांना माहिती द्यावी.*

*मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, प्रथम आपण हॉस्पीटल सुरु करण्याचा प्रयत्न करत होतो. MBBS कोर्स चालू करण्याचा ठराव मनपाला करता येतो का. यासाठी विचार करावा. मुंबई महापालिकेत सुद्धा MBBS कोर्स चालू केलेला आहे. सी.पी.एस. हा ग्रॅज्युएट डिप्लोमा कोर्स वाय.सी.एम. मध्ये चा`लू होईल. लाखो रुपयांचा भ्रष्टाचार ॲडमिशन समितीमध्ये आहे. ॲडमिशन घ्यायला गेलो तर प्रत्येक समितीने ३ लाख, ५ लाख किंवा ९ लाख सुद्धा मागितलेले होते. गायनिकसंदर्भात ९ लाख घेतलेले आहेत. एवढा भ्रष्टाचार झालेला आहे. स्टाफ सिलेक्शन व स्टुडण्ड सिलेक्शन यात भ्रष्टाचार होणार आहे याची काळजी घ्या. त्यांच्याकडे मेरीट असते. पैसे देऊ शकत नाही अशा माणसाला ॲडमिशन मिळावी. सी.पी.एम. कोर्स संदर्भात भ्रष्टाचार झाला आहे याची माहिती घ्या.*

*मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, पठाण मॅडम आप्पा तुमचे विद्यार्थी आहेत. तुमच्याकडून अपेक्षितच आहे माहिती घेतली असावी म्हणून तुम्ही एवढे बोलू शकलात. महत्वाच्या विषयावर महापौर, आयुक्त सर्वजण चर्चा करीत आहेत. बाईंनी जी खंत व्यक्त केली, त्याबद्दल विरोधी पक्ष म्हणून आम्हाला भिती वाटली. स्थायी समितीमध्ये असताना BRTS चा विषय आल्यावर मिटींग घेतली त्यावेळी आमच्या सह्या घेत होते. त्यावेळी मी मनातली शंका उपस्थित केली होती. ऑफिशियल बोलतो, सूचना मांडतो, त्याचे प्रोसिडींग महापालिका तयार करते का? ठराविक मूठभर लोकांना बोलवतो. मा.योगेश बहल म्हणाले. सर्व पक्षाचे सदस्य, गटनेत्यांना, समिती सदस्य यांनी सूचवलेल्या सूचनांचा या सूचना मांडत असताना त्याचा उपयोग यात करतात का नाही ते सांगत नाहीत. BRTS संदर्भात सूचना मांडली आहे. मा.प्रशांत शितोळे म्हणाले त्याप्रमाणे विरोधी पक्षाचे सदस्य स्थायी समितीच्या मिटींगमध्ये काही बोलत नाहीत, सभागृहात विरोध करतात, कुठेतरी विपर्यास होतो आहे. आम्ही जे बोलतो, सूचना करतो त्या रेकॉर्डवर घेत आहात का नाही. व्हिपमध्ये काय लिहिले आहे. बाई म्हणाल्या व्हिपमध्ये मंजूर असे लिहिले आहे. आम्ही सूचना मांडली. उपयोग केला आहे का नाही. तुमच्या हेतूबद्दल अजिबात शंका नाही. उपक्रमाला विरोध नाही. विरोध करायचा असता तर पहिल्यांदाच विरोध सांगितला असता. कामे करत असताना त्याच्या पाठीमागे ज्या गोष्टी येणार आहेत. आयुक्त हे ३ वर्षांसाठीच असतात. हा प्रकल्प कायमस्वरुपी महापालिकेत सुरु राहणार आहे. त्यानंतर आपण जबाबदारी घेऊ शकत नाही. आम्ही सूचना मांडली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांकडून बाकी पैसा कररुपाने उभारतो.*

*त्यातील १० कोटी प्रत्यक्ष कशावर खर्च करणार आहोत. कोर्सेस सुरु करत असताना I.C.U. मध्ये हद्दीतील लोकांना बेड उपलब्ध नसतात. आधीच एवढा खर्च करतोय, अजून १० कोटी खर्च करणार आहोत. पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेसमध्ये महाराष्ट्र पातळीवरील किंवा देशातील विद्यार्थी येणार आहेत. ॲडमिशन प्रक्रियेत एकाही नगरसेवकाची, महापौरांची शिफारस चालणार नाही. डॉक्टर भरताना पिंपरी चिंचवड मधील उत्तम दर्जाचे सर्व डॉक्टर्स भरले जातील. चांगली सेवा मिळते म्हणून आसपासच्या जिल्ह्यांतूनही रुग्ण ॲडमिट होत असतात. आम्ही कोणाला नाही म्हणू शकत नाही. आमचे नगरसेवक फोन करतात तेव्हा सांगतात, वाय.सी.एम. मध्ये आय.सी.यू. मध्ये जागा उपलब्ध नाही. आमच्या लोकांच्या पैशांचा वापर केला यात साशंकता वाटते. मनपाच्या नागरिकांना विशेष सुविधा असेल असे काही करणार आहात का? माजी नगरसेवक व त्यांच्या नातेवाईकांना सेवासुविधा करणार, मग नागरिकांसाठी काय असणार आहे. यांना ॲडमिशन द्यायचे नाही, त्यांनी ॲडमिट व्हायचे नाही याचा खुलासा केला पाहिजे. मुंबई मध्ये महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये MBBS सुरु केलेले आहे. पण त्यांचे बजेट राज्याच्या बजेट एवढे आहे. त्याचठिकाणी स्टेट गव्हर्नमेंटचे ग्रँट कॉलेज आहे. आपल्याकडे तसे नाही. संपूर्णपणे आपण पैसा खर्च करणार आहोत. घाईघाईने MOU आला, आम्ही मंजूर केला. कमिटीत कोण आहेत, त्यांची नावे काय हे आम्हाला माहित नाही. आमचा गैरसमज व्हायला नको. अशा कमिटींवर ठराविक सदस्य जातात. कृपा करुन आमची सूचना रेकॉर्डवर घ्या. त्यांचा काय-काय उपयोग करुन घेणार, या विषयावर चर्चा झाली पाहीजे. सर्व सदस्यांचे समाधान झाले पाहीजे. कोणाचा गैरसमज होता कामा नये. जे सभागृहात बोलतात, ते म्हणतात त्यांचे समाधान होते. अजून काही चर्चा केल्या जातील, विषय मंजूर करा. या गोष्टीचा खुलासा करा, आमच्या हद्दीतील नागरिकांसाठी १० बेड वाढवले तरी प्रायोरिटी रहात नाही. बेड होल्ड करु शकत नाही, त्या अर्थाने तुम्ही विचार केला पाहीजे.*

*मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, हा विषय सभागृहापुढे आणला आहे. पठाण बाई म्हणाल्याप्रमाणे प्राथमिक मिटींग घेतली. काही पदाधिकाऱ्यांनी माहिती दिलेली आहे. सर्वच नगरसेवक पहिल्यांदा निवडून आले आहेत. त्यांची भूमिका असते, घाईघाईने विषय मंजूर केला जाऊ नये. सर्वांना याची माहिती दिली गेली पाहीजे. मागील सभेमध्ये पाणीबिलाबाबत अभय योजना मंजूर केली. नागरिक नगरसेवकांना विचारतात, ते माहिती देऊ शकत नाहीत. त्यांची अशा प्रकारची मानसिकता झालेली आहे. असे प्रत्येक विषय होत असताना सर्व नगरसेवकांना याची सविस्तर माहिती मिळाली पाहीजे. कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याला शंभर टक्के माहिती मिळाली पाहीजे. तुम्ही डॉक्टर आहात. तुमची या मागची भूमिका आहे, शहरात कॉलेज व्हावीत, चांगल्या सेवासुविधा व्हाव्यात, चांगले डॉक्टर्स निर्माण व्हावेत. प्रत्येकवेळी डॉक्टर फी वाढवतात, त्याप्रमाणे कामे करावीत. आयुक्त बदलल्यानंतर त्यांच्या जागी दुसरे आयुक्त येतात. बऱ्याचवेळा मागील आयुक्तांनी केलेली कामे त्यांना मान्य नसतात. त्यांना पटत नाही. ते भूमिका बदलतात. मागील वेळी झालेल्या चुका पुन्हा कंटीन्यू करायच्या का. या प्रोजेक्टमुळे मनपाच्या तिजोरीवर दरवर्षी बोजा पडणार आहे तो पेलवणारा आहे का? त्या दृष्टीने*

*काय नियोजन केले आहे. १०/२० वर्षांचे नियोजन केलेतरी ते कितपत यशस्वी होऊ शकेल. मुंबई महापालिकेची परिस्थीती वेगळी आहे. त्यांच्याशी यासंदर्भात आपण तुलना करु शकत नाही. याच मिटींगमध्ये हा विषय मंजूर करणार अशी माहिती मिळाली आहे. वेळ कमी आहे. आत्ता मंजूर केले नाहीतर पुढील वर्षी कोर्स चालू करु शकणार नाही. फक्त हा विषय घाईघाईने मंजूर करु नये. करत असताना आपण दुसऱ्या बाजूने डॉक्टर आहात. आपण वाय.सी.एम.मध्ये शासनाचे डॉक्टर्स बोलवले ते आलेले सुद्धा आम्हाला माहित नाही. ते इथे काम करायला तयार नाहीत अशी माहिती मिळाली. जुन्या डॉक्टर्सना काढण्याचा निर्णय झाला आहे. ते अतिशय पूर्वीपासून काम करीत आहेत. वाय.सी.एम.मध्ये चांगली सेवा मिळते. याबाबतीत लोक समाधानी आहेत. बाकी सुविधा चांगल्या दिल्या पाहिजेत. फक्त आय.सी.यू. वॉर्डात बेड वाढवले पाहिजेत. आम्ही फोन करतो तेव्हा आय.सी.यू.त जागा नसते. पेशण्ट हलवणे शक्य नसते. पुढील जागा उपलब्ध झाल्यानंतर तिथे संधी मिळते. आय.सी.यू.त बेड वाढवता आले तर त्या पद्धतीने वाय.सी.एम. डेव्हलप केले तर पुढील काळात अशा सुविधा वाढवता आल्या तर, सर्वसामान्य नागरिकांना डोळ्यासमोर ठेवून डेव्हलप केले तर, पिंपरी चिंचवड शहरातील इतर रुग्णालये विकसित केली तर खरोखर करदात्यांना सुविधा मिळेल. हा निर्णय अतिशय घाईघाईने होतो आहे. माझी हरकत नाही. याची जबाबदारी सर्व सभागृहाने घ्यावयाची आहे. पुढील काळात प्रत्येक निर्णय घेताना सभागृहाला एवढे माहित झाले पाहीजे, सर्व सदस्यांना विषयाबद्दलचे ज्ञान मिळाले पाहीजे अशी विनंती आहे. मा.आर.एस.कुमार यांनी उल्लेख केला की, मागील काळात जे कोर्सेस चालवित होतो त्यात काही लोक संस्थानिक झाले होते. लाखात पैसे घेऊन ॲडमिशन घेतल्या आहेत. नगरसवेकांनी शिफारस केली तरी माणसे घेतली नाहीत. ही वेळ मागे होती. केवळ नगरसेवकांना कायदा शिकवू नका. प्रशासनाने सुद्धा कायदा पाळावा अशी माझी सूचना आहे.*

*मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, आपण जो विषय आणणार आहोत, अतिशय चांगला असणारच. यामध्ये चर्चा होते, एक कमिटी केली जाते. यात दोन नगरसेवकांचा समावेश केला जातो. जरुर केले पाहीजे. प्रत्येक वर्षी कमिटीत महापौर बोलतो. त्या पद्धतीनेच तो पदसिद्ध सदस्य असेल, आहे. ऑटोक्लस्टरमध्ये ५० कोटींच्या खर्चाचा ठराव केला. फक्त दोन सदस्य तिथे मिटींगला जातात. सायन्स पार्कमध्ये सुद्धा दोनच सदस्य असतात. याचे कायदेशीर समाधान करावे. हे बरोबर आहे का. महापालिका खर्च करते आणि २/३ नगरसेवकांचेच नाव त्या कमिटीत रहात असेल तर त्याला विरोध आहे. कायदेशीर असेल तर त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी ही माझी विनंती आहे.*

*मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, आपण जो विषय सभागृहात मांडला आहे. MBBS अभ्यासक्रमासाठी निश्चितच यासाठी अभिनंदन करतो. याठिकाणी चांगला विषय घेतला आहे. याठिकाणी विषय घेत असताना वाय.सी.एम.मध्ये जे डॉक्टर्स नेमले आहेत, त्याठिकाणी अपूरा नर्स स्टाफ, वॉर्डबॉय स्टाफ, त्यांच्या हाताखाली काम करणारे ते पुरेसे आहेत का, हे सुद्धा पाहीले पाहीजे. तर जास्त चांगल्या सुविधा तिथे मिळू*

*शकतात. सन्मा.सदस्य श्रीरंग बारणे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे, ऑटोक्लस्टरमध्ये मा.योगेश बहल व मा.मंगला कदम हे दोनच सदस्य त्या कमिटीवर आहेत. ऑटोक्लस्टरमध्ये कंपन्यांकडून सुद्धा पैसा आलेला आहे, ज्या मशिनरी आल्या. किमान विरोधी पक्षनेता या नात्याने आम्हाला त्याठिकाणी घेतले गेले पाहीजे. विरोधी पक्षाचा नेता या नात्याने सुद्धा मिटींगला बोलवले पाहीजे. ऑटोक्लस्टर काय कशासाठी बनवले आहे. किमान २ सदस्य तिथे जातात. यात कुठेतरी बदल केला गेला पाहीजे. याबाबतीत विशेष लक्ष देऊन अशी दुरुस्ती करावी अशी विनंती करतो. आपण हे कराल अशी अपेक्षा बाळगत आहे.*

*मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, मोठे प्रकल्प राबविले जातात. हा सूर पकडून आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या आहेत. नगरसेवक म्हणून मोठ्या प्रकल्पाची संपूर्ण माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. पूर्वी मनपात वेगळ्या प्रकारचा निर्णय होतो काय, ठराव मांडला जातो. मनपा सभेत नवीन सदस्यांना त्याबद्दल काही माहित होत नाही. मिटींगला बोलवत असताना दोन प्रकारचा भंवर निर्माण झाला आहे. गटनेत्यांना बोलवले जाते. प्रभागनिहाय संपूर्ण प्रकल्पाची माहिती सर्व सदस्यांना दिली पाहीजे, त्यांची मते घेतली पाहीजेत. सर्व शिजवले जाते. फक्त नैवेद्य दाखवण्यासाठी आमच्यापुढे ठेवले जाते. सभागृहाचे अधिकार कमी केले जात आहेत का असे वाटते. २ लोकांचा ठराव मांडला जातो. चर्चेसाठी सिनिअर लोकांना बोलवले जाते. नवीन सदस्यांना बोलवले जात नाही. मनात किंतू घेऊन बसलो असतो. कसला प्रकल्प आहे काय चालले आहे. बाईंच्या हातात पुस्तक आलेले आहे. असे पुस्तक अजेंडाबरोबर आले असते तर त्याचा अभ्यास केला असता. सर्वांना माहिती दिली असती तर नेमके काय ते कळाले असते. मा.कैलास कदम यांनी विषय मांडला, वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करतोय. अतिशय चांगली गोष्ट आहे. आत्ता मनपाची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली आहे. भविष्यात अशीच राहील का याची मनात शंका आहे. सर्व सदस्यांनी व्यथा मांडली हे सत्य आहे. आय.सी.यू.साठी कधीही फोन केल्यावर शंभर टक्के नकार येतो. हे सुद्धा पूर्णपणे सत्य आहे. सामान्य माणूस आय.सी.यू.ची मागणी करतो. त्याला आय.सी.यू. मिळत नाही. मोठ्या हॉस्पीटलमध्ये गरीबी असल्यामुळे जाऊ शकत नाही. सर्वसामान्य माणसाच्या फार थोड्या गरजा असतात. वाय.सी.एम. मधील आय.सी.यू. वॉर्ड अपूर्ण आहे तो कोण पूर्ण करणार. नवीन झोपडपट्टी प्रकल्प सुरु करणार. फार मोठमोठी स्वप्ने पाहतोय. बघायला हरकत नाही. आजतरी स्वप्न बघायची परिस्थितीच नाही. समाविष्ट गावांची परिस्थिती नव्याने मांडायची गरज नाही. जोपर्यंत नागरी सुविधा पाहिजे त्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत अशी मोठी उड्डाणे घेणे परवडणारे नाही. यापुढे सर्व सदस्यांना मोठमोठ्या उपक्रमांची माहिती याठिकाणी दिली पाहीजे. नाहीतर त्याच नगरसेवक पदाचा व अधिकारांचा हा फार मोठा अपमान असेल याची दखल याठिकाणी आपण घ्यावी.*

*मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी वाय.सी.एम.मध्ये चांगल्या पद्धतीचा कोर्स चालू करावा असा प्रस्ताव आयुक्तांनी मांडला आहे. हा विषय नाशिकच्या धर्तीवर*

*करावा असे म्हणतोय. त्याचा फायदा नागरिकांना होईल असे आयुक्तांचे मत आहे. खरोखरच वाय.सी.एम. मधून वैद्यकीय सेवा नवीन नगरसेवकांबरोबरच जुन्या लोकांना सुद्धा उपलब्ध केली. काल पांढरा हत्ती म्हणत होतो. याच्या जीवावर अनेक गोरगरीबांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे काम सर्व डॉक्टर्स गेली अनेक वर्षे करीत आहेत. अनेक सुधारणा केल्यातरी वाय.सी.एम. च्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. त्यामध्ये नवा गडी नवा राज्य तसाच प्रकार गेली १० वर्षे आम्ही पाहीला आहे. त्या-त्या आयुक्तांनी जी-जी सुधारणा वाटते ती-ती सुधारणा तिथे होत आलेली आहे. साहजिकच आहे. खर्चात वाढ होणार, प्रशासकीय कामकाजात बदल करावा लागणार. त्याचा परिणाम येणाऱ्या पेशंटवर,नागरिकांवर आमच्यासारख्या नगरसेवकांवर होणार. वाय.सी.एम.ला आज आतून पाहिले तर अनेक अडचणी सुद्धा आहेत. पोस्टमार्टेम विभागात लोक पर्मनन्ट नाहीत. छोटे-मोठे प्रश्न पाहिले तर ते बाजूला आहेत. ज्या ठिकाणी अतिशय गांभिर्याने काम केले पाहिजे तिथे हाणामारीचे प्रकार वारंवार घडत असतात. सेन्सिटीव्ह केसेसमध्ये सतत वाढ होत असते, त्यात काम करणारे कर्मचारी पर्मनन्ट नाहीत. अनेक वर्षे मागणी करुन सुद्धा पर्मनन्ट होत नाहीत. अशा पद्धतीचे कामकाज असेल तर चांगल्या सुविधा देऊन करणार काय असा प्रश्न मनात येऊन जातो. कितीही चांगल्या सुविधा द्यायचे म्हटले तरी वाय.सी.एम.चा फ्लो कमी होणार नाही तिथे खूप जास्त काम व्हावे अशी सर्वांची अपेक्षा आहे. १० वर्षांचे वाय.सी.एम. पूर्वीचे वाय.सी.एम. यात खूप फरक आहे. आपले स्वतःचे MBBS College व्हावे. तिथे D.Y.Patil College स्थापन झाले ते आपल्याच इन्फ्रास्ट्रक्चरवर त्यांना मान्यता मिळाली हे कोणापासून झाकून राहीलेले आहे. त्यांचे स्वतःचे हॉस्पीटल झाले. एक शासकीय हॉस्पीटल पुणे येथे असताना आपल्याकडे असे चांगले का असू नये असे वाटले. अनेक कायदेशीर अडचणी समोर आल्या. CPS आपल्याकडे असताना खाजगी संस्था आपल्याकडे बऱ्याचशा काळातील संस्था आहेत. त्यांच्या मान्यतेनुसार कामकाज चालते. ही संस्था महाराष्ट्रात पोस्टग्रॅज्युएट कोर्सेस घेते हे होत असताना इतर संस्थांनासुद्धा काम करायला परमिशन दिलेली आहे. प्रशिक्षण माध्यमातून गोष्टी होऊन वाय.सी.एम. मध्ये चांगली सेवा आली पाहिजे. प्रशिक्षणासाठी किंवा आर्टीकलशिपसाठी MBBS डॉक्टर्स पुढील शिक्षणासाठी प्रॅक्टीस करण्यासाठी चांगले हुशार डॉक्टर्स उपलब्ध व्हावेत म्हणून हा प्रस्ताव ठेवला आहे. याला बऱ्याच प्रकारच्या मान्यता लागतील. मनपाचे विश्वस्त म्हणून काम करत असताना मनपातील नागरिकांचा पैसा वापरला जाणार आहे. २८ कोटी या वर्षी १० कोटी प्रत्येक वर्षी खर्च करणार आहोत. कधीतरी वाटते आपल्या वॉर्डात २१४ कोटींपेक्षा जास्त खर्च देऊ शकत नाही. मात्र वाय.सी.एम. सारख्या ठिकाणी सुविधा सुधारण्यासाठी प्रत्येक वर्षी १० कोटी खर्च करतो आहोत. आजची इथली परिस्थिती नक्कीच चांगली आहे त्याबद्दल कोणी कधी तक्रार करणार नाही. इथला पेशंट कुठून संबंधीत असते. शहरातील नागरिक असतो, गोरगरीब असतो. ही सुविधा आजच व्हावी. पुढील वर्षी चालू व्हावी असे काही असावे असे माझ्यासारख्याला वाटत नाही. याची सुद्धा बरीच कारणे आहेत. ही सिस्टीम सुधारली तर आज हॉस्पीटल आजही बंद पडणारे चांगले चालू शकतात. काही अडचणी येतात. काही ठिकाणी आमच्या सूचना मा.सुलभा ऊबाळे यांच्या व आमच्या मागण्या चांगल्या असतात. त्या पूर्ण करत असताना चांगले चालू असलेले*

*हॉस्पीटलमध्ये सुधारणा करत असताना आर्थिक बोजा येणार असेल तर तो नको आहे. विकास कामांवर खर्च करा. आपण चार्ज घेतल्यापासून १००/१५० कोटींच्या वर्क ऑर्डर दिल्या असतील. प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. हा बोजा कशासाठी सहन करायचा. हॉस्पीटल बंद करण्यासारखी परिस्थीती असतीतर १००% मान्य करण्यासारखे असते. ही संस्था चांगली चालू असताना नवीन ॲडिशनल सेवा देऊ नयेत असे मला वाटते. चालू वर्षी देऊ नये पुढील वर्षी जाहिर करावे. शहराचा विकास करणे तेवढेच गरजेच आहे. वाय.सी.एम. मध्ये सुधारणा करत असताना १ वर्ष उशीरा चालू केले तर १००% काही फरक पडणार. I.C.U. २० बेडचे करणार. आमच्याकडे औंध ऊरो रुग्णालय ४०० बेडचे पेंशट इन्फ्रास्टक्चर उपलब्ध आहे. शासनाची मदत आहे. अतिशय वाईट परिस्थीती होती. शासनाच्या मदतीने आमदार जगताप पाठपुरावा करीत आहेत. तिथे दिले तर शहराच्या दुसऱ्या बाजूला काहीतरी चांगले करु शकतो. एकाच ठिकाणी केंद्रीत सेवा करण्यापेक्षा वैद्यकीय सेवांचे विकेंद्रीकरण करावे. वाय.सी.एम. वरील लोड वाढणार आहे. एकीकडे पुणे ऊरो रुग्णालय दुसरीकडे वाय.सी.एम. असेल तर नागरिकांचा भार कुठेतरी वाटल्यासारखे वाटेल. रुग्णाला पुन्हा यायची वेळ येणार नाही असे उपचार आपण देऊ शकतो असे आमच्यासारख्याला वाटते. आपण डॉक्टर असल्यामुळे कोणाच्या परमिशन लागतात, काय लागते तुम्हाला माहित आहे. संस्था म्हणून बऱ्याच गोष्टींची मंजूरी लागते. जागा कोणाची असेल. शासनाच्या नियमानुसार असेल का. तुम्हाला कोर्स चालू करायचा आग्रह असला तरी मला वाटत नाही या विषयाला कोणी विरोध करेल. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील डॉक्टर्ससाठी ३०% जागा आहेत व दोन्ही शहरांत आमचे येणे-जाणे वास्तव्य असते. संचेती, रुबी ही पुण्यातली चांगली रुग्णालये आहेत. आपल्याकडे बिर्ला, लोकमान्य ही चांगली सेवा देणारी रुग्णालये आहेत. MBBS करणाऱ्यांचा फ्लो चांगला आहे. शहरातील नागरिकांना कोर्से करण्यासाठी ३०% जागा पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवतात. जेणेकरुन त्यांना या प्रशिक्षणाचा फायदा होईल. आज करणे गरजेचे नाही असे माझे म्हणणे आहे. कॅन्सर सेंटरचे टेंडर काढले होते. असे चांगले चांगले महत्वाचे कक्ष, प्रकल्प बंद करण्याबाबत निर्णय घेतला, का घेतला. कुठेतरी प्रशासकीय अडचण होते. ती पुन्हा येऊ नये म्हणून नंतर कदाचित कॅन्सर सेंटरबाबत निर्णय घेतला तर याबाबतीत इतकी चर्चा झाली, पवार यांनी प्रेझेंटेशन दाखवले तरी ते प्रत्यक्षात होऊ शकले नाही. वाय.सी.एम.मध्ये सुधारणा करायचीच असेल तर ज्या वैद्यकीय सेवा बंद पडलेल्या आहेत, डिस्टर्ब आहेत, त्या कशा सुधारता येतील, नीटनेटकेपणे कशा देता येतील हे पहावे असे मला वाटते. आम्ही जे सदस्य उपस्थित आहोत. या सेवा चालू करण्याला माझा या गोष्टीला १००% विरोध आहे. आपल्या आजच्या परिस्थीतीत यापेक्षा अंतर्गत सुविधा जास्त महत्वाच्या वाटतात, त्या कराव्यात. माझी या निमित्ताने नोंद घ्या. या सुधारणा आधी कराव्यात नंतर हे करा.*

*मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, नवीन प्रकल्प सुरु होत असताना निश्चितच दोन प्रकारचे मतप्रवाह असतात. काही प्रकल्पांवर फायद्यातोट्याचा विचार केला जातो. वैद्यकीय सेवा, आरोग्य सेवा, रस्ते, पाणीपुरवठा या मूलभूत सेवा सुविधा पुरवणे मनपाचे*

*आद्य कर्तव्य असते. प्रथमत: आयुक्तांचे विशेषत: महापौरांचे मनपासून अभिनंदन करतो. या पार्श्वभूमीवर ज्यावेळी आपण १९९४ला सुद्धा वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा ठराव केला होता. त्यानंतरच्या अनेक वर्षांच्या कालखंडानंतर आपल्या माध्यमातून विषय आणला आहे. आयुक्त साहेबांनी त्यांच्या कक्षात बोलवले. पठाण बाईंनी आत्ता जी वस्तुस्थिती मांडली त्याच्याशी मी सहमत आहे. मी पण त्यांचा विद्यार्थी आहे. सगळ्यांना कळाले पाहीजे ही माझी भूमिका आहे. आमचे गटनेते मा.कैलास कदम यांनी मिटींगला हजर राहील्यानंतर एक तासातच मला कळवले. त्यांनी आम्हाला सगळ्यांना विस्तृतपणे कळवणे महत्वाचे होते. निश्चितच मिटींगमध्ये काहीजण होते त्यांना समजले. सर्वांना समजले नाही या गोष्टीशी मी सुद्धा सहमत आहे. हे माझे पक्षीय मत आहे, व्यैयक्तिक मत आहे. हा विषय आणणे अतिशय आवश्यक आहे. फायदा तोट्याचा विचार करायला महापालिका ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही. या सर्व पार्श्वभूमीवर ठेकेदारांची सल्लामसलत झाली आहे. महापालिकेच्या योजना ठेकेदारांसाठी चालवतो का अशी परिस्थीती आहे. एकीकडे वाय.सी.एम.मध्ये सुविधा मिळत नाहीत. प्रत्येकाला व्यैयक्तिक मत मांडण्याचा अधिकार आहे. तो स्वतंत्र भाग आहे. हे सर्व करणे महत्वाचे आहे. अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराची कुरणे सातत्याने वाढत आहेत. आपले राज्य आपल्या पद्धतीने चालले आहे. नियमाप्रमाणे, बायलॉजप्रमाणे MBBS, BHMS डॉक्टर असतील त्यांची वर्गवारीनुसार भरती केली जाते. हा नियम मी २० वर्षांत कधी बोललो नाही. आयुक्त साहेब स्वत: डॉक्टर असल्याकारणाने ही अपेक्षा आहे. वर्गीकरणातून २ कोटी वाढवले. यासाठी निश्चितच या गोष्टीसाठी आमचा पाठिंबा आहे. विस्तारपूर्वक चर्चा झाली पाहीजे. आयुक्तांनी विषय आणला आहे. सभागृहाला विषयाचे महत्व सांगितले पाहिजे. मत परिवर्तन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉक्टर उपलब्ध होतात. रात्री २.०० वा. गेलोतर त्रास घ्यावा लागतो व माल द्यावा लागतो. वाय.सी.एम.च्या नावावर किती लोकांनी किती पैसा कमवला. किती महाविद्यालये उभारली गेली. आपले वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा विषय असता तर जास्त बरे झाले असते. या विषयाला पाठिंबा देत असताना काही सदस्यांना, कोणाकोणाला घ्यावयाचे याची नोंदणी येईल. तसे न घेता काही विशिष्ट कालावधी ठरवून घ्यावेत, त्यात बदल करावा. सर्वपक्षीय गटनेत्यांना येऊ द्या. तुमचे तिथे काय काम असे नसावे. सहकार समिती नेमावी. त्यापद्धतीने कारभार चालवावा. वाय.सी.एम. हॉस्पीटल हे सेवेचे साधन आहे, उत्पन्नाचे साधन नाही हे लक्षात असावे. तुमच्या विषयाला पाठिंबा देतो. हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, प्रथमत: आयुक्तांचे याठिकाणी अभिनंदन करतो. आपण ज्यावेळी आयुक्त म्हणून आलात त्यावेळी सदस्यांच्या मनात भिती होती की हे अतिक्रमणाचे आयुक्त आहेत का? नंतरच्याकाळात वाय.सी.एम.मध्ये डॉक्टर म्हणून लक्ष घातले. त्याठिकाणाची दुकानदारी बंद केली त्याबद्दल प्रथमत: अभिनंदन करतो. शहरात वाय.सी.एम.हॉस्पीटल हे वरदान आहे. शहरातील बरेचसे नागरिक, कार्यकर्ते तिथे वैद्यकीय सेवा घेतात. इतकी चांगली सेवा होत असते. शहराच्या बाहेरील जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरचे लोक सुद्धा सेवा घेण्यासाठी येतात. त्यामुळे तिथे फार लोड आलेला आहे. डॉक्टर कमी पडत आहेत. सी.पी.एस. डॉक्टर लागत असतात. इमर्जन्सीमध्ये*

*डॉक्टर इतके चांगले आहेत. मोठ्या रुग्णालयांना व्हिजिट देत असतात. डॉ.श्री.जगदाळे, डॉ.अय्यर, डॉ.नागकुमार यांच्याशी चर्चा करायचो. मानसेवी डॉक्टरांचा विषय तसाच राहिला आहे. सी.पी.एस. कोर्स चालू केला. त्यामुळे डॉक्टर्स उपलब्ध झाले. त्यांच्या हाताखाली काम करणारी मुले तिथेच आहेत. त्यामुळे वाय.सी.एम. ला चालना मिळाली. मधल्या काळात भारतीय सर्वसंस्था (बी.व्ही.जी) ही कोणती सर्वसंस्था ते कळत नाही. डी.वाय.पाटील यांनी सुरुवातीला वैद्यकीय कॉलेज चालू केले. वाय.सी.एम. त्यांच्यासाठी चालू होते. आता त्यांनी स्वत: मोठे हॉस्पीटल त्याठिकाणी चालू केलेले आहे. त्याचा वटवृक्ष झालेला आहे. त्यावर त्यांनी करोडो रुपये कमवले आहेत. एका डॉक्टरच्या कोर्ससाठी अॅडमिशन घेण्यासाठी दीड लाख असे ६० डॉक्टर्स ६ महिन्यांसाठी असे करोडो रुपये त्यांनी कमवले. स्थायी समिती सदस्य होतो त्यावेळी प्रवेश पर्सनल कमिटी करावी. स्थायी समितीने यात लक्ष घालावे. बराचसा कारभार वेगळा चालत होता त्यावर आपण लक्ष ठेवा. बरीचशी बंधने आली होती. कॅन्सर हॉस्पीटल चालू करण्यासाठी बरेचसे प्रयत्न केले. पुढे त्याचे काय झाले कळत नाही. वाय.सी.एम. व्यतिरिक्त शहरात बरीचशी मान्य हॉस्पीटल्स् आहेत. नेहरूनगर, यमुनानगर सेक्टर २२ मध्ये डिलिव्हरी वॉर्ड आहे. डिलिव्हरीसाठी लेडीज पेशंट येतात. ती व्यवस्थित असेल तर नॉर्मल डिलिव्हरी केली जाते. रक्त कमी असेल तर, सिजर करायचे असेल तर ताबडतोब वाय.सी.एम.ला पाठवतात. विशेषत: तिथे डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. मोठे हॉस्पीटल बांधले आहे. कर्मचारी आहेत. तरी हॉस्पीटल व्यवस्थित चालत नाही. चांगले डॉक्टर दिले तर ते व्यवस्थित चालेल. ३ दिवसांपूर्वी प्राधिकरणात ॲक्सिडंट झाला. वाय.सी.एम. मध्ये चौकशी केली. मेंदू तज्ञ उपलब्ध नाही ससूनला घेऊन जा असे सांगितले. २/३ पेशंट शिफ्ट करावे लागले. परिस्थिती नसताना गोरगरिबांना रोजरोज १०/१५ हजार जमा करावे लागले. दुसऱ्या दिवशी बाईने सोने गहाण ठेवून पैसे आणले. ट्रिटमेंट चालू झाली. ॲक्सिडेंट झालेल्या पेशंटसाठी इतर डॉक्टर्सवर लोड येतो आहे. कामाची मर्यादा असते. कायमस्वरुपी मेंदूतज्ञ घेतले तर निश्चितपणे चांगले सहकार्य लाभेल. यात लक्ष घालावे. MBBS कोर्सेसबद्दल प्रामुख्याने सर्वांचे अभिनंदन करतो. हे कोर्स सुरु झाले पाहीजेत. शहरातील मोठमोठ्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत नाही. त्यामुळे या कोर्सच्या ॲडमिशनसंदर्भात शहरातील लोकांना सहकार्य करावे अशी विनंती करतो.*

*मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, हा निश्चितच चांगला निर्णय घेतला वाद नाही. १/२ सूचना वाय.सी.एम. बद्दल करावयाच्या आहेत. नवीन धोरण काढले आहे. महिलांचे डिलिव्हरी डिव्हीजन आहे त्यात फ्रि करण्याची तरतूद रद्द केलेली आहे. वाय.सी.एम. मध्ये मॅक्सिमम मिडल क्लास महिला डिलिव्हरीसाठी येतात. चांगली आर्थिक परिस्थीती असलेले प्रायव्हेट हॉस्पीटल्स् मध्ये जातात. गरीबलोक फी माफी साठी येतात. ४० टक्के माफी मिळते. शहरातील गरीब महिला वाय.सी.एम.मध्ये डिलिव्हरीसाठी येतात तेव्हा त्यांना तरी बिलात निश्चतपणे माफी मिळावी. पूर्वी वाय.सी.एम.मध्ये इंगोळे यांच्या मुलीला संध्याकाळी अचानकपणे कळा यायला लागल्या. त्यावेळी तिथे कोणी डॉक्टर नव्हते. ट्रिटमेंट देऊ शकलो नाही. तेव्हा डॉक्टर म्हणाले*

ससूनमध्ये घेऊन जा. अशी परिस्थिती होता कामा नये. स्पेशल डिलिव्हरीचा पेशंट आला त्याला काही कारण नसताना बाहेर जावे लागत असेल तर दुर्देवाची बाब आहे. परवा आपण आकुर्डी हॉस्पिटलला व्हिजिट दिली. आपल्या निदर्शनास आले की, सकाळी किती गर्दी असते. सेवा किती कमी आहे. राज्य शासनाच्या अधिनियमात नियम करुन हॉस्पीटलची जागा कमी असेल तर फेरबदल करावा. लवकरात लवकर हॉस्पीटलचे विस्तारीकरण आपण करावे. येणाऱ्या बजेटमध्ये तरतूद करावी. १०० बेडचे हॉस्पीटल करावे. मनपाचा FSI यूज करा. बाजूला जागा पडली आहे. तिथे दुसरे आरक्षण असेल तर ते बदल करण्यासाठी नगररचना यांचे सहाय्य सुद्धा घेऊ. मिनी हॉस्पीटलची गरज आहे. याची मंजूरी जाहीर व्हावी. आम्हाला वाय.सी.एम. पर्यंत यावे लागू नये. इथे आजूबाजूच्या ग्रामीण भागातील जुन्नर, नगर, वडगाव इथून अनेक लोक उपचारांसाठी येतात. अनेक नागरिकांना वेळेअभावी उपचार देऊ शकत नाही. आकुर्डी हॉस्पीटल इथे काय पाहिजे याबद्दल ठोस पाऊले उचलली तर बरे होईल.

मा.सुजाता पालांडे :- मा.महापौर साहेब, वाय.सी.एम.चा विषय खरोखरीच सर्व नगरसेवकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. कायदा विभागाचा M.O.U. नुसार पिंपरी चिंचवड मनपा नाशिक मनपा यांच्या विद्यमाने जे MBBS पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू करीत आहे. याबद्दल आमच्या सगळ्यांकडून हार्दीक अभिनंदन करते. मा.शितोळे यांनी सांगितले त्याप्रमाणे प्रयोगशील बाब करतोय. पुढे पाऊल टाकतोय. मग ठोस वळण पहायचे आहे. बरीचसे वॉर्ड व्यवस्थित चालत नाही. एक महिला म्हणून बर्न वॉर्डची आवश्यकता सगळ्यात जास्त आहे. शहराची १६ लाख लोकसंख्या असताना ९ लाख स्त्रिया आहेत. कधी स्त्रिया जाळून घेतात, कधी अपघाताने जळल्या जातात. बर्न वॉर्डची अतिशय आवश्यकता असूनही आपण ते आजपर्यंत करु शकलो नाही याची खंत वाटते. वारंवार पेशंट येतात. रात्री येणाऱ्या पेशंटला उत्तर दिले जाते, वाय.सी.एम.मध्ये जागा नाही. OPD साठी सुद्धा जागा नाही हे सुद्धा खंताची बाब आहे याच्यावर सुद्धा विचार करावा.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, MBBS नंतरचा पदव्युत्तर अभ्यासक्रम यासाठी आम्हाला हरकत नाही. बरेच सदस्यांनी सूचना केल्या आहेत, टिका केलेली आहे. मला टिका करायची नाही. खाडे यांनी सांगितले, लेबर रुममध्ये सिझर करण्यासाठी वाय.सी.एम. मध्ये आणले जाते. त्यापुढील कथा सांगतो. वाय.सी.एम. चे लेबर रुममध्ये ३/४ पेशंट एकाच बेडवर असतात. अतिशय लहान विभाग आहे. डिलिव्हरी झाल्यानंतर पेशंटला जमिनीवर टाकले जाते. मी स्वत: तिथे २ तास होतो. मला माहित आहे. त्यानंतर भयानक परिस्थिती म्हणजे जायला यायला प्रॉब्लेम होतो. NICU मध्ये जागा उपलब्ध नसते. फक्त ६ बेड उपलब्ध आहेत. पेशंट बाहेर पाठवण्याचा सल्ला दिला जातो. बाहेरील हॉस्पीटलमध्ये दिवसाचे १०/१५ हजार गोरगरीबांकडून वसूल केले जातात. NICU व लेबर रुम तेवढी एक्सटेंड करावी तेवढे करावे. मा.शेख यांनी सांगितले, पहिल्या व दुसऱ्या डिलिव्हरीसाठी पेशंटला नॅशनल प्रोग्राममध्ये मोफत केले आहे. ते आपल्याकडे केलेच पाहीजे. या नियमाप्रमाणे माफ झाले पाहीजे. ही

*सुविधा वाय.सी.एम.मध्ये मिळत नाही. वारंवार याची तक्रार करतो, विनंती करतो. सगळ्यात मलाच त्रास होतो म्हणून विनंती आहे. रेशनकार्डात महिलांचे नाव नसते हा सुद्धा एक मोठा प्रॉब्लेम आहे. लग्न झाल्यानंतर मुलगी सासरी निघून जाते. तिचे नाव सासरच्या रेशनकार्डात लागते. ती जेव्हा डिलिव्हरीसाठी माहेरी येते तेव्हा तिच्याकडे सासरचे रेशनकार्ड उपलब्ध नसते. मी केलेल्या सूचनांचा निश्चित विचार करावा.*

*मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, मनपाचे एवढे मोठे हॉस्पीटल आहे. तिथे गेलेला पेशंट तिथे न घेता पुणे इथे ससून हॉस्पीटल मध्ये घेऊन जा असे सांगतात. मा.सुजाता पालांडे यांनी सांगितले की, बर्नींग केसेस जळालेले पेशंट घेतले जात नाहीत. विषबाधेचे पेशंट सुद्धा आपल्याकडे घेत नाहीत. मोठे हॉस्पीटल असून सुद्धा ३ प्रकारचे पेशंट आपल्याकडे घेतले जात नाहीत, सुविधा उपलब्ध केल्या जात नाहीत. ३ प्रकारच्या पेशंटसाठी अशा ट्रीटमेंट दिल्या जाव्यात, त्यांच्यासाठी उपचार केले जावे, त्यांच्यासाठी आपल्याकडून कोऑपरेशन केले जावे. संपूर्ण महाराष्ट्रातून लोक येतात. पिंपरी-चिंचवडमध्ये सोय नाही हे आपण बोलणे योग्य नाही. ससूनला पेशंट घेऊन जा असे म्हणणे योग्य नाही. निश्चित विषयासंदर्भात योग्य निर्णय घेऊन त्याच्यावर कार्यवाही करावी.*

*मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, खरोखरच कमिश्नर साहेबांनी खूप चांगला विषय घेतला आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपल्याला जास्तीत जास्त मदत मिळणार आहे. जो मनुष्य त्या क्षेत्रातील असतो तो त्याच्याकडे पहिले लक्ष देतो. आयुक्त स्वत: डॉक्टर असल्यामुळे नक्कीच आरोग्याला प्रायोरिटी देणारे आहेत. खरोखरीच गरजेची गोष्ट असणार आहे. त्यासाठी लोकांनी खर्च करणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढली असताना वाय.सी.एम.मध्ये डॉक्टर उपलब्ध नसतात. इतर ठिकाणचे पेशंट वाय.सी.एम.मध्ये शिफ्ट करावे लागतात. त्या-त्या ठिकाणी दवाखाने आहेत. काम करत असताना याची पहिल्यांदा दक्षता घ्या. काही डॉक्टर्स लोकांना वाय.सी.एम. पलिकडे अस्तित्व नाही. चऱ्होलीसारख्या ठिकाणच्या निवासींसाठी सुद्धा डॉक्टर तिथे ग्रामीण भागात गेले पाहीजेत. अशा गोष्टींना डॉक्टरने नाही म्हणता कामा नये. जिथे बदल्या केल्या आहेत, तिथे व्यवस्थित नियोजन करावे. यात विरोध करण्यासारखे काही नाही. शिक्षण मंडळाचे बजेट जास्त द्या. जास्त सुविधा मिळाल्या पाहीजेत. तशाच प्रकारचा हा प्रश्न आहे. आम्ही तुमच्याबरोबर नक्कीच असणार आहोत. कमिश्नरांकडून सांगण्यात आले की, तातडीच्या सेवेसाठी असे करता आले तर ताबडतोब करु. नागरिकांच्या कराचा पैसा असला तरीसुद्धा वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर सुविधा देतात. मनपाच्या दृष्टीकोणातून काम करणार. पिंपरी चिंचवडच्या नागरिकांच्या करातून पैसा उपलब्ध होतो. नागरिकांसाठी सुद्धा सुविधा व्यवस्थितरित्या उपलब्ध झाल्या पाहीजेत. याचीही दक्षता कुठेतरी घेतली पाहीजे. कोर्स केला आहे व्यवस्थित चालणार नाही. कधी परीक्षा नाहीत. स्टूडंट घेणार आहोत. त्याची फी अगदी कमी आहे. आपल्याकडे कोर्स चाललेला आहे. मा.आर.एस.कुमार यांनी आरोप केले. त्यावर कारवाई न करणे योग्य ठरणार आहे. सी.पी.एस.चे स्टूडंट आहेत. हे*

*जाहीररित्या बोलण्यासारखे आहे. कोर्स खरोखर बंद झाला का हे तुमच्या मनाला विचारा. परत ६ महिने, पुढील ६ महिने निघाल्यानंतर व्यवस्थित बजेट होते. डी.वाय.पाटील कॉलेजला मान्यता दिली. पिंपरी चिंचवड शहरात त्यांच्यासारखे मेडिकल कॉलेज नाही. तिथे पिंपरी चिंचवडचे पेशंट जातात. कुठेतरी कायद्याचे बंधन असले पाहीजे. या समितीतून मंजूरी केली गेली पाहीजे. मा.जितेंद्र ननवरे यांनी सांगितले तशी वाय.सी.एम.मध्ये खरोखरच परिस्थीती आहे. जोपर्यंत छोटी हॉस्पीटल्स् चांगले वर्कींग करत नाही, तोपर्यंत वाय.सी.एम.मध्ये लोड असणारच. डिलिव्हरी केसेसमध्ये अशा अडचणी येतात हे मनपाच्या दृष्टीकोणातून म्हणतो. वेळ आल्यावर डिलिव्हरी झालेल्या पेशंटला खाली बेड टाकून दिले असले तरी मनपाच्या दृष्टीकोणातून जीवदान दिले आहे ही गोष्ट खूप महत्वाची आहे. सभागृहात नागरिकांसाठी येतो, किती दु:ख झाले की महिलांसारख्या, डिलिव्हरीसारखे विषयाच्या गोष्टी इथे घेतो आहे. यात नक्कीच लक्ष घातले गेले पाहीजे. न्युरोसर्जन आपल्याकडे होते. यात आपल्याकडे खूप राजकारण केले जाते. प्रायव्हेट दवाखान्यांची दुकानदारी चालू आहे. आपल्याकडे डॉ.फाळके एक चांगले डॉक्टर होते. यांच्यावर राजकारण केले गेले. ते जिथे आहेत, चांगल्या पद्धतीने पिंपरी चिंचवडच्या नागरिकांची सेवा करीत आहेत. त्यांना राजकारण करुन काढले गेले. ही गोष्ट सुद्धा नोंद करुन घ्या. डॉक्टर डॉक्टरमध्ये राजकारण केले जाते. डेड हाऊसमध्ये गेलो तर पहिला फ्लोअर, तिसरा फ्लोअर आहे. ग्राऊंड फ्लोअरची बॉडी काढताना खालचा गाळा नाही. तिसऱ्या फ्लोअरवरची बॉडी कशी काढणार. अजूनही व्यवस्था केली गेली पाहीजे. ८०/९० किलोची बॉडी काढू शकत नाही. त्यामुळे तिसऱ्या फ्लोअरचा वापर करु शकत नाही. ही सुविधा फॉलो करुन लक्ष दिले गेले पाहीजे. १२ फूट हाईटवरुन कर्मचारी बॉडी काढून खाली आणू शकणार नाही. खरेतर हे होणे गरजेचे आहे. काही काळानंतर खर्च आटोक्यात आणला जाईल असे सांगितले. एखादा रस्ता कमी झालातरी चालेल, नागरिकांचे आरोग्य चांगले असले पाहीजे. या दृष्टीकोणातून आपला वाटा नक्कीच मोठा आहे. हा विषय महापालिका सभेत सर्वांना सांगू इच्छिते की, प्रत्येक नगरसेवकाकडे मग तो कोणत्याही पक्षाचा असो, त्याच्याकडे त्याच्या पक्षाचे व्हिप असते. कॉंग्रेस,शिवसेना, बी.जे.पी. हे विरोधी पक्षात आहे म्हणून त्यांचे व्हिप नाही असे नाही. विषय आणणार असेल तर पक्षाच्या सिनिअर लोकांना गटनेता केलेले आहे, त्यांनी त्यांच्या सदस्यांसमोर विषय मांडणे गरजेचे आहे. त्यांना विश्वासात घेऊन मा.महापालिका सभेपुढे येतो. या विषयावर चर्चा केली जाणार नाही,याचे उत्तर आयुक्त देणार नाहीत असे नाही. जेवढे- जेवढे नगरसेवकांना माहिती पाहीजे, तितका नक्कीच चांगला खुलासा दिला जाईल. अजून एक विनंती आहे, ७० डॉक्टर्स भरणार आहोत, डॉ.नरसिंग कॉलेज आपल्याकडे झाले तर लेक्चरर्सचा उपयोग करुन घेता येईल. १००/१५० कोर्सेस मिळाले तरी नक्कीच उपयुक्त होईल. जेव्हा सूचना होईल, तेव्हा स्विकारावी अशी विनंती करते. निश्चित पुन्हा एकदा आयुक्तांचे, महापौरांचे अभिनंदन.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे. Precaution is better than cure. आयुक्त साहेबांनी चांगला विषय आणला आहे.*

*विविध पक्षप्रमुखांनी या विषयावर चर्चा केली. कशासंदर्भात हा विषय चुकतो आहे हे नमुद केले. प्रत्येकाने विषयाचे स्वागत केले, कौतुक केले आहे, अभिनंदन केलेले आहे. मा.श्रीरंग बारणे, मा.भाऊसाहेब भोईर व इतर माननीय असतील. पहिल्या मिटिंगमध्ये सांगितले होते, ज्या O.P.D. आहेत, नगरसेवकांचे पेशंट, चेकआऊट पेशंट, हद्दीबाहेरचे पेशंट त्यांच्या बाबतच्या उपचारांसाठी बजेट आहे. त्यामुळे नागरिकांची, आमच्या कार्यकर्त्यांची गरज वाढते, गैरसोय होते. मा.तानाजी खाडे, मा.जितेंद्र ननवरे, मा.जावेद शेख यांनी परिस्थिती मांडली आहे. विविध विभागांतून लोकांना त्रास सहन करावा लागतो आहे. आपण चांगली संकल्पना आणली. सर्व पक्षाचे सर्व प्रमुख, आजी-माजी पदाधिकाऱ्यांना सुद्धा बोलवतो. काँग्रेस, मनसे, शिवसेना प्रत्येक पक्षाचे प्रमुख असतात. उल्लेख केला नाही त्या-त्या गटनेत्यांना बोलवणे माझ्यासारख्याची जबाबदारी आहे. आपआपल्या दालनात व्हिप देत असतोच. ज्यांच्या मनात शंका असेल तर त्यांना विचारायला पाहीजे. हे सांगण्यात वेगळा हेतू आहे. कोणाच्या अधिकारावर गदा आणू इच्छित नाही. प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. विचारावे, विधिवत सूचना करणे सर्वांना क्रमप्राप्त आहे. सभागृहाचा वेळ वाचवायचा आहे. सर्वांना हे अवगत करायचे आहे. ऑटोक्लस्टरमध्ये लोकप्रतिनिधींची मिटींग घेतली. लोकप्रतिनिधी होते, नगरसेवक होते. आयुक्तांच्या दालनात दोनदा मिटींग घेतली. डॉक्टर कसे उपलब्ध होणार ही खंत मा.तानाजी खाडे यांनी मांडली. तिथे डंबिंग होते ते कसे कमी होईल याची माहिती दिल्यानंतर आम्ही सर्वांनी मिळून ठरवले हरकत नाही अर्धा कोटींचा अतिरिक्त बोजा पडला तरी करायचे ठरले. तरीसुद्धा इतकेच बोलावे लागले हे खऱ्या अर्थाने विरोधी आहे. गट प्रमुखांनी मान्यता दिल्यानंतर सुद्धा लांबड झाली. आमची विनंती आहे, भविष्यात अधिक बोजा पडणार, तो कसा कमी करता येईल. रुबी, बिर्ला सारखी रुग्णालये खऱ्या अर्थाने नोटांचे छापखाने आहेत. तिथे गेल्यावर पहिल्यांदा वॉर्डामध्ये ॲडमिट करुन ट्रिटमेंट चालू केली जाते. फिल-अप करायला अर्ज दिला जातो. नाव, गाव, व्यवसाय विचारुन त्याप्रमाणे चार्ज लावला जातो. रु.१,१०,०००/- बील असेल तर कर्मचाऱ्याला रु.१,७०,०००/- इतके द्यावे लागतात. ३/४ लाख द्यावे लागतात. माझी विनंती आहे की, अशाप्रकारचे पेशंट आल्या-आल्या IPD त घेतले जात नाही. १५ दिवसांनंतर बील ९ ते १० हजार येते. खेड, मंचर, बीड, उस्मानाबाद येथून पेशंट येत असतात. ठेकेदार मोठा बिल्डर असतो. तो कोणालातरी आम्हाला फोन करील. गरीब पेशंट आहे. माझ्या साईटवर काम करतो. एवढे पैसे होतात, थोडे भरले आहेत. बाकी बील माफ करा. खरोखर इथल्या करदात्यांना सुविधा मिळाल्या पाहिजेत. हे लोक वंचित राहतात. यांची जबाबदारी राज्य शासनाची आहे. त्यांनी ससूनला गेले पाहिजे. त्यांची जबाबदारी आपण उचलतोय. २ मुलांपर्यंत बाळंतपणाचे बील माफ केले तरी चालेल. असे outdoor patient, we should move to Sasoon. What is wrong that? IPD केल्यानंतर त्याच दिवशी पेशंटची माहिती फिल-अप केली गेली पाहीजे. डिपार्टमेंट हेडला कळवले पाहिजे. १२० पेशंटमध्ये ४० पेशंट हद्दीबाहेरील असतील तर त्यांची टक्केवारी किती, हा डाटा आपल्याकडे ताबडतोब उपलब्ध असला पाहीजे. असे काहीतरी तयार करा. एकूण खर्चापैकी नागरिकांवर किती खर्च करतो याच्यासाठी standard line-up करावा लागेल. बाहेरील लोकांचा बोजा किती घेणार. मा.सुलभा*

*ऊबाळे यांनी सांगितले, ऑपरेशन वॉर्ड पाहिजे. मा.जितेंद्र ननवरे यांनी सांगितले, premature babyला बाहेर नेले तर १५ ते २० हजार पर्यंत वाट्टेल तसे पैसे घेतात. ३ दिवस झाल्यावर आई इतकीच बाळात ताकद असते. हा सुद्धा विषय अजेंडावर घ्यावा असे माझे मत आहे. असेच सभागृहाचे मत असेल तर पहिल्या व दुसऱ्या बाळंतपणाचे बील माफ करावे. तिसरे बाळंतपणाचे वेळी बील चार्ज केले गेले पाहिजे. घरकाम करणाऱ्या, धुणी-भांडीवाल्या बाईंची याउलट परिस्थिती असते. त्यांना ५ ते ६ मुले असतात. Standard decide केला पाहीजे. दोन बाळंतपणांपर्यंत फ्री केले गेले आहे. झोपडपट्टी व बाधीत क्षेत्रात राहतात, त्यांना वेगळा एरिया दिलेला आहे. जे परवाने आम्ही अपेक्षित करतो त्यामुळे आर्थिक बोजा पडणार आहे. आम्ही सूचना करतो. चर्चा केली. सहभाग घेतला. बारीक-सारीक सूचनांचा साकल्याने विचार करावा. Implementation कसे करणार? याचा विचार करावा लागणार आहे. पुनःश्च एकदा मनापासून सभागृहाच्यावतीने स्वागत करतो, आभार मानतो. मंगलाताईंनी या विषयावर सूचना केल्या. नर्सिंगचे कोर्सेस महाग होत आहेत. परिचारीकांची बाजू समजून घेऊन चांगला विषय समोर आणला. भविष्यात चांगल्या पद्धतीच्या नर्सेस उपलब्ध व्हाव्यात. ANM चालू करुन व B.Sc. नर्सिंगचा कोर्सही चालू करावा. Memorandum Of Understanding दिलेला आहे. त्यात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करुन सदरच्या उपसूचनेसहीत हा विषय मंजूर करावा अशी विनंती करतो.*

A) ROLE OF THE MUHS, NASIK :

c. 10% of PG seats (sanctioned at MUHC PCMC institute) will be reserved for in-service candidates of PCMC as per State Government/Medical Council of India rules. The course fee should be paid by the candidate on his own & the candidate must appear for Govt. CET exam. **& should be eligible to get admission to P.G. courses.**

iii. After designation the existing Doctors, Medical Officers / Superintendent of PCMC hospital as per MCI guidelines as mentioned in point no. iv above remaining post for teaching staff will be created by MUHS **in consultation c PCMC** for such subjects where there is no eligible Doctors, Medical Officers / Superintendent of the PCMC hospital are available or where the available Doctors of PCMC hospitals is / are unwilling to render his / their additional services as Teachers / professors / faculty for the said PG Institutes. Full times Teachers / professors / faculty / teachers will be appointed on contractual basis. Salary will be paid through the fund allocated by PCMC to PG Institute of Pimpri Drawing and Disbursing Authority shall be Dean of PG Institute.

vi. The finance and accounts of the PG institute shall be managed and maintained by the Dean of the institute in consultation with Finance and Accounts Officer of the PCMC and as per the guidelines of the MUHS & PCMC from time to time.

8. Other students related activites shall be done by the MUHS as decided by the Vice-Chancellor/Registrar of the MUHS in consultation with the concerned officer of the PCMC. i.e. Commissioner.

**B) ROLE OF THE PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION :**

i. The office of the Municipal Commissioner, PCMC shall be controlling authority for the hospitals, through Dean & Medical Superintendent.

viii. The Dean shall be appointed by the Joint Committee of MUHS & PCMC. The service of the Dean shall be governed by the rules and regulations of the MUHS and he shall perform his duties as directed by the MUHS and Commissioner, PCMC.

& PCMC should start Nursing College i.e. B.Sc. Nursing & ANM course in YCM Hospital. Budget provision for the same & additional staff should be made to run the course in YCM Hospital.

*मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) :- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स, NHUC यात ग्रॅज्युएट मेडिकल कोर्स सुरु करण्याचा विषय ठेवला आहे. या विषयाबाबत २५ ऑगस्ट २०१२ रोजी ऑटोक्लस्टरमध्ये एक दिवसीय सेमिनार घेतले होते. सन्मा. पदाधिकारी, गटनेते उपस्थित होते. त्यांच्या समवेत डॉ.संचेती, डॉ.जामकर,कुलगुरु, आरोग्य विद्यापीठ यांच्याबरोबर चर्चा केली होती. त्याप्रमाणे विषय सभागृहासमोर आणला आहे. सदर विषयाबाबतीत नमूद करतो की, महापालिकेवर ५० कोटींचा बोजा पडणार आहे. पहिल्या टप्प्यात भांडवली गुंतवणूक केवळ १८ कोटी आहे. त्याचे बायफरकेशन दाखवतो. नवीन ऑपरेशन थिएटरसाठी-८ कोटी, मेडिकल इन्स्ट्रूमेंटसाठी-५ कोटी,बसभाडे-होस्टेलसाठी-३ कोटी, लायब्ररीसाठी-१ कोटी. असा पहिल्या वर्षासाठी १८ कोटी भांडवली खर्च राहणार आहे. दरवर्षी १० कोटी खर्च येणार आहे. १० कोटी खर्च एकूण मागील बजेटचा विचार करता जास्त नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. वैद्यकीय विभागाचे या वर्षाचे बजेट १३८ कोटी आहे त्यात १०*

कोटींची वाढ जास्त नाही असे माझे मत आहे. यात एकूण १०५ डॉक्टर तात्पुरत्या स्वरुपात मिळणार आहेत. प्रथमतः वाय.सी.एम.चे ३० डॉक्टर absorb केले जाणार आहेत. १० ते १५ वर्षे काम केलेले डॉक्टर आहेत. तज्ञ डॉक्टर म्हणून काम करतील. नवीन ७५ डॉक्टर घ्यावे लागतील. पिंपरी-चिंचवड व नंतर पुणे येथील डॉक्टर्सना प्राधान्य दिले जाणार आहे. नवीन विद्यार्थ्यांना फायदा मिळेल असे नवीन ७५ डॉक्टर्स मिळतील. पहिल्या वर्षी ३३, दुसऱ्या वर्षी ६६, तिसऱ्या वर्षी ९९ डॉक्टर्स होतील. ९९ डॉक्टर्स हॉस्पीटलमध्ये व ७५ टिचर्स असे एकूण १७४ डॉक्टर्स तिसऱ्या वर्षापासून होतील. १० ते ११ कोटी खर्च करुन १७४ डॉक्टर्स मिळत असतील तर निश्चितच महापालिकेच्या फायद्याची बाब आहे. रुग्णालय हे मंदीर असते. तिथे जाणाऱ्यांच्या जिवन-मरणाचा प्रश्न असतो. बऱ्याचशा डिलिव्हरी होतात, इमर्जन्सी केसेस होतात. अनेक ठिकाणी टिका केलेली आहे. हॉस्पीटल बांधण्यासाठी, उपकरणांसाठी, टेक्नॉलीजी उभारण्यासाठी मोठा खर्च केला जातो. पण मुख्य या देवळातला देव पाहिजे तोच नसतो. पुणे महापालिकेने येरवडा इथे राजीव गांधी हॉस्पीटल ८ कोटी खर्च करुन बांधले आहे. ते पूर्ण वेळ चालत नाही कारण तिथे डॉक्टर नाहीत. १० ते ११ कोटी खर्च करुन १७४ डॉक्टर्स मिळवता येत असतील तर वर्षभरात रुग्णसेवा सुधारणार आहे याची खंत बाळगू नये. मुंबई महापालिकेचा संदर्भ देण्यात आला. मुंबई महापालिकेची स्वतःची सायन, नायर, के.ई.एम. अशी ४ हॉस्पीटल्स् आहेत. तिथे सुपर स्पेशालिटी अतिशय चांगली आहे. मराठवाडा, विदर्भातील रुग्ण तिथे उपचार घेतात. बाहेरील रुग्णांना थोडातरी चार्ज आकारला पाहीजे. पिंपरी चिंचवडमधील रुग्णांना प्राधान्य मिळाले पाहीजे. बाहेरील रुग्णांना सुद्धा सेवा दिली पाहीजे. याबाबत निश्चितपणे पॉलिसी करत आहोत. सी.पी.एस. डॉक्टरच्या सिलेक्शनबाबत भानगड झाली. माझ्या कानावर आले होते. यावेळी भरती प्रक्रियेत मी स्वतः लेखी परीक्षा घेतली आहे. इंटरव्यू घेतले आहेत. चालू वर्षात पारदर्शक भरती प्रक्रिया केली म्हणून मला बराचसा त्रास झाला हे सांगायला हरकत नाही. डॉक्टरचे रजिस्ट्रेशनसुद्धा कंटीन्यू झाले आहे. काही कोर्सेस बंद केलेले आहेत. आयुर्वेदीक कोर्सेसला मेडीकल कौन्सिलची मान्यता नसल्यामुळे बंद केलेले आहे. वाय.सी.एम. हे ॲलोपेथिक रुग्णालय आहे. त्यामुळे त्यांना मेडिकल कौन्सिलचे नियम लागू आहेत. त्यांची मान्यता असावी लागते. त्यांची मान्यता घेतल्यानंतर कोर्सेस सुरु करण्याबाबत विचार करता येईल. पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस साठी पिंपरी चिंचवड शहरातील डॉक्टर्सना प्रथम प्राधान्य, नंतर पुण्याच्या डॉक्टर्सना व नंतर इतर ठिकाणचेही डॉक्टर उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांना प्राधान्य दिले जाईल. एकूण १०० विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थी १५ वर्षे काम करीत आहेत. MBBS, MDMS कोर्स असलातरी १०% कोटा राहील. एकूण विद्यार्थी Govt. of Maharashtra CET यातूनच निवडले जातात. स्थानिक लेवलवर निर्णय घेता येणार नाही. सरकारी मेरीटप्रमाणेच विद्यार्थी घेतले तरच गरीब, होतकरु, हुशार डॉक्टर मिळतील. मॅनेजमेंट कोटा ठेवला तर श्रीमंत मुले मिळतील. रुग्णांकडे कितपत लक्ष देतील हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. Govt. of Maharashtra, Director of Medical Research यांचे नियम लागू असतील. नागपूरची मुले असतील तर ती नागपूरच्याच कॉलेजला प्राधान्य देणार. आज पुण्यात बी.जे मेडीकल, ससून ही पदवी महाविद्यालये आहेत. निश्चितच ते

*विद्यार्थी पोस्टग्रॅज्युएट कोर्सेससाठी इथे प्राधान्य देतील. पिंपरी-चिंचवड व पुण्यातील ३०% पर्यंत मुले असतील त्यांच्यासाठी MOU करतो आहोत. आयुक्त बदलले तरी हरकत नाही. ज्यांच्याशी MOU करतोय, ते Govt. of Maharashtra चे सदस्य आहेत, विद्यापीठ कुलगुरु, महाराष्ट्र राज्यातील आहेत. हा महाराष्ट्र शासनाचा एकत्रित उपक्रम आहे. आयुक्त बदलले तरी शासनाच्या संस्थेशी करारनामा केल्यामुळे ही जबाबदारी संस्थेची आहे. उपक्रम खंडीत होईल या मताशी मी सहमत नाही. आज आपल्याला याची गरज नाही. वाय.सी.एम.च्या सुविधा पुरेश्या आहेत. कदाचित असा मुद्दा जो आला आहे. १९८९ मध्ये हे हॉस्पीटल सुरु केले होते. सुरु केले तेव्हा एवढे हॉस्पीटल कशाला बांधले, एवढा खर्च कशाला केला असे म्हटले जात होते. आज २०३०चे नियोजन करतोय, २०४०चे नियोजन करायला केंद्र शासन सांगतेय. त्याप्रमाणे नियोजन केले तरी पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या ४० ते ४२ लाख असणार आहे. एवढे नियोजन करताना तेवढ्या सुविधा अपग्रेड करणे गरजेचे आहे. वाय.सी.एम. हे ॲलोपेथिक हॉस्पीटल असल्यामुळे सुपर स्पेशालिस्ट सुविधा सुद्धा देता आल्या पाहीजेत. मेंदू उपचार होऊ शकतील. युरो सर्जन आज आपल्याकडे नाही. उद्या अशी सुपर स्पेशालिस्ट सेवा सुरु करणे अपरिहार्य आहे. ससूनप्रमाणे वाय.सी.एम. हे सुद्धा पब्लिक हॉस्पिटल आहे. ससून हॉस्पीटल हे महाराष्ट्र शासन चालवते. वाय.सी.एम. मनपा चालवते. ससूनप्रमाणेच आपल्याकडे डॉक्टर पाठवा त्याप्रमाणे तसेच ३५ डॉक्टर उपलब्ध झाले आहेत. ७/८ डॉक्टरचा प्रश्न समोर आला आहे. ते काम करायला तयार नाहीत. ते डॉक्टर पोस्टग्रॅज्युएट ॲनॅमेटोलॉजी एम.डी. झाल्यानंतर कुठेतरी लेक्चररशिपसाठी शिक्षक म्हणून लागणार आहेत. प्रत्यक्ष उपचारांसाठी ते पुढील आयुष्यात उपयोगात येणार नाहीत. पण शासनाच्या अटीचा भाग म्हणून एक वर्ष वेळ देणे बंधनकारक आहे. पुन्हा एम.डी.साठी निवडले गेले असले तरी इंटर्नशिप केल्यानंतर त्यांना एम.डी.ला प्रवेश घेता येईल. तशा पद्धतीच्या तक्रारी आल्या आहेत. यापुढे अशा पद्धतीचे सुपर क्लिनिकल मेडिकल कॉलेज आमच्याकडे नसल्यामुळे असे डॉक्टर देऊ नका असे सांगितलेले आहे. हा अंडरग्रॅज्युएट कोर्स असल्यामुळे यापुढे असे डॉक्टर्स नको. किती डॉक्टर्स MBBS धर्तीवर काम करु शकत असतील तर ठिक आहे. नाहीतर परत पाठवू. दोन दिवसांपूर्वी असेच सुपर स्पेशालिस्ट सर्जन मागवून झाले. ३ प्रकारचे सर्जन १) पेडिॲट्रीक सर्जन, २) प्लास्टीक सर्जन व ३) युरो सर्जन - किडनी उपचारांसाठी असे किमान ३, यातील युरो क्रोमेज व एक्स्ट्रान्युरोलॉजिस्ट यांची मागणी केली होती, ते उपलब्ध झालेले नाहीत. पोस्टग्रॅज्युएट असण्याबाबतच्या सूचनेत निश्चितपणे लक्ष घालता येईल. डिलिव्हरी चार्जेसबाबतीत पुढील स्थायी समितीमध्ये विषय आणतोय. केंद्र शासनाची जननी सुरक्षा योजना फायदेशीर ठरू शकते. लवकरच डिलिव्हरी चार्जेस रद्द झाल्याचे दिसून येईल. अनेक मान्यवर म्हणाले की, वाय.सी.एम.वर लोड येतोय. पेशंटला जमिनीवर ठेवावे लागते. वाय.सी.एम. सुरु झाले त्याच्या चार पट लोकसंख्या आता झाली आहे. म्हणून २५ ऑगस्टला महापौरांच्या अध्यक्षतेखाली कॉन्फरन्स घेतली होती. वाय.सी.एम.च्या अपग्रेडेशनचा मुद्दा, लवकरच पुढील बॉडीपुढे विषय घेऊन येऊ. जिजामाता, आकुर्डी, थेरगाव, सांगवी इथल्या दवाखान्यांना मी ८ दिवसांत भेट दिलेली आहे. तालेरा रुग्णालय लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. इनडोअरचा काही भाग*

*राहीला आहे. तालेरा डिसेंबरमध्ये सुरु होऊ शकेल. भोसरी रुग्णालयात OPD करुन हॉस्पीटलचे बजेट वाढवू शकतो. ७० बेडचे आहे ते १०० ते १२० बेड पर्यंत वाढवता येऊ शकते. जिथे जिथे जागा उपलब्ध आहे तिथे थेरगाव रुग्णालयात १० बेड उपलब्ध करु शकतो. सांगवी रुग्णालयाला FSI उपलब्ध झालातर १५ ते २० बेड वाढवता येऊ शकतील. जेवढया मर्यादेत उपलब्ध होईल तेवढे वाढवता येऊ शकते. थेरगाव इथे दोन अडीच एकराचा प्लॉट उपलब्ध होऊ शकतो. जिजामाता रुग्णालयाचा काही भाग फ्लड लाईनमध्ये येतो. संपूर्ण २/३ मजले वाढवून टप्याटप्याने प्रोव्हिजन करता येऊ शकते. नगररचनाच्या ९५च्या डि.पी.मध्ये जिथे म्हणताल तिथे हॉस्पीटलची प्रोव्हिजन आहे. ४० बेडची गरज लक्षात घेता, २/३ कि.मी. च्या एरियामध्ये हॉस्पीटल नाही. आकुर्डी रुग्णालय केले तिथे housing resourses आहेत. मार्केटचे आरक्षण बदलण्याबाबत विचार सुरु आहे. तिथे मोठे हॉस्पीटल करता येऊ शकेल. वाय.सी.एम. बाबतीत तसे त्याच्याजवळपास प्लॉट आहेत, तसे इतर हॉस्पीटलबाबत बेड कसे वाढवता येतील, कसे नवीन पद्धतीचे असेल हा प्रस्ताव आणतोय. प्रायमरी प्रीव्हेन्टीव्ह डिस्पेन्सरी व केअर दिले जाते. खालचे हॉस्पीटल वीक असल्यामुळे प्रत्येकजण वाय.सी.एम.मध्ये येतो. इथल्या स्तरावर पिंपरी चिंचवडच्या चांगल्या सुविधा असतील. नंदूरबार, वाशिम यांची लोकसंख्या आपल्या शहराएवढी आहे. अशा ठिकाणी सर्व व्यवस्था जिल्हा रुग्णालयात असते. सगळे पेशंट जिल्हा रुग्णालयात येतात. आपल्याकडे लोकसंख्येच्या मानाने प्राथमिक केंद्रे कमी आहेत. आपल्याकडे २२ डिस्पेन्सरीज आहेत. साधारणत: ६० डिस्पेन्सरीज्ची आवश्यकता २०३० मध्ये आहे. २०३० मध्ये अजून ४० डिस्पेन्सरीज् सुरु कराव्या लागतील. त्यांच्या जागा ताब्यात घेऊन नागरिकांना जिथे डिस्पेन्सरी उपलब्ध नाही तिथे सुरु करणे ही प्रक्रिया सुरु केलेली आहे. ते २ महिन्यांत घेऊन प्रस्ताव आपल्यासमोर येतोय. कॅन्सर स्क्रिनींग मनपाच्या रुग्णालयात असावे अशी महत्वाकांक्षा आहे. मध्यंतरी डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्वीसेस व डायरेक्टर ऑफ हेल्थ एज्युकेशन यांचे विभाजन झाल्यामुळे डीस्ट्रीक्ट हॉस्पीटल वेगळे होऊन औंध इथे झाले, तिथे कॅन्सर हॉस्पीटल मंजूर केलेले आहे. औंध हॉस्पीटल पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्हींना जवळ होईल. म्हणून आपला प्रकल्प रद्द केलेला आहे. त्यात क्लिनीक एकच असेल. याचा अर्थ कॅन्सर सुविधा मनपाच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध होणार आहे. बर्न वॉर्ड बाबत बिल्डींग बाधित असेल तर, वाय.सी.एम. किंवा अन्य महत्वाची रुग्णालये जसे तालेरा इथे बनवण्याबाबत विचार करता येऊ शकेल. साधारणत: NICU बाबत महत्वाचा मुद्दा आला. पिडीऑट्रीक वॉर्डबाबत, आय.सी.यू.तील बेड वाढवण्याबाबत, जागा identify करण्याबाबत सांगितलेले आहे. पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट सुरु होईल. Upgradation करणार. सर्पदंश सारख्यांचा उपचाराकरीता ७५ टिचर्स उपलब्ध होतील त्यातून यांची उपलब्धता होईल. वाय.सी.एम. च्या सर्वीस फ्लोअरवर भंगार ठेवले आहे, तो पूर्ण उपलब्ध आहे. आयते इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध होणार आहे. Undergraduate college सुरु करणार, बरीच जागा लागते. मेडीकल नकाशाप्रमाणे किमान २५ एकर जागा पाहीजे. त्यासाठी दुसरा टप्पा म्हणू शकतो. आधी postgraduate सुरु केले पाहीजे. त्यासाठी education व पोस्ट महत्वाचा क्रायटेरीया असल्यामुळे सेकंड फ्लोअर सर्वीस फ्लोअर स्वच्छ करुन बांधणार आहोत. यमुनानगर रुग्णालयात पुष्कळ जागा संपूर्ण*

*जागा रेडझोनमध्ये येते. नवीन बांधकाम करता येत नाही. नजीकची जागा उपलब्ध झाली तर तिथे करता येईल. दुसऱ्या टप्प्यात इतर रुग्णालयांकरिता सर्जन, फिजिशियन, ॲनॅलिस्ट, बालरोगतज्ञ यांची नियुक्ती नोव्हेंबर शेवटपर्यंत करणार आहोत. नरसिंग कॉलेजबाबत कौन्सिलला विनंती करुन नकाशाचे डिजाईन घेऊन नंतर आपल्याला अवगत करु.*

*मा.विनया तापकीर :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- ११७ विषय क्रमांक :- ५*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच /ॲकॅड/कावि/३०८/१२ दि.१/०९/२०१२*
*२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०७१ दि.४/९/२०१२*

*कायदा विभागाने दिलेल्या MOU (Memorandum Of Understanding) च्या प्रारुपानुसार व अभिप्रायानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व MUHS नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने वाय.सी.एम. रुग्णालयात व महापालिकेच्या इतर रुग्णालयात एम.बी.बी.एस नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम चालु करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच अभ्यासक्रमाचे अनुषंगाने करावयाचे Memorandum of Understanding चे प्रारुप परिच्छेदांमध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करणेस मान्यता देणेत येत आहे.*

<u>MEMORANDUM OF UNDERSTANDING</u>

C) ROLE OF THE MUHS, NASIK :

c. 10% of PG seats (sanctioned at MUHC PCMC institute) will be reserved for in-service candidates of PCMC as per State Government/Medical Council of India rules. The course fee should be paid by the candidate on his own & the candidate must appear for Govt. CET exam. **& should be eligible to get admission to P.G. courses.**

iii. After designation the existing Doctors, Medical Officers / Superintendent of PCMC hospital as per MCI guidelines as mentioned in point no. iv above remaining post for teaching staff will be created by MUHS **in consultation** c

**PCMC** for such subjects where there is no eligible Doctors, Medical Officers / Superintendent of the PCMC hospital are available or where the available Doctors of PCMC hospitals is / are unwilling to render his / their additional services as Teachers

/ professors / faculty for the said PG Institutes. Full times Teachers / professors / faculty / teachers will be appointed on contractual basis. Salary will be paid through the fund allocated by PCMC to PG Institute of Pimpri Drawing and Disbursing Authority shall be Dean of PG Institute.

vi. The finance and accounts of the PG institute shall be managed and maintained by the Dean of the institute in consultation with Finance and Accounts Officer of the PCMC and as per the guidelines of the MUHS & PCMC from time to time.

8. Other students related activites shall be done by the MUHS as decided by the Vice-Chancellor/Registrar of the MUHS in consultation with the concerned officer of the PCMC. i.e. Commissioner.

**D) ROLE OF THE PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION :**

ii. The office of the Municipal Commissioner, PCMC shall be controlling authority for the hospitals, through Dean & Medical Superintendent.

viii. The Dean shall be appointed by the Joint Committee of MUHS & PCMC. The service of the Dean shall be governed by the rules and regulations of the MUHS and he shall perform his duties as directed by the MUHS and Commissioner, PCMC.

& PCMC should start Nursing College i.e. B.Sc. Nursing & ANM course in YCM Hospital. Budget provision for the same & additional staff should be made to run the course in YCM Hospital.

*अनुकूल-१७* *प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्रमांक
क्रिडा/६/कावि/६५७/२०१२ दिनांक २५/७/१२
२) मा.क्रिडा समिती सभा दि.१/८/२०१२ ठ.क्र.१७
३) मा.विधी समिती सभा दि. ३१/८/२०१२ ठ.क्र.४९
४) मा.स्थायी समिती सभा दि. ११/९/२०१२ ठ.क्र.११००

मनपाचे संत ज्ञानेश्वर क्रिडा संकूल, इंद्रायणी नगर, भोसरी येथील ॲथलेटिक्स ट्रॅक, हा ॲथलेटिक्स सराव व स्पर्धेसाठी व स्पर्धेसाठी भाडयाने देणेबाबत व प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे अटी व शर्ती व भाडे दर निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, प्रथमत: हा विषय आणल्याबद्दल अभिनंदन करतो. या संकूलाचे उद्घाटन होऊन ३ वर्षे झाली. आज महापालिका सभेपुढे विषय आलेला आहे. परिपत्रक का तयार केले. हा मोठा प्रश्न निश्चित आहे. ऑथोरिटीज् यांना माहित नसेल म्हणून असे परिपत्रक काढले होते. माझी स्वत:ची तिथे व्हिजिट झ ाली. आजदेखील ६/६ फूट गवत वाढले आहे. आरोग्याचे ऑफीस उघडण्यात आले आहे. महाराष्ट्रात ५/६ सिंथेटीक ट्रॅक असले तरी एवढे चांगले पिंपरी-चिंचवड शहरात, पुणे जिल्ह्यात नाही. बालेवाडी स्टेडियमवर व सणस ग्राऊंडवर असा सिंथेटीक ट्रॅक केलेला आहे. एवढे सुंदर केलेले आहे. ३ वर्षांत या ट्रॅकवर कोणी व्यायाम करत नाही का आठवत नाही. आज सांगितलेले आहे हा तक्ता तयार केलेला आहे. एका दिवसासाठी रु.३००/-, एका बॅचसाठी रु.६००/-, सॉफ्टवेअर खेळाडूंसाठी रु.३०००/-, क्रिडासंघांना रु.३००/- , अजून अनामत रक्कम १५,०००/- घेतो. खेळाडू तयार करत असतो. पिंपरी चिंचवड शहरात मैदाने कमी आहेत. २/३ चांगल्या दर्जाची तयार केलेली आहेत. मतदार सांगतात, त्यांची तयारी झाली आहे. त्यांच्यासाठी अवमानक गोष्ट आहे. सुंदर ट्रॅक तयार केला गेला आहे. जागा व ट्रॅक गोल सर्व योग्य केलेले आहे. अजून चालू केलेले नाही. पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंना ॲथेलिटिक्सच्या सरावासाठी बालेवाडी किंवा सणस ग्राऊंड इथे जावे लागते. आपले क्रिडा अधिकारी किंवा क्रिडा समिती यांना मुळात नॉलेज नाही आणि तयार केलेले आहे. ते पाहिल्यावर खरोखर हसायला येते. रु.३००/- दर लावला आहे. ज्येष्ठ नागरिक जॉगिगसाठी जाणार. भोसरीतले बरेचसे सिनिअर

*सिटीझन कबड्डी खेळतात. जॉगिंगसाठी जाणार हा कुठला नियम काढला आहे. ॲथलेटिक्सचा सराव महीनोंनमहीने चालू ठेवावा लागतो, जेणेकरुन तो पुढे प्राविण्य मिळवत असतो. इंटरनॅशनल खेळाडूंसाठी विनामूल्य केलेले आहे. या स्टेजवर पोहोचण्यासाठी या लेवलवर जाण्यासाठी ग्राऊंडवर जाण्यासाठी एवढे रेट लावले असतील तर तो का जाणार. प्राधिकरणात बसने जाण्याची व्यवस्था नाही. हा ट्रॅक खेळाडूंसाठी शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत दिला पाहीजे. I.T. तल्या खेळाडूंना तेवढा चार्ज करा. एकतर स्पर्धा होत नाहीत. क्लब्ज् ना स्पर्धा घ्यायची मान्यता नसल्यामुळे त्यांच्याकडे कॅश पैसे नसतात, बक्षिसरुपाने त्यांना मेडल्स्, कप्स् असे मिळतात. मेहनत करुन, लाँग डिस्टंस राऊंड करत राहतात, तिथे आपण त्यांना रु.३००/- आकारतो. क्रिडा अधिकाऱ्यांना त्याचे ज्ञान नाही. शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये क्रिडा शिक्षक आहेत. शाळेची वेगळी कमिटी व क्रिडाची वेगळी कमिटी आहे. यांच्यात समन्वय नाही. शाळेत कोण क्रिडा शिक्षक येणार आहे याची त्यांना कल्पना नाही. ॲथेलेटिक शिकवणारा कबड्डी शिकवतो, कबड्डी शिकवणारा वेगळेच शिकवतो. यात समन्वय नाही. अधिकारी वर्गही खेळतो चांगले आहे.  पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंसाठी काय नियोजन कराल. मुख्याध्यापकांना विचारा क्रिडा शिक्षक कोण त्याला बोलता येणार नाही. क्रिडा शिक्षकांना महापौर चषक घेणे या पलिकडे काही माहित नाही. एक सामान्य बील केलेतर एक कोणत्या कमिटीवर असतो, एक व्यायामशाळेवर असतो. ते म्हणतात आमच्या हातात काही नाही. ही कमिटी स्थायी समितीकडे जाणार. चांगली व्यक्ती पाहीजे. साफसफाई करणारे आरोग्य खात्याला कामच नाही. जागा मिळाली, ताबा घेतो तिथे आरोग्य खात्याने ताबा घेतला नाही. ते म्हणतात आमचे काम नाही. ते चालढकल करायचे काम करत आहेत. क्रिडा समितीचा खरेतर वाईट अनुभव आहे. मी, महेश लांडगे, राजेश पिल्ले व राजू मिसाळ आम्ही २/४ वर्षांपूर्वी क्रिडा समितीत होतो पण आम्हाला काही करता आले नाही. अधिकारच नाहीत. अधिकाऱ्यांना अजिबात नॉलेज नाही. विनंती आहे, सभागृहात ठराविक चर्चेतून बोलावे. नगरसेवकांनी बोलावे, अधिकाऱ्यांनी बोलावे. आपण मेडीकल फिल्डमध्ये एक्सपर्ट आहात. मा.योगेश बहल बॅडमिंटनमध्ये एक्सपर्ट आहेत. पिंपरी चिंचवड शहरात चांगले खेळाडू घडविण्यासाठी चांगले ग्राऊंड उपलब्ध केलेले आहेत. धिंग्रा मैदानाचे निविदेतून रिपेअरिंग काढलेले आहे. मेंटनन्स करण्यासाठी ९ महिने झाले आहेत. हे प्राधिकरणातील एकमेव ग्राऊंड आहे. ९/१० महिने मुलांना खेळण्यासाठी परमिशन नाही. लॉन करण्याचे चालू  आहे. लॉन किती दिवस टिकणार परमेश्वराला माहिती आहे.  उद्या तिथे ग्राऊंडमध्ये क्रिकेट असू द्या, त्याठिकाणी खेळायला संधी मिळत नाही. रु.३००/- दर लावणार असाल तर नियमित पास लावणार का. प्रत्येक ठिकाणी शंभर रुपये चार्ज लावणार का. प्रत्येक ठिकाणी फि  ठेवणार का. ॲथेलेटिक्स हा खेळ सगळे खेळतील. मोफत खेळासाठी सगळे क्लब्ज्, कॉलेजेस् येऊ द्या, त्यांना मोफत ठेवा. ट्रॅक खराब होण्यासारखी वस्तुस्थिती दिसत नाही. ही नम्र विनंती आहे, सगळे शिक्षक, मा.योगेश बहल तुम्ही बॅडमिंटन कोर्टचा दर वर्षी ताबा घेतला आहे. बाकीच्यांचे काय. मी सुद्धा बॅडमिंटन खेळतो. माझ्याकडे बॅडमिंटन कोर्ट आहे, टेनिस कोर्ट आहे. ॲडव्हान्स बुकींग होते. प्राधिकरणात टोटल कमर्शियल काम चालू आहे. कोर्ट वर्षभरासाठी बुक करतात. आपण*

*करायचे, दुसऱ्याला पैसे कमवायला द्यायचे अशी परिस्थिती आहे. याच्यासाठी पैसे घेतोय पण ॲथेलेटिक्ससाठी पैसे घेतोय योग्य नाही. माझी विनंती आहे. मा.महेश लांडगे इथे बोलतील.*

*मा.रामदास बोकड :- मा.महापौर साहेब, याठिकाणी क्रिडा समितीच्या वतीने विषय आला आहे. मी क्रिडा समितीत असल्यामुळे आदरणीय महापौरांना, आयुक्तांना सूचना करणार आहे. आदरणीय सहकारी उल्हास शेट्टी हे जरी गमतीने बोलले असले तरी वावगे बोलले नाही. क्रिडा विभागाची सत्य परिस्थिती इथे मांडली आहे. प्रामुख्याने सांगावयाचे आहे, आयुक्त क्रिडा समितीत मिटींग करत असताना ४/५ मिटींग झाल्या, त्या-त्या वेळी विषय घेतला, प्रामुख्याने क्रिडा समितीत क्रिडा कर्मचाऱ्यांचा कुठे कुठे वापर केला आहे याचे प्रथमत: आयुक्तांनी आढावा घेणे गरजेचे आहे. शाळांसाठी १९ क्रिडा शिक्षक आहेत. परंतू १२च शाळेमध्ये काम करतात. उर्वरीत निवडणूकीच्या कामांत, दोन ते अडीच वर्षांसाठी नेमलेले आहेत. अशा समितीला अधिकारच नाहीत ही खेदाची बाब आहे. राज्यस्तरीय स्पर्धांसाठी खर्च झाला. त्या प्रत्येक ठिकाणी जाऊन पाहिले तर पिंपरी चिंचवड मनपाचा एकही विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेत आला नाही. ही खऱ्यारितीने दु:खाची बाब आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. क्रिडा विभागातील कर्मचारी इथे ठेवला आहे. इतर विभागात पाठवला आहे. क्रिडा समितीला देऊन काय फायदा आहे. क्रीडा समितीचे सर्व कर्मचारी सर्व क्रिडा शिक्षक क्रिडा विभागात आणा जाणिवपूर्वक या विभागात लक्ष देणे गरजेचे आहे. क्रिडा विभागात परिस्थितीच तशी आलेली आहे हे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. अधिकारी नेमलेले ते मात्र सारवासारव करत आहेत. आपल्या नावाखाली चुकीची उत्तरे देत आहेत. शिक्षकांसंदर्भात विचारल्यावर अधिकारी सांगतात, दोघांचीच वर्षांपूर्वी निवडणूकीच्या कामासाठी नेमणूक झालेली आहे. आम्ही यात काही करु शकत नाही. पिंपरी चिंचवड मनपातील गुणवंत, यशवंत खेळतात. शाळांमध्ये शिक्षकांची गरज आहे. सर्व क्रिडा समितीचे सदस्य बसले आहेत. सर्वांनी एकमताने सांगीतले आहे, पुढील वर्षी क्रिडा शिक्षक क्रिडा विभागात आले नाहीतर क्रिडा समितीच्या मिटींगला बसणार नाही असे सभागृहात सांगतो. अनेक खर्च करतो, त्याचा उपयोग नाही. पैसा दिसतो. शाळेच्या ग्राऊंडचे ५/८/१९९४ला आरक्षण टाकले. अजून काही झालेले नाही. १८ गुंठे जागा आहे. ९ गुंठे टी.डी.आर. झाला. ९ गुंठे जागेत घरे आहेत. मुलांना खेळण्यासाठी क्रिडांगण नाही. आरक्षण झाले तरी काय खेळाडू घडवणार. हे विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज हा विषय अजेंडावर आल्यामुळे क्रिडा विभागाचे जे काही सर्व कामगार आहेत. निवडणुकीसाठी अडीच वर्षे पाठवले आहे, त्यांना आपल्या अधिकाराखाली ऑर्डर रद्द करुन आपल्याकडे आणावे. शाळेतील मुलांना घडवण्यासाठी पाठवावे अशी विनंती करतो. ९ गुंठे जागेतील राहिलेल्या जागेत क्रिडांगण डेव्हलप करावे. त्यांचा नुकसानभरपाई अर्ज पुराव्यानिशी आयुक्तांकडे दिलेला आहे. बऱ्याचशा क्रिडा शिक्षकांचे २ वर्षांचे पेमेण्ट बाकी आहे. माझ्या माहितीप्रमाणे क्रिडा शिक्षकांची मध्यंतरी पगारवाढ झाली,त्याचा फरक त्यांना २ वर्षांपासून मिळाला नाही. यापुढे विनंती करतो, आयुक्त या नात्याने जर निवडणूक*

*विभागाला कळवले आम्हाला कर्मचारी कमी पडत आहेत. आयुक्त व महापौरांना विनंती करतो, जे-जे कर्मचारी आहेत, ते परत याठिकाणी आणावेत अशी विनंती करतो.*

*मा.संजय वाबळे :- मा.महापौर साहेब, जे क्रिडासंकूल माझ्या प्रभागात येते. साधारणत: ३ वर्षापूर्वी मा.अजित पवार यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. क्रिडा अधिकाऱ्यांनी ३/४ वेळा मिटींग देखील घेतली. कोणत्याही अधिकाऱ्याला याबाबतीत काही माहित नव्हते. ५/६ फूट गवत वाढले आहे. इतक्या लांब ॲथलेटिक्त ट्रॅक सगळे तिथे केलेले आहे. ७ एकरामध्ये ७/८ कोटी खर्च करुन केलेले आहे. ३/४ वर्षांत कोणत्याही स्पर्धा झालेल्या नाहीत. क्रिडा विभागाकडे कोणताही लेखाजोखा नव्हता. माहिती दिली नाही. क्रिडा विभाग जागा झाला. लाईटचा हेड टाकला आहे, त्याचा वापर केला असता हायमास्क पेनेसिएशन सिंथेटिक ट्रॅक खराब होईल. तो बसवता येणार नाही. लाईटचे होल्ड धूळखात पडले आहेत. आयुक्तांनी महापौरांनी त्या क्रिडा संकूलाला एकदा व्हिजिट करावी अशी विनंती करतो.*

*मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, खरोखर या भागात येथे रहायला आहे. म्हणून या विषयावर बोलायचे आहे. ओपन युसेज असतानासुद्धा बेकायदेशीर क्रिडा संकूल उभे केलेले आहे हे सर्वात महत्वाचे आहे. इंद्रायणीनगर भागात जागेचे दर पाहिलेतर सर्वसामान्यांना घर घेणे परवडणारे नाही. प्राधिकरणाने ग्राऊंड ठेवले आहे. कोणतीही कारवाई न करता बेकायदेशीरपणे क्रिडा संकूल उभारलेले आहे. प्राधिकरणात आम्ही कुठे चालायला जायचे, तिथे चालायला-जायला परमिशन नाही. गेटला लॉक लावले आहे. सकाळी मी स्वत:, इतर नागरिक सुद्धा जात होते. तिथे उच्चभ्रू वर्गात मोडणारे नागरिक राहतात. दररोजचा पेपर उघडा,इंद्रायणीनगरमध्ये महिलांचे गंठण ओढल्याच्या बातम्या असतात. मंगळसूत्र हे मांगल्याचे प्रतिक आहे. पण आम्ही खरोखर ते बाळगत नाही कारण ते ओढले जाते. सकाळी महिला जॉगिंगला जातात म्हणून निश्चितपणे सकाळी त्यांना मोफत उपलब्ध करुन दिले पाहीजे. सिंथेटीक ट्रॅकवर दारुच्या बाटल्या, पत्ते खेळले जातात. वॉचमन असून सुद्धा असे प्रकार घडतात. याची खबरदारी घेतली तर निश्चितपणे फायदा होईल. खेळाडू तयार झाले पाहीजेत असे मा.सुलभा ऊबाळे यांनी सांगितले. टेनिस कोर्ट भाड्याने देतो. ऑनलाईन प्रक्रिया राबवतो. शंका किंवा अनधिकृत आहे का नाही याची माहिती देत नाही. कोणी रजिस्ट्रेशन केलेले असते, खेळाडू खेळतात का नाही हे पाहिले जात नाही. टेनिस कोर्टस् उपलब्ध करुन देतो. ऑनलाईन पैसे स्विकारले असतील तर निश्चितपणे उपलब्ध करुन दिले पाहीजे. एकीकडे पैसे स्विकारायचे, एकीकडे उपलब्ध करुन द्यावयाचे नाही. दंडेलशाही चालणार असेल तर ऑनलाईन प्रक्रिया बंद करा, निश्चितपणे पारदर्शकता राहील. एवढेच याठिकाणी सांगावायचे आहे.*

*मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या क्रिडा विभागाचे पोस्टमार्टेम आपण करायला पाहिजे. खऱ्या अर्थाने रज्जाक पानसरे हे क्रिडा अधिकारी यांची तुम्ही सर्जरी करायला पाहीजे. क्रिडा अधिकारी म्हणून या ठिकाणी बसल्यापासून काय काम केले, पाहीले आहे का? सगळ्यांनी उल्लेख केला. क्रिडा अधिकाऱ्याला या डायसवर बोलवा. या शहरात*

*किती क्रिडांगणे आहेत एवढे सांगायाला लावा. विषयाच्या अनुषंगाने मी बोलतो. सगळ्या टेंडर नोटीसा मी वाचून दाखवतो. बॅडमिंटन, लॉनटेनिस, बास्केटबॉल या खेळांसाठी रु.३,९९,०४,३९५/- चे २००६ ला टेंडर काढले होते. २००७साली काम चालू झालेले आहे. सिंथेटीक ट्रॅकसाठी र.रु.४,०९,४६,३८०/- इतका खर्च झाल्याचे वर्तमानपत्रात छापले होते. या क्रिडांगणाच्या अटीमध्ये डॉजबॉल क्रिडांगण केलेले आहे. निविदा र.रु.४९,९९,५००/-, प्रत्यक्षात काम र.रु.२,३३,०४,५३०/- इतक्या वाढीव दराने काम केलेले आहे. नंतर तिथे गेल्यावर गवत वाढलेले दिसते, कोणी खेळत नाही. ही प्रशासनाची माहिती आहे मला माहित नाही. आज महापालिकेने ज्या ग्राऊंडवर रु.८,६२,७५,२९५/- विद्युतची कामे सोडून एवढा खर्च केला असताना आज ग्राऊंडची इतकी वाईट अवस्था आहे म्हणून सांगितले. धिंग्रा ग्राऊंड, आण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्रिकेट ग्राऊंड तयार करण्याचे काम चालू आहे. संपूर्ण देशात क्रिकेट लायब्ररी आपल्याकडे झाल्याचा गवगवा झाला. त्यावेळी मा.कोंडे अतिरिक्त आयुक्त होते. त्यांच्या नियंत्रणाखाली देशातील उत्तम क्रिडा लायब्ररी तयार केली. त्याची प्रसिद्धी बाहेर झाली. आज क्रिडा प्रबोधिनीची काय अवस्था आहे. शहरातील क्रिडा क्षेत्रात चांगले काम केले तर वैद्यकीयवरील खर्चाचा मोठा भार कमी होईल. लोक ग्राऊंडवर गेले तर आजारी पडायचे कमी होतील. ग्राऊंड उपलब्ध असायची सुद्धा सुविधा उपलब्ध होत नाही. याकडे कोणाचे लक्ष नाही. या विभागाकडे आयुक्तांचे दुर्लक्ष आहे. कोट्यावधी रुपये खर्च करुन ग्राऊंड उपलब्ध केले आहेत. बरेचसे विद्यार्थी ग्राऊंडवर खेळायला जातात,ज्येष्ठ नागरिक जातात. ग्राऊंडवर मोकळी जागा, हवा उपलब्ध आहे. बऱ्याचशा ग्राऊंडवर रात्रीच्या पार्ट्या होतात ही वस्तुस्थिती आहे. सगळी माहिती असून सुद्धा त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. यावर काय निर्णय घेतो. तुमच्या निदर्शनास आणायचे आहे. काय निर्णय घेतो. कोणताही क्रिडा विभागाचा विषय आला त्या अनुषंगाने बोललो. आज बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर त्याच्यावर काय उपाययोजना करतो हे पहायचे का वर्तमानपत्रात आलेले कव्हर फोटो बघायचे. महापालिकेची बदनामी झालेली बघायची. या २/३ महिन्यांत यात लक्ष दिले नाहीतर १/२ महिन्यांत क्रिडा विभागाचा विषय आलातर या संदर्भात आम्ही तुम्हाला जबाबदार धरणार आहोत. सक्षम अधिकारी लक्ष देत नाहीत. सहाय्यक आयुक्त,अतिरिक्त आयुक्तांकडे असले तरी जे कर्मचारी,अधिकारी लक्ष देत नाहीत, अशा लोकांना सस्पेंड केले पाहीजे. महापालिकेचा पगार घेऊन प्रामुख्याने सुविधा घेतो, कोट्यावधींचे नुकसान करतो. अशा लोकांना घरी बसवायची वेळ आली आहे. आम्ही चूका करतो. आपल्याकडून उपाययोजनांची मलमपट्टी होण्याची अपेक्षा सभागृहात व्यक्त करतो.*

*मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, आपण क्रिडा संकूलाची निर्मिती करतो त्याचा मुख्य उद्देश्य काय आहे. याचा खुलासा करणे गरजेचे आहे. मोठ-मोठी क्रिडांगणे बांधली जातात. त्यात कोणाकोणाच्या पार्ट्या अरेंज करतात. मोरया गोसावी क्रिडा संकूलात ३ महिन्यांपूर्वी कोणाची पार्टी अरेंज केली होती. माझ्या वॉर्डात शाळा आहे, त्याला लागून क्रिडांगण केले. नक्की आपण क्रिडांगणे कोणासाठी करतो. या विषयाचे धोरण नक्की*

*काय आहे. पैसे कमवायचे आहेत का खेळाडू तयार करावयाचे आहेत. क्रिडांगणात एकतरी खेळतो का जर खेळत असला तरी याचे उत्तर देणे गरजेचे आहे. माझ्या वॉर्डातील मोरया गोसावी क्रिडा संकूल नक्की कोणाच्या ताब्यात आहे. क्रिडा विभाग का भूमि आणि जिंदगी विभाग. तिथे ठेकेदाराचा वॉचमन आहे. मनपाचा एकसुद्धा वॉचमन नाही. दांडीया खेळतात. हा काय चित्रपट आहे का? ऑनलाईन बुकींग कशासाठी? मनपाचा सोशल कार्यक्रम असला तर निश्चित द्या. खाजगी कंपन्यांच्या कार्यक्रमांना सुद्धा भाड्याने देतो. बाहेर खाजगी हॉल/हॉटेल घेतले तर १०/२०/५० हजार भाडे द्यावे लागतात. इथे मनपाला १,०००/- दिले तर क्रिंडा संकूल मिळते. खरोखर खेळाडू घडविण्यासाठी ठोस भूमिका घेणे गरजेचे आहे. या ठरावाला नामंजूर करावे अशी अपेक्षा आहे.*

*मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, खराब डिपार्टमेंटचा पुरस्कार द्यावयाचा म्हटला तर क्रिडा विभागाला. या विषयावर कामाची तक्रार केलेली आहे. क्रिडा विभागाला सहाय्यक आयुक्त होऊन गेले ते वैतागून गेले होते. दीड वर्ष झाले या विषयाचा फॉलोअप करतोय. तुम्ही सहा महिन्यांत हा प्रश्न निकाली काढला. हे क्रिडांगण वापरायला सुरुवात केली. वाबळे तुमचे अभिनंदन केले आहे. ज्यांना काम करायची इच्छा नाही, त्यांची ताबडतोब बदली करा. ज्यांना खरोखर क्रिडा क्षेत्राची आवड असलेले खेळाडू काम करतात. आम्ही ५०% लोक क्रिडा क्षेत्राशी संबंधित आहोत. क्रिडा समितीत जाऊन सुद्धा कोणत्याही सूचनांची अंमलबजावणी होत नाही म्हणून मिटींगला जायचे सोडून दिले. सगळ्यात जास्त लक्ष द्यावे लागेल जिथे आरोग्य विभागापेक्षाही महत्वाचा क्रिडा विभाग सक्षम असेल तर. कॉंक्रीटचे मोठ्या प्रमाणात जंगल झालेले आहे. मुलांना खेळायला मैदाने नाहीत. उपलब्ध मैदाने खेळण्यासाठी उपलब्ध व्हावीत म्हणून पुढील काळात प्रयत्न झाले पाहीजेत. माझी सूचना आहे, आपल्या शहरातील अनेक लोक खेळावर खर्च करु शकत नाही. जे ताब्यात आहेत, क्रिडांगण म्हणून किमान उपलब्ध करावे. खेळाडू नंतर तयार होतील. आरोग्य चांगले होण्यासाठी ही सुविधा आज निर्माण करावी. यात गांभिर्याने लक्ष द्यावे. या विभागाची स्वच्छता करावी. क्रिडा सुविधा उपलब्ध कराव्यात. क्रिडांगणांना वॉचमन नाही. ५० लाख ते १ कोटी खर्च केला. किती वर्षे झाली. सिक्युरीटीची व्यवस्था करा तिथे व्यवस्था नाही. रामभरोसे काम चाललेले आहे. तिथे वेगवेगळ्या प्रकारच्या पार्ट्या होतात. याची अंमलबजावणी त्वरित करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.*

*मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, इंद्रायणीनगर क्रिडासंकूलाचा हा विषय आहे. त्याचे जे काही दर ठरवले आहेत, वेगवेगळ्या विषयासाठी त्याची मा.सुलभा ऊबाळे यांनी माहिती दिलेली आहे. मा.अनंत कोऱ्हाळे यांनी सुद्धा विचारले. आपण क्रिडा संकूल बांधले त्याची काय अवस्था आहे. पैसे कमवण्यासाठी का शहरातील खेळाडू तयार व्हावेत यासाठी बांधले आहे. वाय.सी.एम. चा विषय होता कोर्सेस चालू करणार आहेत. आयुक्तांना नगरसेवकांना चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. जशी आपल्या सर्वांची इच्छा आहे, शहरात वाय.सी.एम.मध्ये उत्कृष्ट दर्जाचे डॉक्टर असावेत तसेच सर्वांचे मत आहे*

*आपल्या कारकीर्दीत एकतरी खेळाडू देशाला द्यावा. आजपर्यंत भरपूर आयुक्त आले. अतिरिक्त आयुक्त झाले, क्रिडा अधिकारी झाले. कामाचे वेगवेगळ्या प्रकारचे ठोस निर्णय घेतले. परंतू क्रिडा क्षेत्राकडे कोणीही मनापासून लक्ष दिलेले नाही. माझ्याकडे एक गृहस्थ उभा आहे, तो डॉक्टर आहे. तुम्ही मला प्रश्न विचारला, तुमच्या हॉस्पीटलला जे डॉक्टर पाहीजेत कोण. मी पत्रात सुद्धा हेच म्हणालो, डॉ.अय्यर असतानाही, भोसरी हॉस्पीटलला असे डॉक्टर पाहीजेत. तुम्ही एक शब्द वापरलेला होता. मी म्हणालो पाहिजेत. तुम्ही म्हणालात, हो हो, तुमच्याकडे पैलवान जास्त आहेत. मला याचा अभिमान आहे मी पैलवान आहे. ओळख आहे. पदक मिळवून देणार. जे पैलवान आहेत, कमीतकमी तो तरी आदर्श आपल्यासमोर असावा. म्हणजे मला आपल्याला पाहिल्यानंतर वाटते की, तुम्ही मस्करीने म्हणाला असला तरी मला ते लागले. मी त्या खेळाशी एकनिष्ठ आहे. त्या लाल मातीशी एकनिष्ठ आहे. डॉक्टरच्या विषयी बोलताना इतके ज्ञान डॉक्टरपाशी असते हे पाहिले नाही. तुमच्याकडे माझ्या पेशाबद्दल ज्ञान नसेल पण जे भाड्याचे दर ठरले आहेत, पैसे कमवण्याशिवाय एखादा खेळाडू तयार करा. आपल्याला बेस्ट सिटी म्हणून गौरवले गेले अभिमान वाटला आहे. भारताला खेळाडू दिला तसा जगाला खेळाडू द्यावा असे काहीतरी करा. नाहीतरी इतका खर्च करतोय. भारतीय खेल प्राधिकरण यांनी कबड्डीचे २० खेळाडू आपल्याकडून दत्तक मागितलेले आहेत. हे दत्तक विद्यार्थी आपल्या मनपाच्या शाळांत शिकतात. त्यांची व्यवस्था नीट नाही. हे सुद्धा दत्तक खेळाडू सोडून चालले आहेत. मी तिथे गेलो. कबड्डी हा खेळ सुद्धा माझा आहे. ज्या २० खेळाडूंना दत्तक घ्यायचे त्यांना परत पत्र दिलेले आहे. माध्यमिक विभाग व क्रिडा विभाग दोन वेगवेगळे विभाग आहेत. एकत्र न आल्यामुळे हा त्रास होतो आहे. संघटनांना बोलवा, त्यांचा विचार घ्या. ऑथोरीटीज् येतात. ऑलिंपिक असोसिएशन यांनी संघटनांना, संस्थांना बोलवावे असा नियम करा. क्रिडांगणे झाली पाहीजेत. खेळाडू तयार झाले पाहीजेत. संत ज्ञानेश्वर क्रिडा संकूलात दोन वर्षांपासून कबड्डीचे सामने घेत आहोत. आमच्या संघातील खेळाडू भारतामध्ये सिलेक्ट झाले आहेत. भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. भारताला गोल्ड मेडल मिळवून दिले. त्या खेळाडूंचा आपल्या मनपात ठराव केला की त्यांना मदत करायची. २ वर्षे झाली त्यांना मदत मिळालेली नाही. कसे काय खेळाडू तयार होणार. कार्तिकी गायकवाड ही महागायिका तयार झाली. तसे खेळाडू तयार करण्यासाठी कष्टपण घ्यावे लागतात. जसे डॉक्टर घडवतो, तसे खेळाडू घडवावेत. पैलवानांकडे गोड नजरेने पहा. मी खरेतर बोलणार नव्हतो. संधी मिळते नाही मिळते. क्रिडाचा विषय आला म्हणून वाटते.*

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, स्विमिंग टँक तिथे पार्किंगमध्ये गाड्या,वृक्ष अधिकाऱ्यांनी लावून ठेवल्या आहेत. फोटो काढून आणला आहे. सुरक्षा अधिकारी पाटिल यांना फोन केला सांगितले सुरक्षा अधिकारी काय करतोय. स्विमिंग टँक ६ महिने बंद आहे. या आठवड्यात स्विमिंग टँक चालू होईल. रज्जाक पानसरे हे अधिकारी आहेत का भाई आहेत माहित नाही. त्यांचे भाई म्हणून नाव घेतले पाहिजे. नवीन नगरसेवकांना ते माहित नसतील. हे रज्जाक कोणत्या खेळामध्ये आहेत. ते आत्ता मला माहिती झाले आहे का कसे पाहिले नाही का नगरसेवकांनी. एकदा फोन उचलल्यावर विचारले रज्जाक*

*पानसरे आहेत का ते म्हणाले मीच आहे. स्विमिंग टँक बरीच वर्षे बंद पडला आहे. आजपर्यंत त्यांनी फोन केलेला नाही. बरीच वर्षे हा अधिकारी का भाई हे माहित नाही. त्यांनी सांगावे स्विमिंग टँक बरेच दिवस बंद आहे. फोन केला तर सांगितले, या ठिकाणी भंगारच्या गाड्यांमुळे बाहेरच्या गाड्यांना पार्किंगसाठी जागा होत असेल तरी आपला वॉचमन आहे. सर्व अधिकारी असतात. वेगवेगळे प्रकार घडतात. दारू पाटर्या, पत्ते खेळत बसतात. अजून काही उद्योग तिथे आहेत. परिसरातील लोकांनी तक्रार केलेली आहे. या ठिकाणी निश्चितपणे सुरक्षा अधिकारी असतील पानसरे यांना याठिकाणी ताकीद द्यावी.*

*मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, जसा क्रिडाचा विषय निघाला. आमच्या प्रभागात एकही क्रिडांगण नाही. एक क्रिडांगण डेव्हलप करुन घेतोय. गेली ४ वर्षे फॉलोअप करतोय. ते अजून डेव्हलप झालेले नाही. कंपाऊंड वॉल टाकलेली आहे. सकाळी डंपिंग ग्राऊंड म्हणून झोपडपट्टी त्याचा वापर करते आहे.* एवढे गवत वाढलेले आहे. टेंडर काढायची वेळ आलेली आहे. आम्ही आमच्या जमिनी क्रिडांगणे तयार करण्यासाठी द्यायच्या, त्याची अशी अवस्था पहायची. कोणताही खेळ घेता येऊ नये अशी परिस्थिती समोर पहायची. ही खरोखरच दुःखदायक बाब आहे. अथेलेटीक्स करण्याकरिता भाडे आकारायचे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. असे करुन जमिनी ताब्यात द्यायच्या. भाडे असा प्रकार असेल तर आम्ही स्टे करु. आम्ही तुम्हाला पैसे द्यायचे हा विषय एकदम चुकीचा आहे. खासगी रितीने साधारणतः पोल उभे करुन हॉलीबॉल चालू केले गेले. पोल किंवा नेट घेतले तरी एक वर्षात मिळत नाही. क्रिडांगणे भाडे पद्धतीने देणे एकदम चूकीचे आहे असे वाटते.

मा.जितेंद्र ननवरे – मा.महापौर साहेब, या विषयावर आप्पा बारणे यांनी अतिशय चांगल्या शब्दांत सांगितले. या विभागाचे पोस्ट मार्टेम केले पाहिजे. बरेच जण भावनिक झाले, बरेच जण बोलले, या विभागाच्या बाबतीत असे का झाले कारणमिमांसा करण्याचा विषय आहे. आपल्याला एवढेच सांगू इच्छितो, पिंपरी चिंचवड महापालिकेत जसा उद्यान विभाग कार्यरत आहे, त्याच्या सोबतीला उद्यान स्थापत्य हा विभाग सुद्धा आहे. त्यांच्यात समन्वय साधून कामे सुरळीतपणे करतात. संपूर्ण शहरात क्रिडा विभागासाठी क्रिडा स्थापत्य हा नवीन विभाग चालू करावा. कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक करावी. फक्त क्रिडांगणाचे काम त्यांच्या अखत्यारीत ठेवावे अशी विनंती करतो जेणेकरुन मैदानाची दुरावस्था होणार नाही.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहरातील क्रिडांगणे व उपसूचनांचा झालेले मुद्दा या सगळ्या मुद्द्यांत सत्य आहे. कोणीतरी कोणाचातरी आहे म्हणून कोणीही बोलत नव्हते. मात्र कामचुकारपणा कामात करु नये. जो कामचुकारपणा कामात होतो म्हणून विभागातील सगळ्या लोकांची बदली करा. त्याशिवाय हा विभाग चांगला होणार नाही. जसा कोंडे साहेबांकडे अतिरिक्त आयुक्त म्हणून चार्ज होता. क्रिडा विभाग त्यांच्याकडे असताना त्यांना अधिकार सुद्धा होता. अशा पद्दतीचा अतिरिक्त किंवा सहाय्यक आयुक्त नेमावा. त्या अधिकाऱ्यावर क्रिडा विभागाची जबाबदारी पूर्णपणे नेमली गेली पाहीजे. अशा अधिकाऱ्याची नेमणूक करा. त्याशिवाय त्या विभागाची कोणतीही गोष्ट चांगली होईल असे वाटत नाही. मुळात क्रिडांगण कंपनीच्या पार्टीला दिले जाते. तिथे खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रम, कोणाची लग्न,साखरपुडा सगळ्या गोष्टी होतात. मा.कैलास कदम यांनी हे मघाशी बोलले होते. त्यांनी 700 अपंग मुलांच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. खेळण्यासाठी, पळण्यासाठी, लांब उडी मारण्यासाठी ग्राऊंड तयार केले. त्यानंतर स्पर्धा संपत नाही तोपर्यंत तिथे बाकीच्या पाट्र्या सुरु झाल्या. फोन करुन काही उपयोग नाही. निवडणुकीच्या काळात फोटोसुद्धा पाठवला आहे. निवडणुकीत गटागटात हत्या होत असतील, कोणतेही ग्राऊंड ताब्यात असलेले असतील तरी करोडो रुपये खर्च केलेले आहेत. माझ्याकडून पहिला ठराव पास झाला आहे. कोणतेही क्रिडांगण ताब्यात असेल किंवा नसेल एक हजार रुपये भाड्याने देतो. तरी असे भाड्याने का दिले. अजून यांच्याच ताब्यात आहे. ते ताब्यात घेण्याची क्रिडा विभागाची मानसिकता नाही. त्यांना शोधून म्हणायचे, वेगळे क्रिडांगण आहे ताब्यात द्या. नगरसेवकांना सूचना देतात त्यांच्या ताब्यात घ्या. तिथून सुद्धा अशा पद्धतीच्या सूचना दिल्या जातात. नेमणूक काय घेतली तिथे काही होते आहे का. एवढे मोठे क्रिडांगण बनवले, आभार. ग्राऊंडच्या भिंती गुटखा खाऊन रंगविल्या आहेत. टॉयलेट खराब केले गेले आहेत. ते आपण सगळ्यांनी बघितले आहे. मा.महेश लांडगे हे जास्त बोलत नाही, तळमळीने बोलला. तुम्ही आल्यानंतर स्पर्धा, डे साजरे केले. त्यास येणारा खर्च जाऊन किंमत दिलेली आहे. चांगल्या गोष्टीला मनपाकडून कात्री लावली जाते, नको तिथे मात्र हत्ती घालवला जातो. क्रिडासाठी सुद्धा खर्च केला गेला पाहिजे. क्रिडा विभागातील टॉपर आहेत, त्यांना रिक्वेस्ट केली. क्रिडा विभागात शहरातील अशा लोकांच्या नोंदी नाहीत. लागेल बरे ! अशा शब्दांत प्रतिक्रिया

व्यक्त केली. क्रिडांसाठी खर्च केलेले ग्राऊंड आहे. पिंपरी चिंचवड मधील कोणतेही अधिकारी चांगल्या पद्धतीने सहकार्य करीत नाहीत. त्यामुळे सत्कार कार्यक्रमाला बोलवा, आम्ही येऊ परंतू या गोष्टी योग्य नाहीत. मा.महेश लांडगे, मा.राजू मिसाळ होते. सगळ्यांनी यात पुढाकार घेतला आहे. आण्णासाहेब मगर स्टेडियमवर करोडो रुपये खर्च करुन इमारत बांधली. ती पाहण्याचा कार्यक्रम ठेवला होता. आत ऑफीस आहे. आतमध्ये काय अवस्था आहे. या विषयावर तुमची माझी चर्चा झालेली आहे. इतकी वाईट अवस्था आहे. चालवायला घेतले असेल तर हरकत नाही. ते फक्त क्रिडांगणासाठी वापरले पाहिजे. खेळाडू घडवणे महत्वाचे आहे, दर महत्वाचा नाही. ही बाजू बघून या प्रस्तावात तसे असेल तर दरात निश्चित यात दुरुस्ती केली जावी व हा विषय मंजूर केला जावा.

मा.सुलभा ऊबाळे – मा.महापौर साहेब, माझा विरोध नोंदवून घ्या.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, एवढा वेळ चर्चा करुन काय उपयोग. यातून निष्पन्न काय होणार आहे. सगळे चुकीचे झाले.

मा.महापौर – आपण उपसूचना द्यावी.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, हा विषय तहकूब ठेवला तर बरे होईल. सगळी माहिती संकलित करा.

मा.महापौर – विषय मंजूर झाला आहे. परत करता येत नाही. उपसूचना द्या. उपसूचनेसहित विषय मंजूर करु.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, अथेलिटिक्सला लावलेले दर रद्द करावेत. क्रिडा व्यतिरिक्त इतर वापरायला, ट्रॅक करुन कोणत्याही प्रकारच्या दुस-या पाट्या खेळाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या परवानग्या देऊ नयेत. एवढ्या गोष्टी करा. प्राधान्याने अथेलेटिक्समध्ये नॅशनल लेवलचे कोचेसची तुम्ही मानधनावर नेमणूक करण्यात यावी. बॅडमिंटन असो नाहीतर हॉकी स्टेडीयमवर नॉमिनल पैसे घेतो तसे अथेलेटिक्स यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे पैसे घेऊ नयेत. नॅशनल फेडरेशन यांना क्लब चालवावासा वाटला तर त्याचा प्राधान्याने विचार करावा. अन्यथा अपंग खेळाडूंना मोफत असावे, त्याचप्रमाणे सध्या हा विभाग माछरे

यांच्याकडे दिलेला आहे. शक्यतो सहाय्यक आयुक्त दर्जाच्या व्यक्तीला चार्ज द्यावा. पानसरेंसह तीन अधिकारी आहेत, त्यांना कोणतेही अधिकार नाहीत. ढोबळ काम करतात. फक्त क्रिडा अधिकारी म्हणून चार्ज सोपवलेला आहे. नाहीतर तशा प्रकारच्या अधिका-याला वगळा. विशेष ज्ञान असलेल्या माणसाची नेमणूक करावी. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

*ग्राऊंड वापरणेकामी कोणत्याही प्रकारचा खेळ खेळणा-या खेळाडूकडून (ॲथॅलेटीक्सकडून) तसेच अंध / अपंग व्यक्तींकडून खेळाडूंकडून कोणत्याही प्रकारचे अधिमुल्य घेण्यात येवू नये. त्याच प्रमाणे खेळाव्यतिरिक्त ग्राऊंड (क्रिडांगण) इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी देणेत येऊ नये. पूर्वी प्रमाणेच निवृत्त खेळाडूंना मानधनावर मार्गदर्शक / प्रशिक्षक म्हणून घेणेत यावे. सर्व प्रकारच्या क्रिडा पुस्तकांची अद्ययावत लायब्ररी सुरु करणेत यावी, जिल्हास्तर / राज्यस्तरीय / आंतरराष्ट्रीय स्तरीय मान्यताप्राप्त फेडरेशन हे नविन खेळाडू तयार करीत असल्याने त्यांना क्रिडांगण वापरासाठी देणेत यावे. त्याचप्रमाणे ग्रंथालय, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस ग्राऊंड, BOT / PPP तत्वावर देणेत यावे, क्रिडा विभागासाठी सक्षम अधिका-याची नियुक्ती करणेत यावी. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने गहुंजे येथे बांधणेत आलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमचे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडण्याच्या अटीवर महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनला जोडणेसाठी गहुंजे स्टेडीयम मनपा हद्दीबाहेर असलेने नियमानुसार महापालिका आकारेल इतकी कनेक्शन फी व वार्षिक मलप्रवाह कर भरणेस महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तयार आहे. तरी वरील अटीनुसार गहुंजे क्रिकेट स्टेडियमचे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडणेस मान्यता देणेत येत आहे.*

मा.ऊल्हास शेट्टी – मा.महापौर साहेब, ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनी यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोणातून ज्या अक्टिवीटीज आहेत, त्या ठिक आहेत. उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.महेश लांडगे – मा.महापौर साहेब, महाराष्ट्र ऑल इंडिया ऑलिंपिक असोसिएशन यांचे संलग्न असणा-या पिंपरी चिंचवडच्या संघटना प्लेग्राऊंड त्यांच्या ताब्यात द्या. त्यासाठी विनंती करावी. M.O.U., सेलडीड असावे. रजिस्टर्ड ऑर्डर्स असाव्यात. यांना भाडे आकारु नका. खालील उपसूचना मांडतो – महाराष्ट्र दर्जाच्या ज्या संघटना आहेत, त्यांना संलग्न असलेल्या संघटनांना मोफत देणेत यावे.

मा.शत्रुघ्न काटे – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.श्रीकर परदेशी (मा.महापालिका आयुक्त) –मा.महापौर, सन्मा. सदस्य, सभागृहाच्या भावना फारच तीव्र व गंभीर स्वरुपाच्या आहेत. याची दखल प्रशासकीय प्रमुख म्हणून घेतो आहे. 4 महिन्यांत या विभागाने कोणतेही परिणामकारक व लक्षणीय काम केल्याचे माझ्या निदर्शनास आलेले नाही. याबाबतीत ज्या काही गंभीर बाबी सन्मा.सदस्यांनी मांडल्या. 50 लाखाची कामे असताना फायनल बील अडीच कोटींचे झाले. या सर्व प्रकरणांची चौकशी करतोय. अडीशनल कमिश्नर, मुख्यलेखापरिक्षक घाडगे, निकम यांच्या समितीमार्फत याची 3 महिन्यांत चौकशी पूर्ण होईल. या क्रिडांगणाचा वापर व्हावा, या पद्धतीच्या भावना सभागृहात गटनेत्यांपासून सर्वांनी व्यक्त केल्या की, चांगले खेळाडू तयार झाले पाहिजेत. मनपाच्या ग्राऊंडची साईज तयार नाही. दुसरे अन्य वापरासाठी ग्राऊंडचा वापर होत असेल तर ही बाब मनपाने केली असेल तर ती निश्चितच भूषणावर नाही. खेळाडूला फायदा होत नसेल तर ही बाब अतिशय दुर्देवी आहे. याबाबत धोरण तयार करण्यासाठी वेळेचा योग्य वापर करण्यासाठी मा.सतिश कुलकर्णी,अतिरिक्त आयुक्त यांना सूचना देतो. त्यांना 2 महिन्यांत अहवाल तयार करावा. विभागाला सक्षम अधिकारी देण्याबाबत हा अहवाल आल्यानंतर 2 महिन्यांत निर्णय दिला जाईल.

मा.जितेंद्र ननवरे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

*ठराव क्रमांक :- ११८* *विषय क्रमांक :- ६*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्रमांक क्रिडा/६/कावि/६५७/२०१२ दिनांक २५/७/१२*
*२) मा.क्रिडा समिती सभा दि.१/८/२०१२ ठ.क्र.१७*
*३) मा.विधी समिती सभा दि. ३१/८/२०१२ ठ.क्र.४९*
*४) मा.स्थायी समिती सभा दि. ११/९/२०१२ ठ.क्र.११००*

***मनपाचे संत ज्ञानेश्वर क्रिडा संकूल, इंद्रायणी नगर, भोसरी येथील ॲथलेटिक्स ट्रॅक, हा ॲथलेटिक्स सराव व स्पर्धेसाठी व स्पर्धेसाठी भाडयाने देणेबाबत व प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे अटी व शर्ती व भाडे दर निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. ग्राऊंड वापरणेकामी कोणत्याही प्रकारचा खेळ खेळणा-या खेळाडूकडून***

*(ॲथॅलेटीक्सकडून) तसेच अंध/अपंग व्यक्तींकडून खेळाडूंकडून कोणत्याही प्रकारचे अधिमुल्य घेण्यात येवू नये. त्याच प्रमाणे खेळाव्यतिरिक्त ग्राऊंड (क्रिडांगण) इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी देणेत येऊ नये. पूर्वीप्रमाणेच निवृत्त खेळाडूंना मानधनावर मार्गदर्शक/प्रशिक्षक म्हणून घेणेत यावे. सर्व प्रकारच्या क्रिडा पुस्तकांची अद्ययावत लायब्ररी सुरु करणेत यावी, जिल्हास्तर/राज्यस्तरीय/आंतरराष्ट्रीय स्तरीय मान्यताप्राप्त फेडरेशन हे नविन खेळाडू तयार करीत असल्याने त्यांना क्रिडांगण वापरासाठी देणेत यावे. त्याचप्रमाणे ग्रंथालय, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस ग्राऊंड, BOT/PPP तत्वावर देणेत यावे, क्रिडा विभागासाठी सक्षम अधिका-याची नियुक्ती करणेत यावी. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने गहुंजे येथे बांधणेत आलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमचे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडण्याच्या अटीवर महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनला जोडणेसाठी गहुंजे स्टेडीयम मनपा हद्दीबाहेर असलेने नियमानुसार महापालिका आकारेल इतकी कनेक्शन फी व वार्षिक मलप्रवाह कर भरणेस महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तयार आहे. तरी वरील अटीनुसार गहुंजे क्रिकेट स्टेडियमचे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच संत ज्ञानेश्वर क्रिडा संकूल हे महाराष्ट्र दर्जाच्या ज्या संघटना आहेत, त्यांना संलग्न असलेल्या संघटनांना मोफत देणेस मान्यता देणेत येत आहे.*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

ठराव क्रमांक *:- ११९* *विषय क्रमांक :- ७*

*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्रमांक*
*वि/मु.का./उलेपा/कावि/२१०/२०१२ दि.३/९/१२*
*२) मा.स्थायी समिति सभा दि.११/९/२०१२ ठ.क्र.११०१*

*विद्युत विभागाकडील 'किरकोळ दुरुस्ती व देखभाल' भांडवली खर्च यासाठी र.रू.९,९९,९८,०००/- तरतूदीमधून अ, ब, क व ड प्रभागाकडील महसुली खर्चासाठी प्रत्येकी र.रू.३६,००,०००/- वर्ग करणेकामी प्रत्येक प्रभागाकडील विद्युत विभागाचे महसूली अंदाजपत्रकामध्ये 'हैड्रोलिक शिड्या/वाहने इ.भाडे तत्वावर पुरविणे' हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्या लेखाशिर्षावर प्रत्येक प्रभागाप्रमाणे म्हणजे अ, ब, क व ड (विद्युत) महसुली खर्चावर प्रत्येकी र.रू.३६,००,०००/- अशी एकूण र.रू.१,४४,००,००० वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, शहरातील दिवाबत्तीची सोय करणे हे खरेतर महापालिकेचे आवश्यक काम आहे. जेव्हा जेव्हा फोन लावला गेला, ब प्रभागात गाडी उपलब्ध नाही. गुरुवार संपला, शनिवारी येईल. त्याबद्दल माहिती घेतली, टोटल ८ हैड्रॉलिक गाड्या आहेत. भाडेतत्वावर आपल्या ८ गाड्या आहेत त्यातील ४ गाड्या बंद व ४ गाड्या चालू आहेत. ब प्रभागात १ गाडी चालू आहे. वाहनचालक नाही म्हणून बंद आहे. क प्रभागात गाडी बंद आहे. ड प्रभागात हीच परिस्थिती आहे. ब प्रभागात हीच परिस्थीती. ४ गाड्या चालू ४ काही कारणास्तव बंद आहेत. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी डायसवर येऊन बोलावे, यावर चर्चा केली पाहीजे.*

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, मूल आईकडे बघून सगळे शिकत असते. किमान रस्त्यावर प्रकाश असला पाहीजे. आपण आजच ७ नंतर रस्त्यावर गेलाततर गाडीचा जेवढा प्रकाश तेवढाच प्रकाश रस्त्यावर दिसतो. ब प्रभागात १५० व्होल्टचे पिवळे दिवे लावले आहेत. कुठले दरिद्री दिवे लावले आहेत कळत नाही. त्याच्यावर आरसे करतो. त्याची गरज पाहून त्याप्रमाणे करावे अशी सूचना द्यावी.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-९७* *प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक - १२०* *विषय क्रमांक :- ८*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील प.क्र.स्था/*
*वा.क्र./कावि/५२/२०१२ दि.११/९/१२*
*२) मा.स्थायी समिती सभा दि.११/९/२०१२ ठ.क्र.११३९*

*पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे पुणे महानगर क्षेत्राकरिता सविस्तर मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेचे काम मे. दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन (DMRC) नवी दिल्ली यांना दिलेले असून (DMRC) ने सखोल अभ्यास करुन सविस्तर मेट्रो प्रकल्प अहवाल तयार केला आहे. प्रकल्प अहवाल खर्च र.रु.२१० लक्ष पैकी पिंपरी चिंचवड मनपाचा हिस्सा र.रु. ४७,६७,०६४/- अधिक कर*

*असे एकूण र.रु.५३,५६,२७३/-पुणे मनपाकडे जमा करणेस तसेच पुणे महानगर क्षेत्रातील (DMR) प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी (DMRC) ने सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.*

*मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.* अनुराधा गोफणे*:- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*विषय क्रमांक :- ९*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील*
*क्र.प्रशा/१/कावि/७५८/२०१२, दि.०७/०८/२०१२*
*२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५० दि.३१/८/२०१२*

*श्री. सतिश कुलकर्णी, मुख्याधिकारी गट - अ यांची सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेत* येत आहे.

*मा.* आशा सुर्यवंशी*:- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.* सुनिता वाघेरे *:- सदर विषय तहकूब करण्यात यावा अशी सूचना मांडते.*

*यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक - १२१ विषय क्रमांक :- ९*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील*
*क्र.प्रशा/१/कावि/७५८/२०१२, दि.०७/०८/२०१२*
*२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५० दि.३१/८/२०१२*

*विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*विषय क्रमांक :- १०*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२८ दि. १९/६/२०१२*
*३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०६ दि.१/९/२०१२ अन्वये*

*कासारवाडी येथे भाजी मंडईचे आरक्षणामध्ये इमारत विकसित केलेली आहे. परंतु सद्यस्थितीत जागेवर सदर इमारतीमध्ये दवाखाना, करसंकलन कार्यालय, ग्रंथालय इ. वापर सुरु आहे. सदर भाजीमंडई आरक्षणातील विकसित केलेल्या इमारतीमध्ये भाजी विक्रेत्यांचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर ठिकाणी मनपाने दवाखाना सुरु केलेला आहे. सदर परिसरात भाजी विक्रेते हे जवळच रेल्वे लाईनलगत असलेल्या वाहनतळाच्या जागेत बसून भाजी विकतात. त्यामुळे वाहनतळाच्या आरक्षणऐवजी सदर ठिकाणी भाजीमंडई विकसित केल्यास भाजीविक्रेत्यांच्या सोईचे होईल तसेच महापालिकेसही त्यापासून उत्पन्न मिळू शकेल. तरी त्याप्रमाणे आरक्षण वापरात बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.विनया तापकीर :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.सुनिता वाघेरे :- मा.महापौर साहेब, सदर विषय फेटाळण्यात यावा अशी सूचना करते.*

*यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक -१२२ विषय क्रमांक :- १०*

*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२८ दि. १९/६/२०१२*
*३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०६ दि.१/९/२०१२ अन्वये*

*विषय क्रमांक १० दप्तरी दाखल करणेत येत आहे.*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक :-१२३ विषय क्रमांक :- ११*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिंपरी /१२७/२०१२, दि.०३/०७/२०१२*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४८ दि.७/९/२०१२*

*मौजे पिंपरी, ता.हवेली येथील सि.स.नं.५७४३ पै., आरक्षण क्रमांक ११० दुकानदारांचे पुनर्वसन आरक्षणाने बाधित जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेकामी सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.सुनिता वाघेरे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक :-१२४ विषय क्रमांक :- १२*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/ २क/६०/२०१२, दि.०९/०७/२०१२*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४९ दि.७/९/२०१२*

*मौजे भोसरी (कासारवाडी) येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये स.नं.४९९ पै, ५०० पै या मिळकती मध्ये आरक्षण क्रमांक*

*२९ बहुउद्देशिय सभागृहासाठी ०.३५ हे क्षेत्र आरक्षित आहे. सदर आरक्षणावर झोपडपट्टी आहे. सदर आरक्षित जागेवर सभागृह बांधून मिळणेकामी स्थानिक मा.नगरसदस्यांनी मागणी केलेली आहे. तरी सदर आरक्षणाचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये भूसंपादन करण्यास मान्यता देणेत येत आहे.*

*मा.आशा सूर्यवंशी :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.सिमा सावळे :-मा.महापौर साहेब,आत्ता विषय आणला. परत तो विषय आणला. स्थायी समिती, विधी समिती मध्ये हा विषय फेटाळला. दुसरे म्हणजे मौजे भोसरी (कासारवाडी) सर्वे नं. ४९९ पै हा ७०% पेक्षा जास्त भाग पूररेषेच्या आतमध्ये आहे. याठिकाणी काही करु शकणार नाही. झोपडपट्टी विकसित आहे. पहिल्यांदा पुनर्वसन कुठून करणार,नागरिकांना घरे कुठून देणार आहोत हे पाहणे गरजेचे आहे. सभागृह बांधण्यासाठी झोपडपट्टीधारकांना बेघर करता येणार नाही. आत्ता विषय फेटाळला आहे. आमदारांच्या वॉर्डातील नव्हते. विकसक कसा देता हे आमच्या चांगल्या प्रकारे लक्षात आलेले आहे. इथून पुढे विकास कशाचा हे आपण आम्हाला कळू द्या अशी अपेक्षा करते.*

*मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, सदर आरक्षणात कोणत्याही प्रकारची झोपडपट्टी नाही. विकसित झोपडपट्टी नाही. ओपन स्पेससाठी क्रिडांगण करु शकतो. ३०% जागा सँक्शन होईल, उरलेल्या जागेत खेळासाठी मैदान करु शकतो.*

*मा.आशा शेंडगे :- मा.महापौर साहेब, इथे तुम्ही अभ्यास कमी केला असे म्हणायला हरकत नाही. आरक्षण क्र.२९ मध्ये सरिता संकूलाची पूर्ण ब्ल्यू लाईन आहे. माहिती घेऊन नंतर विषय मांडावा. ब्ल्यू लाईनमध्ये बांधकाम करु शकत नाही. तिथे सभागृह होणार नाही. नक्कीच विषय फेटाळावा.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मा.मोटे यांनी सांगितल्याप्रमाणे, मा.सिमा सावळे यांनी सांगितले असेल, ब्ल्यू लाईन कुठेपर्यंत हा संशोधनाचाच विषय आहे. मा.महापालिका सभेत ठराव करुन, बदल करुन राज्य शासनाकडे पाठविला आहे. पुढील कारवाई चालू होईपर्यंत विषय मंजूर करावा.*

*मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, सर्वसाधारण सभागृहाचा नियम असतो. ज्यांचा विषय नसतो, त्यांनी त्या विषयी बोलू नये. माझे सहकारी राष्ट्रवादी कॉंग्रेस शहर अध्यक्ष मा.योगेश बहल यांच्या बोलण्यापेक्षा माझा विषय वेगळा आहे.*

पूररेषेबाहेरील आरक्षण अदलाबदल केलेले आहे. अशी वस्तुस्थिती असून लोकांनी का बोलू नये. त्यांचा खरेतर पूररेषेशी संबंध नाही. त्यांना कसे काय बोलू देता. एकतर त्यांना ब्ल्यू लाईन पूररेषेत इंटरेस्ट आहे. सभागृहाचे नियम पाळले पाहीजेत.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, कोर्टाने मला बोलायला बंदी केलेली नाही. मी नवीन सदस्यांना मा.सिमा सावळे यांच्यासारखे सदस्यपत्र दिलेले नाही. तुम्ही किती आत्तासारखी किती प्रकरणे हाताळली. त्यांचे काय झाले सगळ्यांना माहिती आहे. तुम्ही व्यक्तिगत आरोप करण्याचे कारण नाही. तुमचे आरोप ऐकण्यासाठी मी इथे आलेलो नाही. तुम्ही बोलायची गरज नाही. मी मा.किरण मोटे यांच्यासाठी बोललो आहे. करताना ब्ल्यू लाईनवर स्टे घेऊ नये असा आदेश दिला पाहीजे. सभागृहाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. तुम्ही विरोध नोंदवला असेल तर विरोध नोंदवून हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-९७ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.शमिम पठाण:- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १३

दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि. ७/९/२०१२

मौजे वडमुखवाडी येथील गट नं.१५४ व १५५ चे उत्तर हद्दीवर मंजूर विकास योजनेत १८ मी. रस्ता प्रस्तावित आहे. सदर पुर्व पश्चिम रस्ता पुढे गावाचे हद्दीवरील रस्त्यापर्यंत सलग जोडणे आवश्यक आहे. कारण या भागातील ब-याचशा नागरीकांना कोणताही पर्यायी रस्ता नाही. त्याकरीता गट नं.१७७ ते १८२ मधुन सलग असा पुर्व पश्चिम १८ मीटर रस्ता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार नगररचना व विकास विभागाने कार्यवाही करुन घोषित करणेस व रस्ता आखणीला शासनाची मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शुभांगी बोऱ्हाडे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे -

*मौजे सांगवी येथील मनपाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार सर्वे क्र. २ ते १३ पर्यंत पूर्व-पश्चिम दिशेस १८ मीटर रुंदीचा असून या रस्त्यास सांगवी-बोपोडी हा मुळा नदीवरील पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीवर पूल प्रस्तावित असून याबाबत धोरणात्मक निर्णय झालेला आहे. सदर रस्त्यास पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत मौजे सांगवी येथील सर्वे क्र.३ मधून जोडरस्ता होणे आवश्यक आहे. सदर जोडरस्ता मु.प्रा.अ. चे कलम २०५ अन्वये करणेच्या अटीवर काम चालू करावे यासाठी जागा मालकांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार मनपाने कलम २०५ अन्वये सर्वे क्र.३ मधून सांगवी-बोपोडी पुलाचे रुंदीप्रमाणे जोडरस्ता करणेस मान्यता देणेत यावी. तसेच याच कलम नुसार मौजे चऱ्होली येथील मनपांच्या हद्दीचे लगत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत स.नं.३१५, ३११, ३१३, ३१२,१३४ चे लगत ३० मी. रुंदीचे रस्त्याला जोडरस्ता म्हणून स.नं.१३४, १३३,१३२,१३५ व इतर सर्वे क्रमांकाचे हद्दीवरुन जाणारे रस्त्याप्रमाणे व रुंदीप्रमाणे करणेस व कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस तसेच पुढील सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा.आयुक्त यांस देणेस मान्यता देणेत यावी.*

*मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :-१२५* *विषय क्रमांक :- १३*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि.७/९/२०१२*

*मौजे वडमुखवाडी येथील गट नं.१५४ व १५५ चे उत्तर हद्दीवर मंजूर विकास योजनेत १८ मी. रस्ता प्रस्तावित आहे. सदर पुर्व पश्चिम रस्ता पुढे गावाचे हद्दीवरील रस्त्यापर्यंत सलग जोडणे आवश्यक आहे. कारण या भागातील ब-याचशा नागरीकांना कोणताही पर्यायी रस्ता नाही. त्याकरीता गट नं.१७७ ते १८२ मधुन सलग असा पुर्व पश्चिम १८ मीटर रस्ता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार नगररचना व विकास विभागाने कार्यवाही करुन घोषित करणेस व रस्ता आखणीला शासनाची मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे सांगवी येथील मनपाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार सर्वे क्र. २ ते १३ पर्यंत पूर्व-पश्चिम दिशेस १८ मीटर रुंदीचा असून या रस्त्यास सांगवी-बोपोडी हा मुळा नदीवरील पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीवर पूल प्रस्तावित असून याबाबत धोरणात्मक निर्णय झालेला आहे. सदर रस्त्यास पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत मौजे सांगवी येथील सर्वे क्र.३ मधून जोडरस्ता होणे*

*आवश्यक आहे. सदर जोडरस्ता मु.प्रा.अ. चे कलम २०५ अन्वये करणेच्या अटीवर काम चालू करावे यासाठी जागा मालकांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार मनपाने कलम २०५ अन्वये सर्वे क्र.३ मधून सांगवी-बोपोडी पुलाचे रुंदीप्रमाणे जोडरस्ता करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच याच कलम नुसार मौजे चऱ्होली येथील मनपांच्या हद्दीचे लगत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत स.नं.३१५, ३११, ३१३, ३१२,१३४ चे लगत ३० मी. रुंदीचे रस्त्याला जोडरस्ता म्हणून स.नं.१३४, १३३,१३२,१३५ व इतर सर्वे क्रमांकाचे हद्दीवरुन जाणारे रस्त्याप्रमाणे व रुंदीप्रमाणे करणेस व कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस तसेच पुढील सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा.आयुक्त यांस देणेस मान्यता देणेत येत आहे.*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

*----*

*मा.सुनिता गवळी:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक :-१२६ विषय क्रमांक :- १४*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ :- १) मा.सुरेश म्हत्रे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.*
*२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५२ दि. ७/९/२०१२*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली येथील साने चौक ते तळवडे हद्दी (शीव) पर्यंतचा मंजूर २४.०० मीटर रूंद रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १८.०० मी. रुंद करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.सुमनताई नेटके :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

*----*

*मा.अनुराधा गोफणे :-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.*

*ठराव क्रमांक :-१२७ विषय क्रमांक :- १५*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ- मा.आयुक्त यांचेकडील पत्र जा.क्र.पअक/कावि/४५६/२०१२ दि.११/०९/२०१२ चे लगत.

१) कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक वीपठ/संकीर्ण२०१२/९५८/प्र.क्र.१९५/नवि-२६ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई- ४०००३२ दि.६ जुलै २०१२

विषय - विधान परिषद ठराव

राज्यातील पुणे व इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत होणारी वाढ चे पत्र अवलोकन करणेत येत आहे.

२) अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक रानक्र-२०१२/प्र.क्र./ता.क. दिनांक १७ जुलै २०१२

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पवना नदीकाठचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव- राष्ट्रीय नदीकृत योजनेत समाविष्ट करण्याबाबत चे पत्र अवलोकन करणेत येत आहे.

मा.आशा सुपे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, सदर विषयाला पुढीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे -

मा.महापौर :- अवलोकनाच्या विषयाला उपसूचना देत नाहीत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-९७ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.निलेश पांढारकर :-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-१२८ विषय क्रमांक :- १६

दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.विधी समिती

दि.३/८/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ००*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

-----------------

*मा.निलेश पांढारकर :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :-१२९ विषय क्रमांक :- १७*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*मा.महिला व बालकल्याण समिती*

*दि. २५/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.*
*मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ००*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

-----------------

*मा.निलेश पांढारकर :-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :-१३० विषय क्रमांक :- १८*
*दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त*

*मा.शहर सुधारणा समिती*

*दि. १/८/२०१२ व २/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.*

*मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-*

*अनुकूल-९७ प्रतिकूल- ००*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

-----------------

*मा.निलेश पांढारकर :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :-१३१ विषय क्रमांक :- १९*

दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

मा.क्रिडा समिती

दि.१/८/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९७ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.जितेंद्र ननवरे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २०

दिनांक :- २०.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक
भूजि/२/कावि/४८६/२०११ दिनांक ५/१२/२०११
२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.२७ दि.१०/८/२०१२

अजंठानगर श्रेणीवाढ योजना येथील रिक्त ११ गाळे २५ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टाने (लिजने) वितरीत करणेकामी मा.उपसंचालक, नगररचना विभाग यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे निविदा मागविणेत आल्या असून गाळा क्र. इ ८-Si करिता श्री.चंद्रकांत सुर्यकांत संकपाळ यांचा सर्वोच्च निविदा दर र.रु. ७,१५,०००/- (मनपा/शासन कराव्यतिरिक्त) लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार श्री.संकपाळ यांना गाळा क्र. इ ८-Si २५ वर्षाच्या लिजने देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब,अनेक गाळ्यांना भाव देताना मनपाच्या इमारतींना १००/२०० रुपये भाव दिलेला आहे. अनेक ठिकाणी भाडे वसूल होत नाही. भूमि आणि जिंदगी विभागाकडे कोणाचे लक्ष नाही. येणारा प्रत्येक अधिकारी या विभागाकडे बघत नाही. स्टाफींग पॅटर्न चूकीचा आहे. उदा. अप्पूघर वॉटर पार्कची एक कोटी पेक्षा जास्त वसूली बाकी आहे. अधिकाऱ्यांना विचारल्यावर म्हणतात काहीतरी डिस्प्यूट आहे. ही रक्कम डीस्प्युटरी नाही. ती त्यांना भरायला सांगा. हायकोर्टात गेले,

*आर्बीट्रीने पॉईंट आऊट केले तरी वसूली नाही. आत्ता भाडे चालू आहे. २ वर्षांत १ कोटीपेक्षा जास्त भाडे वसूल केले नाहीतरी भाडे भरले नाही म्हणून ताब्यात घेतले नाही. आयुक्तांनी अप्पूघर व वॉटर पार्कला भेट द्यावी. १ कोटीं भाडे होईपर्यंत अधिकारी कशासाठी थांबले आहेत. आयुक्तांची नोटीस का गेली नाही. Arbitrary ची ऑर्डर का आणली नाही. प्रभाग लेवलवर भूमि आणि जिंदगी विभागात रिपोर्ट करतो. ३/२ महिन्यांत या लोकांकडून थकबाकी कोणाची आहे, लिज मागवत नाही का. ४ प्रभागांतून मागणी आहे, भाडे थकबाकी कुठे आहे. कोणत्याही पुढाऱ्याचे असो, महापालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान होते आहे यात कोणाचेही लक्ष नाही. अनेक विषयांवर चर्चा होते. चर्चेत वेळ जातो. अकाऊंट बील नव्हते. का नाही, काही होत नाही. अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला पाहिजे. होणार का. त्यांनी भाडे वसूल केले नाही, त्यांच्यावर कारवाई होणार का. तुम्ही सांगा मनपाच्या मालमत्ता भाड्याने दिल्यावर प्रत्येक वर्षी भाडे जमा व्हायला पाहीजे. टर्मीनेट करायला पाहीजे. मला खंत आहे, ५/६ कोटींपेक्षा जास्त भाडे थकबाकी असेल तर वॉटर पार्कमध्ये अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्यांच्यावर कडक कारवाई व्हायला पाहीजे.*

*मा.बाबासाहेब धुमाळ :- मा.महापौर साहेब, ट्रान्सोर्ट नगरीमध्ये वाहतूक व्यवसायाचे काम करतो. आम्हाला गाड्या पार्किंगसाठी अडीच एकरची जागा महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. त्याठिकाणी मागील आयुक्तांनी भाडे तत्वावर एका ठेकेदाराला दिले. आत्ता ३ तारीख झाली त्याने मनपाचे १७ लाख बुडवले. मी त्याचा पाठपुरावा केला. कोणत्याही आयुक्तांनी उत्तर दिलेले नाही. आत्ता सुद्धा त्याच्याकडे भाडेपट्टी करार करताना पाटील यांनी पार्किंगमध्ये कसूर केलेली आहे. ६०,०००/- महिना भाडे दराची त्याने ३०/३५ दुकाने निर्माण केलेली आहेत. संबंधित आयुक्तांनी भूमि आणि जिंदगी यांनी दिलेल्या देणेकऱ्यांत पार्कींग चालू आहे. हा इतिहास आहे. या नियोजनाबाबत आज इथे पाहून नियोजन करतो. एक व्यक्ती बोलत असताना दुसरी व्यक्ती बोलते. आज कोर्टात सांगायला फार दु:ख वाटते. वेळ देतोय. दुपारी २ पासून विषय देतो आहे. कामे सगळ्यांना करायची आहेत. चर्चा करण्यात काहीच अर्थ नसतो. सिनिअर लोकांनी बोलायचे. आयुक्तांनी महापौरांना सांगायचे काय कामे आहेत. दुपारी २ पासून बोलतोय. आम्ही सदस्य आहोत. हिताच्या कामासाठी अमूल्य वेळ देतोय. आयुक्त चांगले काम करत आहेत. सहकार्याने करायची गरज आहे. महापालिकेचे नुकसान होत असताना क्रिडांगण कसे झाले सगळ्यांनी सांगितले. करोडोंची गोष्ट आहे याचा विचार करायला नको का. दिवसरात्र कष्ट करतोय, २४ तास काम करतोय. जकातीच्या उत्पन्नावर महापालिका चालते आहे. आम्ही सांगत नाही आपला धंदा व्यापार आहे. मनपाचे एवढे नुकसान होते आहे. ३ महिने ओरडतोय, १७ लाख बुडवले आहेत. दुसरा सुद्धा तसेच करणार,लक्ष द्या. एकदा तुम्हाला फोटोसहीत दाखवले आहे. महापौर आपण सगळा अभ्यास करुन, आज नगरपालिका १२००/१५०० उत्पन्न मिळवतेय, सगळ्यांनी चांगली कामे करावीत अशी विनंती करतो.* मा.सिमा सावळे, मा.संपत पवार यांनी केवळ विषयाचा विरोध केला, विषयाचा अभ्यास करा. जसा आयुक्तांना पाठिंबा दिला,

आयुक्तांना एस.एम.एस. दिला. चार महिन्यांचा इतिहास आत्ता काय होणार बोलतो आहे. याचा अभ्यास करा अशी कळकळीची विनंती आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, हा माझ्या वॉर्डसंदर्भात विषय आहे. मागील आठवड्यात माझ्या वॉर्डात तुम्ही भेट दिली होती आणि निदर्शनास आणून दिले होते की, रोडसाठी होणा-या गोष्टींसंदर्भात, या गाळ्यांसंदर्भात आपले प्रशासन सर्वेक्षण केल्यानंतर गाळे वाटपात कमर्शिअल गाळे वाटप होत असते. प्रत्येक बिल्डींगमध्ये डेटूडे लागणाऱ्या वस्तूंसाठी गाळे तयार केलेले नाहीत. मोठ-मोठ्या वस्ती करत आहेत. ईलिगल कन्स्ट्रक्शन करुन पत्राशेडमध्ये राहतात. साडेसहा लाख रेट होता. रेटप्रमाणे सध्या 6 लाख रेट ठरवला आहे. झोपडपट्टीसाठी हाच रेट लागू आहे का. झोपडपट्टी गाळ्यात छोटे-छोटे व्यवसाय करणा-यांना परवडणार आहे का. संकपाळ हा एकमेव होता का माहित नाही. तोच एकमेव गाळा घेणारा होता का. गाळ्याचा रेट सहा लाख असताना तिथे देण्यासारखी परिस्थिती नाही. गाळा फर्स्ट कम फर्स्ट या बेसिसवर देण्यात येत नसून टेंडर बेसिसवर आहे. सहा महिन्यांपासून विशेष अधिकारी श्री.माछरे यांच्याकडे पाठपुरावा करीत आहे. फाईल मुव्ह झाल्यानंतर एक माणूस आलेला होता. या पुनर्वसनात, सर्वेक्षणात गाळे सांगायचे ठरले होते. नवीन 4/5 बिल्डींगा झालेल्या आहेत. खरोखरच लूटारू वाढलेले आहेत. यांना पाठवून दिले पाहिजे. यांच्यात कोऑर्डिनेशनचा प्रॉब्लेम आहे. नगरसेवकांना गोलगोल फिरवत असतात. हा कुठेतरी गोलगोल फिरवण्याचा विषय कुठेतरी सुटसुटीत करण्याचा प्रश्न आहे. एखाद्याला खरोखर गाळा घ्यायचा असेल तर 95 पासून पुनर्वसित असलेल्यांनाच गाळा द्यायचे ठरले होते. 15 वर्षे शेडमध्ये राहतात, त्यांना अजून गाळे देत नाहीत. अजून काम चालू आहे. फाईलवर काम चालू आहे, 8 दिवसांत होईल असे सांगतात. यावर बेकायदेशीर बांधकाम करीत आहेत, तर काय चूकीचे करत आहेत. बिल्डींगमध्ये पोव्हिजन नाही केलीतर एवढा खर्च करुन बिल्डींग बांधतो. सगळीकडे टप-या लावल्या आहेत. ईलिगल गोष्टी सांगत असतो. भूमि आणि जिंदगी विभागाला अधिकार नाही असे सांगतात. एकीकडे पुनर्वसन करतोय, एकिकडे गोरगरीबांना घरे द्यायचे काम करतोय, याला कोण जबाबदार. साडेसात लाखात गाळा घेऊन झोपडपट्टीतला माणूस कधी धंदा करणार परमेश्वराला माहित. संपूर्ण टपऱ्या लागल्या आहेत. गाळे कसे विकले जाणार, मनपाला कसे उत्पन्न मिळणार. या सगळ्या गोष्टींत जरुर लक्ष द्यावे. हा विषय तहकूब करा. हा माणूस कोण आहे ते बघा. नाहीतर यात तो लाखांचा वेगळाच धंदा करेल.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब, अजंठानगरातील दुकाने-घरे असणारे नागरिक गेली 2 ते अडीच वर्षे पथाऱ्या ठेवत आहेत. काही चौधरी लोक त्यांना अजून गाळे द्यायची व्यवस्था झालेली नाही. कुठेतरी स्वतःच्या नावावर घेतले असेल. गेली कित्येक वर्षे नगरपालिका अस्तित्वात येण्याआधी अजंठानगर वसलेले आहे. चौधरी लोकांच्य़ात प्रथा आहे. छोट्याशा जागेत घर पुढे दुकान असते ही ठरलेली पद्धत आहे. काही लोकांनी दुकानात घराची शेड टाकली आहे. त्यांना ग्राऊंड फ्लोअरला घर देणे केव्हाही सोईचे असणार आहे. प्रत्येक ठिकाणी टपऱ्या आहेत. प्रत्येक घरात दुकानदारी चालू झालेली आहे. प्रत्येकाचे वाढते कुटूंब मोठे झालेले आहे. काहीतरी बिझनेस करायचा आहे. यासंदर्भातील मिटींगा सातत्याने श्री.दिलिप गावडे, सहा.आयुक्त यांच्याबरोबर माझ्या दालनात झाल्या आहेत. हे लोक माझ्याकडे येऊन गेले, त्यांना गाळे देत नाहीत. पहिल्या 11 गाळ्यांची निविदा काढली. यांना देणार का. हे लोक वर्षानुवर्षे 30-35 वर्षे तिथे रहात आहेत. त्यांना तुम्ही 10 बाय 15 ची जागा देणार, जसे त्यांचे दुकान आहे. अजंठानगरमध्ये नागरिकांना जागा दिली, तेवढीच जागा द्या. श्री.राजन पाटील,श्री.दिलिप गावडे यांना लोक म्हणाले, आम्ही टॉयलेट बांधून घेऊ. त्यांचे पुनर्वसन करत असू तरी याचा विचार केला गेला पाहीजे. एका दारादारात 2 गाळे पुरवा. दुकानदारी त्यांचा बिझनेस आहे. त्यांना मिळाला पाहीजे. त्यांची दुकानदारी चालावी. जोपर्यंत मूळ लोकांना गाळे मिळत नाहीत, तोपर्यंत ही टेंडर प्रक्रिया हा विषय तहकूब करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

*ठराव क्रमांक :-१३२* *विषय क्रमांक :- २०*
*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक भूजि/२/कावि/ ४८६/२०११ दिनांक ५/१२/२०११*
*२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.२७ दि.१०/८/२०१२*

*विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.*

*अनुकूल-९७* *प्रतिकूल- ००*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

------------------

मा.जितेंद्र ननवरे–मा.महापौर साहेब, विषय क्रमांक 21वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

*विषय क्रमांक :- २१*

*दिनांक :- २०.०९.२०१२* *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/वा.क./कावि/ ५५/२०१२ दि.२०/०९/२०१२*

*विषय - पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबत.*

*पुणे महानगरक्षेत्रातील वाहतूक समस्या निराकरणाचा एक पर्याय म्हणून मेट्रो प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर मेट्रो प्रकल्प हा पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे राबविणेचा आहे. त्याकरिता पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे पुणे महानगरक्षेत्राकरिता सविसतर मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेचे काम मे.दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC), नवी दिल्ली यांना दिलेले असून त्यानुसार DMRC ने पुणे महानगरक्षेत्राचा सखोल अभ्यास करुन सविस्तर मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) तयार केलेला असून तो २००९ मध्ये म.न.पास सादर केलेला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात एकुण ३१.५१५ कि.मी. लांबीचे दोन मार्ग खालीलप्रमाणे सुचविलेले आहे.*

*१. पिंपरी चिंचवड मनपा-स्वारगेट- १६.५९ कि.मी. लांबी व १५ स्टेशन्स*
   *अ. पुणे म.न.पा. हद्दीतील लांबी- ९.४३६ कि.मी. व ९ स्टेशन्स*
   *ब. पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील लांबी-७.१५३ कि.मी. व ६ स्टेशन्स*
*२. वनाज, कोथरुड-रामवाडी-१४.९२५ कि.मी. लांबी व १५ स्टेशन्स (पुर्णत: पुणे म.न.पा.हद्दीतील)*

*या मेट्रो रेल मार्गिकापैकी पहिली मार्गिका (Corridor) पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीत संपूर्णत: जमिनीवरील उन्नत मार्ग आणि पुणे म.न.पा. हद्दीत जमिनीवरील उन्नत मार्ग (Elevated) व जमिनीखालील भुयारी मार्ग (underground) असून दुसरी मार्गिका संपूर्णत: जमिनीवरील उन्नत मार्ग (Elevated) असून पुणे म.न.पा. हद्दीतील आहे. सदर प्रकल्पामध्ये केंद्र व राज्य शासन यांचे प्रत्येकी २०% प्रमाणे एकूण ४०% अनुदान आणि महापालिकांचा १०% हिस्सा असे एकूण ५०% आर्थिक सहभाग राहील आणि उर्वरीत ५०% रक्कम कर्ज स्वरुपात घावी किंवा ppp तत्वावर उभारावी असे DMRC ने दिलेल्या प्रकल्प अहवालमध्ये नमूद आहे म्हणजेच दोन्ही म.न.पा.नी एकूण प्रकल्प खर्चाच्या १०% (पुणे म.न.पा. ५०% + पिंपरी चिंचवड म.न.पा. ५% ) खर्च करावा लागणार आहे. परंतु पहिल्या टप्प्यातील एकूण ३१.५१५ कि.मी. लांबीपैकी पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीत मेटों लाईन क्र.१ चा ७.१५३ कि.मी. लांबीचा मार्ग व ६ स्टेशन्स येत असून तसेच जमिनीवरील उन्नत मार्ग (Elevated) व जमिनीखालील भूयारी मार्ग (underground) मेट्रो प्रकल्प उभारणीच्या खर्चात मोठा फरक असल्यामुळे सदर प्रकल्प उभारणीसाठी दोन्ही*

*महानगरपालिकांनी आपापल्या हद्दीत येणा-या प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात (Pro-rata Basis) संपूर्ण १०% म.न.पा. हिस्सा द्यावा. त्यास अनुसरुन मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी भूसंपादन, राज्य व केंद्र शासन मान्यता, कर्ज उभारणी, प्रकल्प नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबीकरीता पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो रेल कॉपोरेशन नावाची संयुक्त कंपनी (SPV) तयार करावी आणि त्या मार्फतच मेट्रो प्रकल्पाची संयुक्तपणे अंमलबजावणी करणेत यावी.*

*तरी उपरोक्त मुद्द्यांचे अवलोकन होऊन मेट्रो प्रकल्प अंमलबजावणीसाठी खालील बाबीस मा.महापालिका सभेची मान्यता घेणेस विनंती आहे.*

*१. पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो प्रकल्पासाठी DMRC प्रमुख सल्लागार राहील व DMRC ने सादर केलेल्या मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) अहवाल स्वीकृत करुन मंजूरी देणे.*

*२. मेर्टो प्रकल्प उभारणीचा खर्च दोन्ही महानगरपालिकांनी आपापल्या हद्दीत येणा-या प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात (Pro-rata Basis) संपूर्ण १०% म.न.पा. हिस्सा देय राहील व त्यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मंजूरी देणे*

*३. पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील मार्गिका क्र.१ वर येणा-या .flyover,grade separator इत्यादीमुळे काही Technical बाबीचा फेरबदल DMRC च्या सल्लयानुसार करावा लागणार असल्याने त्याचा अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*४. मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी मेर्टो मार्गिका व स्टेशनसाठी भूसंपादन करणे व त्याचा मोबदला (Compensation) देणे, राज्य व केंद्र शासन मंजुरी घेणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*५. आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत उभारणेसाठी पुणे म.न.पा.च्या धर्तीवर किंवा राज्य/केंद्र शासनाच्या निर्देशानुसार अंमलबजावणी करणेसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*६. मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी भूसंपादन, कर्ज उभारणी, प्रकल्प नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबीकरीता पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो रेल कॉर्पोरेशन नावाची संयुक्त कंपनी (SPV) तयार करणे आणि त्यामार्फत मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करणे.*

*सबब पुणे महानगर क्षेत्रातील (PMR) प्रस्तावित मेट्रो प्रकल्प पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे अंमलबजावणीसाठी DMRC ने सादर केलेल्या प्रकल्प अहवालास (DPR) मान्यता देणेत येत आहे.*

मा.किरण मोटे – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, मेट्रो प्रकल्पातील मार्गिका क्रमांक 1 पी.सी.एम.सी. ते स्वारगेट आहे. पूर्वी निगडी ते पी.सी.एम.सी., पी.सी.एम.सी. ते दापोडी कनेक्टीव्हीटी होती. पिंपरी ऐवजी निगडी अशी दुरुस्ती करावी. वनाजपासून

घेतलेले आहे. राजीव गांधी पार्क,हिंजवडी पूल ते रावेत, नाशिक फाटा ते मोशी असे मार्ग घ्यावेत. खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

***मेट्रो प्रकल्पातील मार्गिका क्र.१ पी.सी.एम.सी. ते स्वारगेट आहे त्याऐवजी निगडी-स्वारगेट अशी करणेस त्याचप्रमाणे स्व.राजीव गांधी पूल ते रावेत ते औंध, नाशिक फाटा ते मोशी इंद्रायणी नगरपर्यंत, जगताप डेअरी ते नाशिक फाटा अशी मार्गिका करावी.***

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – सन्मा.महापौर, सर्व सन्मा.सदस्य, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगर परिसरात मेट्रो रेल्वे करण्याबाबतचा विषय आहे. वास्तविक दिल्ली कॉर्पोरेशन यांनी डी.पी.आर. तयार केला आहे. *D.M.R.C.* ही संस्था सगळ्यांचा डी.पी.आर तेच करतात. त्यांना 2009 मध्ये आपल्या महापालिकेने प्रस्ताव सादर केला. त्यावेळी त्यांनी दोन रुट मंजूर केले. पिंपरी ते स्वारगेट व वनाज ते रामवाडी असा रुट होता. दुसऱ्या पानावर पाहिले तर मार्गिका क्र.1 नव्हते. रामवाडी ते वनाज हा रुट केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. मार्गिका क्र.1 रुटवाईज पाहिजे होता. मध्यंतरी पुणे हद्दीतील, पिंपरी-चिंचवड हद्दीतील मेट्रो यात हा मेट्रो रुट होता, हा विषय पेंडींग राहीला म्हणून पुणे महानगरपालिकेने दुसरी मार्गिका मंजूर करुन घेतली. पुण्याच्या आयुक्तांबरोबर मिटींग घेतली. मार्गिका क्र.1 मागे राहता कामा नये. पिंपरी-चिंचवड शहरातील रहिवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून मार्गिका क्र.2ला महाराष्ट्र कॅबिनेटने मंजूरी दिलेली आहे. याचा पाठपुरावा करणे मनपाच्या हिताचे आहे. म्हणून हा विषय आपल्यासमोर आणला आहे. पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी एकच राहिले, पी.सी.एम.टी. व पी.एम.टी. असे वेगळे न राहता पी.एम.पी.एल. झाले त्याप्रमाणे मेट्रो रेल्वे सिंगल राहणार आहे. यात दोघांना एकच डी.एम.आर.सी. कन्सल्टींग असेल. यात मार्ग जेवढा कि.मी. तेवढ्या प्रमाणात खर्च विभागून घ्यायचे ठरले आहे. पुणे मनपाचे 60 टक्के, आपले 40 टक्के सहभाग असणार आहे. पी.सी.एम.सी. च्या क्षेत्रात 16.50 कि.मी. इतका मार्ग येतो. जेव्हा लेबर अहवाल झाला, त्यावेळी नाशिक फाटा फ्लाय ओव्हर त्यात आलेला नव्हता. आजचा मुंबई-पुणे महामार्ग, फ्लायओव्हर, ग्रेडसेपरेटर लक्षात घेता नाशिक फाटा फ्लायओव्हरच्या अनुषंगिक पातळीमध्ये डी.एम.आर.सी. यांना नवीन प्रस्ताव सादर करावा. आजचा मुद्दा मार्ग क्र.2 बाबत घेतो आहोत. टेक्निकली दोन्ही वायेबल आहेत. त्यांच्या अधिका-यांशी चर्चा करुन ठरविता येईल तो रुट क्रमांक 1

आहे. डिसिजन घ्यायला वेळ लागल्यामुळे मागे राहिला व रुट क्रमांक 2ला मान्यता मिळाली. सभागृहाच्या सूचनांचा आदर करतो. डी.एम.आर.सी. प्रकल्प अहवालात निगडी पहिले स्टेशन घ्यायच्या बद्दल, तिथे तेवढी लोकसंख्या नाही. निगडी इथे सगळे प्रवासी मिळणार नाहीत म्हणून सुद्धा पिंपरी स्टेशन पासून रुट घेतला आहे. आत्ता त्यांच्याशी चर्चा केली आहे. मंगळवारी दिल्ली येथे अधिका-यांना बोलवले आहे. महापौरांसमोर चर्चा होणार आहे. आपल्या भावना त्यांच्यासमोर मांडतो. यात दुरुस्ती करणे शक्य आहे का, हे त्यांच्यासमोर ठेवू. आज आपला मुद्दा फक्त रुट नं.1 मध्ये मेट्रो मार्ग बदल असावा. ग्रेड सेपरेटर, फ्लायओव्हरमुळे मेट्रो मार्ग कसा घ्यायचा हा मुद्दा मंगळवारी अधिकारी आपल्याकडे येणार आहेत तेव्हा घ्यायचा आहे. रिंगरोड वेगळा विषय आहे. भविष्यात तसे करत असाल तर तसे घेता येईल.

मा.विलास नांदगुडे – मा.महापौर साहेब, निगडीपर्यंत मेट्रो फर्स्ट स्टेजपर्यंत घेतो ते बरोबर आहे. सेकंड फेजमध्ये रावेतपर्यंत जाते आहे. बरीचशी वाहतूक हिंजवडीत केंद्रीत झालेली आहे. सकाळी किंवा संध्याकाळी बघा. जेवढे लोक हिंजवडीत जातात, तेवढे रावेत, निगडी इथे जात नाहीत. हिंजवडीचा यात सहभाग केला तर ट्रॅफिकचा त्रास कमी होईल. माझ्या सूचनांचा विचार करा.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, चर्चा करुन विषय संपवितो आहोत. क्युरिऑसिटीचा भाग म्हणून नागरिक विचारतात. 1.30 पर्यंत अनुरेषिय बांधकाम 30 टक्के पर्यंत असेल तर 35 टक्के देतो. कसे कुठून लावतो हा संशोधनाचा विषय आहे. अधिक दंड होतो आहे. कसेही पाहिलेतरी दोन्ही मनपांत याचा खुलासा करावा. 1.20 व 35 टक्के रक्कम जास्त होते आहे. आम्ही कुठेतरी पेपरमध्ये वाचले, मान्यता दिलेली नाही.

मा.मंगलाताई कदम – मा.महापौर साहेब, 1केच्या या विषयाचा खुलासा पाहिजे तो होईल. आत्ता उपसूचना दिलेली आहे. विषय परत आमच्याकडे येऊ नये म्हणून दोन्ही उपसूचना दिलेल्या आहेत. तेव्हा आपण त्या उपसूचना द्या. निगडी पर्यंत व्हायला पाहिजे. फ्रिक्वन्सी आहे. संभाजीनगर, कृष्णानगर, मोरेवस्ती येथून शटल चालू केलेल्या आहेत. काही नगरसेवक देहूरोड हद्दीपर्यंत निवडून आलेले आहेत. तिथे अजून बसेस चालू करु शकलो नाहीत. निगडीपर्यंत चालू करावे लागेल. भविष्यात मेट्रो निगडीपासून घेतली तरी निगडीपर्यंत शटल बसेस असतील. हा मुद्दा विचारात घेतला गेला पाहीजे ही नम्र विनंती आहे. हा विषय आधी मंजूर करा.

मा.जितेंद्र ननवरे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

*ठराव क्रमांक :- १३३* | *विषय क्रमांक :- २१*
*दिनांक :- २०.०९.२०१२* | *विभाग :- मा.आयुक्त*

*संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/वा.क./कावि/ ५५/२०१२ दि.२०/०९/२०१२*

*विषय - पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबत.*

*पुणे महानगरक्षेत्रातील वाहतूक समस्या निराकरणाचा एक पर्याय म्हणून मेट्रो प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर मेट्रो प्रकल्प हा पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे राबविणेचा आहे. त्याकरिता पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे पुणे महानगरक्षेत्राकरिता सविसतर मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेचे काम मे.दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC), नवी दिल्ली यांना दिलेले असून त्यानुसार DMRC ने पुणे महानगरक्षेत्राचा सखोल अभ्यास करुन सविस्तर मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) तयार केलेला असून तो २००९ मध्ये म.न.पास सादर केलेला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात एकुण ३१.५१५ कि.मी. लांबीचे दोन मार्ग खालीलप्रमाणे सुचविलेले आहे.*

*१. पिंपरी चिंचवड मनपा-स्वारगेट- १६.५९ कि.मी. लांबी व १५ स्टेशन्स*
   *अ. पुणे म.न.पा. हद्दीतील लांबी- ९.४३६ कि.मी. व ९ स्टेशन्स*
   *ब. पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील लांबी-७.१५३ कि.मी. व ६ स्टेशन्स*

*२. वनाज, कोथरुड-रामवाडी-१४.९२५ कि.मी. लांबी व १५ स्टेशन्स (पुर्णत: पुणे म.न.पा.हद्दीतील)*

*या मेट्रो रेल मार्गिकापैकी पहिली मार्गिका (Corridor) पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीत संपूर्णत: जमिनीवरील उन्नत मार्ग आणि पुणे म.न.पा. हद्दीत जमिनीवरील उन्नत मार्ग (Elevated) व जमिनीखालील भुयारी मार्ग (underground) असून दुसरी मार्गिका संपूर्णत: जमिनीवरील उन्नत मार्ग (Elevated) असून पुणे म.न.पा. हद्दीतील आहे. सदर प्रकल्पामध्ये केंद्र व राज्य शासन यांचे प्रत्येकी २०% प्रमाणे एकूण ४०% अनुदान आणि महापालिकांचा १०% हिस्सा असे एकूण ५०% आर्थिक सहभाग राहील आणि उर्वरीत ५०% रक्कम कर्ज स्वरुपात घावी किंवा ppp तत्वावर उभारावी असे DMRC ने दिलेल्या प्रकल्प अहवालमध्ये नमूद आहे म्हणजेच दोन्ही म.न.पा.नी एकूण प्रकल्प खर्चाच्या १०% (पुणे म.न.पा. ५०% + पिंपरी चिंचवड म.न.पा. ५% ) खर्च करावा लागणार आहे. परंतु पहिल्या टप्प्यातील एकूण ३१.५१५ कि.मी. लांबीपैकी पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीत मेटॊ लाईन क्र.१ चा ७.१५३ कि.मी. लांबीचा मार्ग व ६ स्टेशन्स येत असून तसेच जमिनीवरील उन्नत मार्ग*

*(Elevated) व जमिनीखालील भूयारी मार्ग (underground) मेट्रो प्रकल्प उभारणीच्या खर्चात मोठा फरक असल्यामुळे सदर प्रकल्प उभारणीसाठी दोन्ही महानगरपालिकांनी आपापल्या हद्यीत येणा-या प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात (Pro-rata Basis) संपूर्ण १०% म.न.पा. हिस्सा द्यावा. त्यास अनुसरुन मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी भूसंपादन, राज्य व केंद्र शासन मान्यता, कर्ज उभारणी, प्रकल्प नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबीकरीता पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो रेल कॉर्पोरेशन नावाची संयुक्त कंपनी (SPV) तयार करावी आणि त्या मार्फतच मेट्रो प्रकल्पाची संयुक्तपणे अंमलबजावणी करणेत यावी.*

*तरी उपरोक्त मुद्द्यांचे अवलोकन होऊन मेट्रो प्रकल्प अंमलबजावणीसाठी खालील बाबीस मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे.*

*१. पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो प्रकल्पासाठी DMRC प्रमुख सल्लागार राहील व DMRC ने सादर केलेल्या मेट्रो प्रकल्प अहवाल (DPR) अहवाल स्वीकृत करुन मंजूरी देणे.*

*२. मेर्टो प्रकल्प उभारणीचा खर्च दोन्ही महानगरपालिकांनी आपापल्या हद्यीत येणा-या प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात (Pro-rata Basis) संपूर्ण १०% म.न.पा. हिस्सा देय राहील व त्यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मंजूरी देणे*

*३. पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्यीतील मार्गिका क्र.१ वर येणा-या .flyover,grade separator इत्यादीमुळे काही Technical बाबीचा फेरबदल DMRC च्या सल्लयानुसार करावा लागणार असल्याने त्याचा अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*४. मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी मेर्टो मार्गिका व स्टेशनसाठी भूसंपादन करणे व त्याचा मोबदला (Compensation) देणे, राज्य व केंद्र शासन मंजुरी घेणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*५. आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत उभारणेसाठी पुणे म.न.पा.च्या धर्तीवर किंवा राज्य/केंद्र शासनाच्या निर्देशानुसार अंमलबजावणी करणेसाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्तास देणे.*

*६. मेट्रो प्रकल्प राबविणेसाठी भूसंपादन, कर्ज उभारणी, प्रकल्प नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबीकरीता पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो रेल कॉर्पोरेशन नावाची संयुक्त कंपनी (SPV) तयार करणे आणि त्यामार्फत मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करणे.*

*सबब पुणे महानगर क्षेत्रातील (PMR) प्रस्तावित मेट्रो प्रकल्प पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी संयुक्तपणे अंमलबजावणीसाठी DMRC ने सादर केलेल्या प्रकल्प अहवालास (DPR) मान्यता देणेत येत आहे.*

*तसेच मेट्रो प्रकल्पातील मार्गिका क्र.१ पी.सी.एम.सी. ते स्वारगेट आहे त्याऐवजी निगडी-स्वारगेट अशी करणेस त्याचप्रमाणे स्व.राजीव गांधी पूल ते रावेत ते औंध, नाशिक फाटा ते मोशी इंद्रायणी नगरपर्यंत, जगताप डेअरी ते नाशिक फाटा अशी मार्गिका करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*अनुकूल-९७* *प्रतिकूल- ००*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

------------------

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, मा.योगेश बहल यांनी सांगितलेल्या विषयाशी सहमत आहे. ३५ टक्के दंड केला, त्या बांधकामाची रक्कमच जास्त आहे. दुसरे प्रामुख्याने मध्यंतरीच्या कालावधीत बोललो आहे. गुंठेवारीतली घरे अनधिकृत केली. साईड मार्जिन सोडले तर वाढीव बांधकामे, एफ.एस.आय. शिल्लक असेल अशी बांधकामांना परमिशन देणार. गुंठेवारीतील अधिकृत बांधकामे केली, अज्ञानापोटी परमिशन न घेता पत्र्याची घरे पाडून बांधकामे केलली आहेत ती अनधिकृत ठरतात. याबाबतीत आपण काय निर्णय घेणार. शहरात अशी बरीचशी बांधकामे आहेत. घरदुरुस्ती करत असताना बिल्डींगबाबत सांगत नाही. कमर्शियल बांधकाम केले असेल तर त्याबाबत नाही. मानवतेच्या दृष्टिकोणातून खरोखरच बांधकामे केली असेल अशा बांधकामांबाबतीत खुलासा करावा.

मा.शमिम पठाण – मा.महापौर साहेब, मी अनेक दिवस शास्ती व दंडाबाबत याचा पाठपुरावा करीत आहे. आयुक्तांना धन्यवाद देते. त्यांनी हा विषय मागणी केल्यानंतर या विषयाचा स्वतःहून विचार केलेला आहे. बरेचश्या सहानूभुतिनंतर निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद. आत्ता आप्पांनी लेआऊटविषयी सांगितले, अज्ञानापोटी बांधकामे केलेली आहेत. १९७६, १९८०, १९८५च्या दरम्यान ही बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे ती इतकी जुनी झालेली आहेत. ती पाडून दुसरे बांधण्याशिवाय पर्याय नसतो. काही गुंठेवारीतील बांधकामे नवीन केलेली आहेत. त्यासाठी तुम्ही दंड व शास्ती आकारली आहे. लेआऊटमधील प्लॉट छोटे छोटे ३ गुंठ्याचे ४ गुंठ्याचे घेतलेले आहेत. गुंठेवारीसाठी अर्ज केलेला आहे. प्रत्येकाचा सातबाराचा उतारा वेगळा आहे. गुंठेवारी नाकारली आहे. २००८मध्ये अर्ज केला, त्यांनी नाकारला आहे. त्यांच्याबाबतीत सहानुभूतिचा दृष्टिकोण ठेवून गुंठेवारीत घ्यावे. जुन्याचे नवे केलेले आहे. ३०-३५ वर्षांपूर्वीची घरे आपण शास्ती व दंडातून वगळावी अशी विनंती करते.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – सन्मा.महापौर, सर्व सन्मा.सदस्य, या अनधिकृत बांधकामांवर अधिनियम, शासनाचे निर्देश, कायद्यातील तरतूदी लक्षात घेऊन कारवाई सुरु केलेली आहे. परवाना नियम प्राप्त झाला आहे. एम.आर.टी.पी.तील प्रोव्हिजननुसार आयुक्तांच्या अधिकारात नियमानुकूल केले पाहिजे. त्याअनुषंगाने बांधकाम परवानगी, नगररचना विभागाला धोरण तयार

करण्यास सांगितले आहे. यापूर्वी जे डिक्लरेशन केलेले आहे त्यात सन्मा. सभागृहासमोर मुद्दा मुद्दाम स्पष्ट व्हावा म्हणून वेळ मागितली आहे. स्पष्ट व्हावे. याबाबत ज्या बाबी अनुज्ञेय नाही, अनुज्ञेय आहे, समाविष्ट आहे हा भाग आहे. म्हणून विचार करतोय. ज्या बाबी अनुज्ञेय नाही, तो सांगण्याचा भाग आहे. १) प्राधिकरण हे स्वतंत्र क्षेत्र आहे. त्यातील बांधकामे यात येणार नाहीत. मनपा क्षेत्रात प्राधिकरण आहे म्हणून तिथे काम करतो, त्यांना लागू नाही. २) एम.आय.डी.सी. क्षेत्रात बांधकामाचे डिक्लरेशन करु शकत नाही. जिथे महापालिकेकडून बांधकाम परवानगी घेता येऊ शकते, तिथे अनुज्ञेय आहे. ३) यलो झोन आहे, नॉन डेव्हलप, पूररेषा, डी.पी.तील आरक्षणे, रेड झोनची बांधकामे, रहिवासी झोन नाही अशी बांधकामे नियमानुकूल करता येणार नाहीत. परवानगी घेता येऊ शकेल व लेआऊट नोटराईज असेल तर वेरिफाय करावे लागेल. ४) ओपन स्पेस सोडली असेल ते घेता येणार. फ्रंट मार्जिनमध्ये कुठेही रिलॅक्सेशन ६.६ २.६ मध्ये दिलेले आहे. रिलॅक्सेशन देता येऊ शकणार नाही. तेवढा भाग काढून फ्रंट मार्जिन क्लीनींग करावे लागेल नाहीतर तो मुद्दा नियम घेता येऊ शकेल. ५) एफ.एस.आय.मध्ये रिलॅक्सेशन नाही. डी.सी. रुल ६.२.२ प्रमाणे देता येत नाही. अनुज्ञेय – १) एम.आर.टी.पी. अक्ट डेव्हलपमेंट कंट्रोल रुलनुसार पिंपरी चिंचवड महापालिकेची बांधकाम परवानगी मागितली. बांधकाम करण्यासाठी परमिशन दिली असेल, फक्त बांधकाम परवानगी न घेता केले असेल पण सर्व अनुज्ञेय गोष्टी, साईड मार्जिन सोडून बांधकाम केले असेल तर बांधकामे रेग्युलराईज होऊ शकतील. यलो झोनमध्येही रेग्युलराईज होतील. प्लॉटसाठी बांधकामे रेग्युलराईज होतील. या बांधकामांना रेग्युलराईज, ऑथराईज सेक्शन ३ प्रमाणे नोटिसा दिलेल्या नाहीत. ***U/s ४४*** सेक्शन ५३ प्रमाणे नोटीसा दिल्या. डेव्हलपमेंट परमिशनसाठी नागरिक अर्ज करु शकतील. ही प्रक्रिया अर्ज केल्यानंतर लेआऊटमधील बांधकाम, डिझाईन करुन नकाशात बसत असेल तर करुन साईड मार्जिन अलॉट करुन होते. डी.सी.रुल प्रमाणे हेल्थ, फायर या बाबी लक्षात घेता साईड मार्जिन देण्याबाबत विचार करु शकतो. हा ९७नुसार घेतला आहे तो कायम ठेवतोय. ग्रे एरियाबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेत आहोत. तो कोणताही निर्णय झालातरी ९७ मध्ये महापालिका सभेत ठराव करुन धोरण ठरविले त्यानुसार अंमलबजावणी चालू आहे. एफ.एस.आय. डिक्लरेशन केले आहे. प्रशासनाकडून शुल्क आकारणी करुन महापालिका सभेत ठरल्याप्रमाणे नियमित करता येईल. परंतू त्याची डिटेल्ड नियमावली तयार करावी लागेल. डी.सी. रुलमध्ये प्रोव्हिजन दिसली नाही. एफ.एस.आय.बाबत,

रेग्युलरायेझेशनबाबत, या बाबी लक्षात घेता १० टक्के सवलतीची बाब शासनाकडे रिफर करतोय. टी.डी.आर. व एफ.एस.आय. देतो. एखाद्याने १४०० स्क्वे.फूट बांधकाम केले त्याचा प्लॉट १००० स्क्वे.फूट आहे तर त्याला एफ.एस.आय देता येईल. पूर्वलक्षी प्रभावाने टेक्निकली करता येईल. हा ग्रे एरिया निर्माण होण्याचे कारण पूर्वी आपल्या धोरणानुसार झालेला आहे. शासनाने ९६ मध्ये सर्क्युलर काढलेले होते. एक्सट्रा एफ.एस.आय. मंजूर करण्यासाठी सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात यावा. आपल्या धोरणानुसार १० टक्के मान्य केलेला आम्हाला द्यावा. टी.डी.आर नागरिक घेऊ शकतात, .४ द्यावा. प्लॉटमध्ये रोड गेला असेलतर .४ रेग्युलर धोरणानुसार मागणी करतोय. या विषयात प्रशासनाने शुल्काबाबत जे डिक्लरेशन केलेले आहे. अस्तित्वातील धोरण डिक्लेअर केलेले आहे. ९७मध्ये धोरण तयार केले. ०७मध्ये डिक्लेअर केले. ०८ मध्ये २० टक्के, १० मध्ये ३५ टक्के, वाणिज्य बांधकाम ५० टक्के रेग्यलराईज करण्यासाठी डिक्लेअर केले आहे. सर्वसाधारण स्पेस निर्माण करण्यास, नागरिकांच्या अटींची व्याप्ती लक्षात घेता विचार करता येऊ शकतो. पुढील सभेत विषय आणू शकतो. सदस्यांना नागरिकांना सांगता येऊ शकेल, बांधकाम रेग्युलराईज केलेतर लेआऊट मंजूर आहे, परमिशन घेतली असेल तर २० टक्के साईड मार्जिन बांधकाम मंजूर होऊ शकेल. ही प्रक्रिया सगळ्यांनी पूर्ण केली पाहिजे नाहीतर सेक्शन ४४ मध्ये अपिल केले असले पाहिजे. नोटीस प्रक्रिया चालू असेल. ही प्रक्रिया पूर्णपणे कायदेशीर पद्धतीने होऊ शकते. गुंठेवारी एफ.एस.आय. शिल्लक आहे. दुसरा मुद्दा गुंठेवारीचा पुरावा कच्चा आहे. टोटल नवीन बांधले ते डेव्हलप केले तरी अनधिकृत ठरते. आत्याच्या कायद्यानुसार साईड मार्जिन २० टक्के रिलॅक्स करुन होत असेल तर प्रशासनाकडून शुल्क आकारणी करुन नियमित करता येईल व रिवाईज करता येऊ शकते.

मा.शमिम पठाण - मा.महापौर साहेब, पूर्वीची गुंठेवारी नाकारली आहे. ६ ऑगस्टला शासनाला विनंती केली होती. गुंठेवारीला मुदतवाढ देऊन ते नियमित करता येऊ शकेल.

मा.श्रीरंग बारणे – मा.महापौर साहेब, गुंठेवारीतली बांधकामे अनधिकृत केलेली घरे संपूर्ण अनधिकृत ठरवली जातात. पूर्ण बांधकामाला दंड आकारला जातो.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, हा मुद्दा तपासून पाहीला पाहीजे. डी.सी. रुल वाचला, याच्या धोरणात, चर्चेत

जाणवले. लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये हा मुद्दा उपस्थित केला. त्याचा नक्कीच विचार करु.

मा.शमिम पठाण – मा.महापौर साहेब, अशी बांधकामे झाली असतील तर गुंठेवारी करताना साईड मार्जिन तपासली जाईल. तशी मंजूरी नाही.  सेक्शन २५० प्रमाणे तेवढेच बांधले असेल तर त्यांना मान्यता दिलेली आहे.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, २००१ ते २०१२ मध्ये बांधकामे झाली, त्याबद्दल बोलतोय. त्यांची गुंठेवारी झालेली आहे. वेगळा विषय आहे.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, ९० टक्के अधिकृत होत नाही. ५ टक्के अधिकृत होऊ शकते. या विषयाचा सभागृहाला अधिकार आहे. कमी करु शकतो.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, डी.सी रुलमध्ये उर्वरीत करण्याची प्रथा आहे. किती करायचे याचा निर्णय घेऊ शकतो.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, ४ ते ५ टक्के बांधकामे नियमित होतील. फ्रंट मार्जिनमध्ये काहीच रेग्युलरायझेशन नाही. गुंठेवारीचे काहीच करु शकत नाही. एफ.एस.आय., टी.डी.आर. आपण देऊ शकत नाही.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, रिट्रोस्पेक्टीवली लागू होऊ शकते का याबद्दल शासनाकडे माहिती मागवतोय.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, १.३० ते १.३५ पर्यंत जाते.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, डी.सी. रुलमध्ये असेल तर देऊ शकतो.

मा.अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, नवीन बांधकामांना नियम लावतात ते नियमाने देऊ शकतो. आजचा विषय पुढील मिटींगमध्ये आणला तर ४ ते ५ टक्के बांधकामे अधिकृत होतील.

मा.विलास नांदगुडे – मा.महापौर साहेब, डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये यलो झोनमध्ये बांधकामे केलेली आहेत, ती नंतर फ्लड झोनमध्ये आलेली आहेत. रेड लाईन, ब्ल्यू लाईन नंतर आलेली आहे. रेसिडेन्शियल झोन आहे तो रेग्युलराईज करणार का.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, पूर्वी ज्यांनी बांधकाम परवानगी घेतलेली आहे. २००७ मध्ये, ०९ मध्ये ब्ल्यू लाईन नवीन मार्ग केलेला आहे. त्यांना कंप्लिशन देतोय. तशाच पद्धतीने पॉलिसी लागू आहे. तेव्हादेखील ब्ल्यू लाईन मार्ग नव्हता. त्यावेळच्या धोरणानुसार लावता येईल. बाकी नकाशात पाहीले पाहीजे.

मा.आर.एस.कुमार – मा.महापौर साहेब, शंभर टक्के बांधकामांत ९८ टक्के बांधकामांनी फ्रंट मार्जिन, साईड मार्जिन ठेवलेली नाही. पूर्ण बांधकाम केलेले आहे. एफ.एस.आय.पेक्षा टोटल डबल केलेले आहे. यात २ ते ३ टक्के लोकांचे अधिकृत होईल. पंजाब राज्यात मार्जिन ठेवून बांधकाम करत नाहीत, तिथे कंम्प्लिशन मिळते. तसे बघायला गेलेतर लोकांमध्ये होड आली. लोकांचा दृष्टिकोण बदलला पाहीजे, अपेक्षेपेक्षा कमी बदलला. शासनाला कन्वीन्स करावे लागेल. बदल करावा लागेल तरच बरीच बांधकामे वाचतील नाहीतर आजच्या तुमच्या ऑफरमध्ये फक्त २ ते ३ टक्केच लोकांची घरे वाचणार आहेत.

मा.अरुण बो-हाडे – मा.महापौर साहेब, अनधिकृत बांधकामांबाबतीत दिशाभूल होते आहे का काय असे वाटते आहे. आत्ताच कळाले की दिल्ली सरकारने ९३७ कॉलनी अधिकृत केल्या आहेत. आपण सुद्धा याचा अभ्यास केला आहे. आपण सांगितलेल्या नियमांत ५ टक्के बांधकामे अधिकृत होणार का नाही याबद्दल शंका आहे. शहराची पार्श्वभूमी लक्षात घेता गोरगरीब कामगारांना जसे जसे शक्य असेल तसे प्लॉट घेऊन बांधकाम सोईप्रमाणे केलेली आहेत. फ्रंट मार्जिन, बॅक मार्जिन न करता ही बांधकामे रेग्युलराईज करण्यासाठी पॉझिटीव्ह दृष्टीकोणातून ठेवून नियम अटींत सुकरता आणावी. दुसरा मुद्दा मा.अजित गव्हाणे यांनी मांडला, पेनल्टी रक्कम कमी करता येईल या दृष्टीने विचार करावा.

मा.गोरक्ष लोखंडे – मा.महापौर साहेब, ***We have to follow orders of High Court.*** घर असेल तर ते लोकशाहीच्या देशात, राज्यात पाहीजे. असाच प्रश्न कर्नाटक सरकारपुढे उपस्थित झाला आहे. जामिया मशिद केसमध्ये त्यांनी नियमित केले आहे. आपल्यापुढे हाच पर्याय आहे. रिस्पांडंट क्र.२ ज्यावेळी वंजारी

यांचे कंम्पलेण्ट परत मागवाची असे म्हणाला, त्यावेळी निर्णय घ्यावा लागतो. पब्लिक रिलेटेड जनहीत याचिका असते. त्यावर निर्णय देताना न्यायाधिशांनी निर्णय दिला. आपण कारवाई केली आपण कायदयाबरोबर आहोत. नवीन कायदा करणे, सुप्रिम कोर्टात रिव्यू पिटीशन दाखल करणे यासंदर्भात कोण आहे त्यांच्याबरोबर रिस्पॉडंट क्र.२ पी.सी.एम.सी. रिव्यूमध्ये गेले तर हा रिलिफ मागू शकतो. नवा कायदा येणार विधी मंडळात यावर अपिल होऊ शकते. शहरातील सर्व नागरिकांचे समर्थन कोण करणार नाही. फ्लड लाईनमध्ये आहे, गरीब माणसाने ख-या अर्थाने काही वर्षांपूर्वी जुनी घरे पाडून नवीन घरे बांधली, मजले वाढवले असले तरी डी.सी. रुलमध्ये बसत नसेल तर विधी मंडळ कायदा करु शकते. कर्नाटक पाकिस्तानात  नाही. या देशात झालेले कायदे तपासून पाहा. हायकोर्टाने व्होल्गार केसमध्ये रिमार्क मारला आहे, बेकारांना बेघर करु शकत नाही. या सगळ्या गोष्टींचा गांभिर्याने विचार करावा. शहराला वाढण्यावर भर देतो. पुण्य आपल्या हातांतून घडवावे.

मा.कैलास कदम – मा.महापौर साहेब, शासनाचे धोरण निश्चित नाही. मध्यंतरी सन्मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते, मुंबई महापालिका सोडून राज्यात जेवढ्या महापालिका आहेत, त्यांच्यासाठी समिती नेमली आहे. त्याचा अहवाल मागितला आहे. त्याप्रमाणे दोन महिन्यांत धोरण निश्चित करणार आहोत. वर्तमानपत्रात सुद्धा बातम्या आल्या होत्या, त्याअनुषंगाने शासनाकडून आपल्याला असे आदेश आले आहेत का.

मा.प्रशांत शितोळे – मा.महापौर साहेब, प्रचलित कायद्यानुसार महापालिकेत देत असेल तर कायद्याप्रमाणे करु शकत नाही. उच्च न्यायालयाचा आदेश, प्रचलित कायद्यात विचार करतो. महाराष्ट्र शासनाकडून असे आदेश घेऊन आलो तर नक्की वाढवू शकतो हे नक्की आहे. उच्च न्यायालयाच्या अधिन राहून निर्णय घेऊ शकतो. १०० टक्के बांधकामे वाचणार नाहीत. धोरण जाहीर केलेतर २ ते ५ टक्के लोक निश्चित वाचतील. कालच्या बातमीप्रमाणे नागरिकांमध्ये चर्चा झाली. आयुक्तांनी डिक्लेअर केलेले आहे. बांधकामे नियमित होणार का. २० ते १० टक्के रेशियो केला. कुठून होणार. ४ ते ५ मुद्दे आहेत की, प्राधिकरणात होणार नाही, एम.आय.डी.सी.त होणार नाही. तुमच्या अधिकारात हे २० टक्के होणार नाही. आपल्या हद्दीत शासनाकडून जो निर्णय अपेक्षित आहे. लोकांच्या म्हणणे काय. ४ लाच वाचून दाखवतो. – जागेचे मार्जिन व त्यासाठी येणा-या अवास्तव खर्चासाठी असा निर्णय

होण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा चालू आहे. लोकांचा निर्णय होणे अपेक्षित आहे. दंडात्मक कारवाई करताना १९९७चा ठराव क्रमांक ३४६५ मंजूर करुन लावल्या जाणा-या दराचा अवलंब केला जाणार आहे. रु.५००/- प्रति स्क्वे.फूट भरावे लागणार आहेत. अन्यथा धुण्याभांड्याची कामे करणा-या, बिगारी कामे करणारे अशा कष्टकरी यांचा विचार करता बांधकामे नियमित करावीत. घरे वाचणार नाहीत, दंडाची आकारणी करुन शासनाला दिले तर कायमस्वरुपी प्रश्न सुटू शकेल. रेशीयो दिलेला आहे. ३,००० स्क्वे.फूट असेल तर रु.२५/- प्रति स्क्वे.फुटप्रमाणे आकारणी करावी. ३ ते ५ हजार करिता रु.५०/- दंड आकारणी करावी. ५ ते १०,००० एरियासाठी रु.१००/- प्रति स्क्वे.फूट प्रमाणे दंड आकारणी करावी. त्यापुढे रु.५००/- या दराप्रमाणे आकारणी करावी. या प्रस्तावाला मंजूर करावे. शहरातील कोणतीही बांधकामे पाडू नयेत. कोणत्याही बांधकामाचा रोष कोणावर येऊ नये. हीच गोष्ट निगेटीव्ह अशी आहे, तुम्हाला करणे भाग आहे. कोणाच्या मनात शंका नको. दंडात्मक शुल्क आकारुन शहरातील बांधकामे रेग्युलराईज होणार असतील तर तुम्हाला शासनाकडे जावे लागेल. केवळ पिंपरी चिंचवडसाठी शासनाकडून आणावे लागेल. उल्हासनगरच्या धर्तीवर करताना त्यांचा बेस वेगळा आहे, आपला बेस वेगळा आहे. इतर महापालिकांच्याबाबतीत आपल्याला देखील निर्णय घेता येईल. म्हणून शासन यात कोणापुढे पाहते आहे. म्हणून असा प्रस्ताव आपण त्यांच्याकडे पाठवावा. या पत्राचा विचार करावा.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, आपल्या अध्यक्षतेखाली २००८ मध्ये बांधकाम केलेल्या शंभर टक्के लोकांना नोटीस आली आहे. आपण मागील वर्षी निर्णय घेतला यात शंभर टक्के दुरुस्ती करावी, रद्द कारावी. असे केल्यामुळे आपण ज्यावेळी विषय आणणार. २००८ मधील बांधकामांच दंड ५ ते १० टक्के कमी करता येईल. त्यासाठी सर्वांची मिटींग घ्यावी. १.३० चा विचार केला. आत्ता सांगितल्याप्रमाणे ही प्रोविजन नसल्यामुळे ठरावाच्या अनुषंगाने शासनाकडे परमिशन घेणार आहोत. आपल्याकडे १९९९ साली टी.डी.आर.ची कन्सेप्ट आली. ९९ नंतरची बांधकामे, नंतरच्या लोकांना याचा फायदा घेता यावा याचे इम्प्लिमेंटेशन ९९ पासून महापालिकेच्या कार्यक्षेत्रात सुरु झालेले आहे. हे साईड मार्जिन .२० + जी.बी.चा ठराव कन्व्हर्ड एफ.एस.आय. + .४० अशा पद्धतीने केले तर १.७ पर्यंत साईड मार्जिन हे करु शकतो. हे पाठवायला हरकत नाही. आपल्याला माहित नाही २००७ मध्ये १५ टक्के, ०८ मध्ये टक्के, ०९ मध्ये २० टक्के, ३० टक्के यासाठी गदारोळ झाला आहे. रेडी रेकनरचा रेट प्रस्तावित केला आहे.

मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली नाही हे तपासून पहावे. बॅकरोड डब्ल्यू.बी.एम. याची सभागृहात कधी मान्यता घेतलेली नाही. हा नागरिकांचा विषय आहे. यात किमान दंड करुन नवीन जीवदान कसे देता यावे यासाठी विषय अभ्यासपूर्वक करुन २ ते ३ मुद्दे नागरिकांबरोबर ९९ चे होते, आत्ता आहेत. मी टि.व्ही. कधी बघत नाही पण दोन दिवसांपूर्वी बघितले की, मा.शिला दिक्षित यांना ग्रे एरियातील आहे तशी घरे रेग्युलराईज केलेली आहेत. मा.शरद पवार यांच्याशी संपर्क करणार आहे. मी, स्वत:, आपण त्यांची वेळ घेऊ, त्यांची अपॉईंटमेंट घ्या. मा.सोनिया गांधी यांच्या हस्ते सर्व दिलेले आहे. दिल्ली सरकारमध्ये असे महिलांचे राज्य आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी निर्णय घेतला. मा.सोनिया गांधी यांना कॉंग्रेस मिनिस्टरी यांची वेळ घेतली. देशाच्या राजधानीत असा निर्णय होऊ शकतो तर पिंपरी चिंचवड सारख्या गोरगरीबांचे शहर असा उल्लेख केला जातो तर अशा शहरात ऐतिहासिक निर्णय होईल. ही माहिती घेण्यात प्रयत्न करावा. मी स्वत: दिल्लीला जायला तयार आहे. तिकडे शक्य आहे मग आपल्याकडे का नाही. २ विषय महत्वाचे आहेत. एक म्हणजे ३५ टक्के परिस्थिती भयंकर आहे. दुसरे म्हणजे एफ.एस.आय. कसा असेल, लोकांमध्ये दंडाच्या नोटीसा गेलेल्या आहेत. आजच्या परिस्थितीत लोकशाहीचा, दिलास्याचा निर्णय घ्यावा. आपण सर्वांना खूप वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानतो.

मा.महापौर **:-** सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

*(मोहिनीताई विलास लांडे)*
*महापौर*
*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - ४११ ०१८*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*नगरसचिव कार्यालय*
*क्रमांक - नस/४/कावि/१३८४/१२*
*दिनांक :- २२/१०/२०१२*

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

*प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.*